# श्रद्धा

डॉ. सुहास पेठे

'श्रद्धा' या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरं

।।श्री।।

# श्रद्धा

('श्रद्धा' या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरं)

डॉ. सुहास पेठे
एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)


* श्रद्धा *

पुस्तकरूपाने प्रकाशित दुसरी आवृत्ती : जून, २०१९
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)



**प्रत्येकाच्या अंतरंगात**

**सुप्त, जागृत अवस्थेत**

**पण सदैव**

**विद्यमान असणाऱ्या**

**'पावन श्रद्धे'ला**

**कृतज्ञतापूर्वक समर्पण...**

**...सुहास पेठे**

## श्रद्धेची आरती

श्रद्धेची आरती करूया निर्गुणसगुणाची ।
जाणिव देई जी सर्वांतील शुद्ध स्वरूपाची ।।धृ।।

मनबुद्धीला जाग देतसे ।
त्यांचे त्यांना स्थान देतसे ।
मर्यादांचे भान देतसे ।
ओळख देई आनंदाच्या विशाल जगताची ।।१।। श्रद्धेची...

कसे, का, कुठे आपण आलो ।
मायेध्ये रमून गेलो ।
दिव्यत्वाचा हेतु विसरलो ।
स्मरण देउनी ध्येय गाठण्या दिल्या प्रेरणेची ।।२।। श्रद्धेची...

सार्थक होण्या नरजन्माचे ।
देत जी दिशा, साह्य शक्तिचे ।
दीनजिवांना छत्र कृपेचे ।
श्रद्धा ती टिकुदेत, प्रार्थना, हीच आर्ततेची ।।३।। श्रद्धेची...

## 'खऱ्या श्रद्धेची वाटचाल करण्यापूर्वी...'

*'श्रद्धा' हा शब्द सर्वसामान्य माणसांच्या वापरातला शब्द आहे. त्याला सात्त्विकतेची आणि पावित्र्याची एक छटा आहे. त्याचा अर्थ पूर्ण कळून, मनुष्य तो शब्द वापरो किंवा न कळता वापरो, त्या शब्दानं म्हणणाऱ्याच्या किंवा ऐकणाऱ्याच्या चित्तात, नकळत पवित्रभाव उमटवण्याचं सामर्थ्य आहे, हे आपण अनुभवलं असेल.*

*म्हणूनच एखाद्या मुलीचं नाव 'श्रद्धा' ठेवण्यापासून, ते पूर्ण जीवन 'श्रद्धामय' असण्यापर्यंत, या शब्दाचा वावर होत असलेला आपल्याला दिसेल. जितका त्या शब्दाच्या अर्थाचा विचार करीत जाऊ, तितकी त्याची खोली आणि व्यापकता आपल्या लक्षात येऊ शकते. त्याचं महत्त्व जेवढं जेवढं समजत जाईल, तेवढं तेवढं माणसाचं मन विशाल करीत जाण्याचं सामर्थ्य या शब्दात आहे.*

*म्हणूनच, आपल्याला एक ऐतिहासिक सत्य आढळतं की, लाखो वर्षांच्या मनुष्यजीवनाच्या इतिहासात, हा शब्द तितकाच पुरातनपणे वापरात आहे. मनुष्याच्या बाह्यांगात, शरीरयष्टीत, ठेवणीतत्याचं मनुष्यपण कायम आहे, त्याच्यातलं जिवंतपण जसं कायम आहे, तसंच खरंतर त्याचं श्रद्धामय अंतरंगही कायम आहे. हे'श्रद्धे'चा शुद्ध विचारानं शोध घेत गेलं, तर लक्षात येऊ शकेल.*

*यामुळंच माणसाच्या ज्ञात असलेल्या इतिहासातल्या, सर्वांत पुरातन वेदवेदान्तातही, त्याकाळच्या सम आणि सूक्ष्म दृष्टीच्या ऋषींनाही दृश्य जगात, जसा अंतर्यामी असलेल्या श्रद्धेचा प्रत्यय आला तसाच, ते दृश्य जग ओलांडल्यावर अदृश्य जगात तर, ही श्रद्धाभावना शाश्वत आणि परिपूर्णपणे विद्यमान असल्याचं प्रत्ययाला*

आलं. त्यामुळं मनुष्यजीवनाबद्दल प्रत्येक माणूस 'श्रद्धामयोऽयम्पुरुषः' असं दर्शन त्यांना झालं आणि तसे उद्‌गार त्यांनी काढले. अर्थातच, प्रत्येक मनुष्य श्रद्धामयच आहे, याची खात्री इतकी पुरातन आहे. तसंच त्याचा उपयोग आणि प्रेरणा यांचीही !

मात्र काळाच्या ओघामध्ये, असंख्य प्रकारे बदलणाऱ्या या जगाच्या दृश्य व्यापारामध्ये, नवनवीन शास्त्रं, संशोधनं यांची भर पडण्यामध्ये-'श्रद्धा' हा शब्द वापरात राहिला तरी, त्याची उपयुक्तता, अर्थाच्या छटा, यांत मात्र खूप बदल होत गेले. ते इतके की, श्रद्धा या शब्दाचा अर्थ साध्या भाषेत, बदलत जाताजाता, 'श्रद्धा' म्हणून काही नाही, असं मनुष्यच म्हणू लागला. तसं म्हणताम्हणता, मनुष्य अश्रद्ध होण्याइतपत खाली आला. त्याचं तो बुद्धिनिष्ठ समर्थनही करू लागला. अशी अश्रद्धता ही, श्रद्धेच्या एवढ्या पुरातन परंपरेला नवीन नाही, हे जाताजाता लक्षात घेतलेलं बरं. त्याचा विचार आणि मर्यादा पुढं पुस्तकात ओघानं येणारच आहे.

श्रद्धेच्या या प्रवासाबरोबरच, दुसऱ्या बाजूला, माणसाच्या संस्कृतीचे इतर विभागही उलगडत जात होते. टोळी, कळप, कुटुंब, घरं, शस्त्रं, संरक्षणं, शेती, राज्यव्यवस्था, भाषांचे विकास-वापर, विविध शास्त्रं - संशोधनं, त्यांतून निर्माण झालेली यंत्र तंत्रज्ञानं, मनुष्याच्या आणि समाजाच्या सुखासाठी वेगवेगळ्या मतप्रणाली, त्यांतून वाद-इझमस्, तसे संबंधित राज्यव्यवस्थेचे प्रयोग, विविध धर्ममतांचा उगम-विकास, त्याचबरोबर राजकीय - धार्मिक-

*सामाजिक सत्तांवरून अगणित युद्धं - अशी हजारो वर्षांच्या दृश्य स्वरूपाच्या विकासाची प्रक्रियाही निरंतर चालू होती. आजही ती सुरू आहे आणि पुढं सुरू राहाणार आहे.*

*या साऱ्या बाह्यांगप्रधान विकासाचे आणि प्रवाहाचे परिणाम, आतल्या जीवनावर होणं अपरिहार्य होतं. तसे हे विकास साऱ्या जगभर आपापल्या परीनं चालू असले तरी, हा बाह्य विकास घडण्यात आर्थिक, धार्मिक आणि राजकीय सत्ता बळकट असलेल्या - विशेषतः युरोपीय, पाश्चिमात्य देशांचा - प्रभाव हा प्रधान राहिला. ते तसं असल्यानं माणसाच्या आंतरिक स्वास्थ्य-समाधानाच्या दृष्टीनं काही फरक पडला नसता. पण प्रत्यक्षात मात्र तो पडला.*

*इतका बाह्य विकास जर माणसाचं स्वास्थ्य, समाधान त्याच प्रमाणात वाढवीत गेला असता तर, यासारख्या पुस्तकाचीसुद्धा आज गरज पडली नसती. पण जितकीजितकी बाह्य यंत्रं, सुखसाधनं, वैचारिक विकास - हे सगळे बदल घडत गेले, त्यांनी माणसाच्या जगात असंख्य वस्तू, साधनं आणून, त्याच्या जीवनाला अतर्क्य गती दिली, सुखसोयी दिल्या, तितक्यातितक्या प्रमाणात माणसाचं स्वास्थ्य मात्र घटत गेलं. वाढणाऱ्या सुखसाधनांनी, दुसऱ्या बाजूला मनुष्याचे लोभ, असूया, संचय, रखरख, अशांती, भय, संबंधांतले ताणतणाव - यांतही तितकीच अकल्पित भर घातली. त्यामुळं यासाऱ्या प्रवासानं मनुष्याचं स्वास्थ्य हरवत गेलं.*

*याची दोन मुख्य कारणं होती. एक - हा बहुतांश विकास बाह्य होता. तटस्थपणे पाहिलं तर, तो करणाऱ्या संस्कृती, या दृश्य*

*आणि जड विश्वच सत्य मानून चालणाऱ्या होत्या. स्वास्थ्य तर आंतरिक गोष्ट आहे. सूक्ष्म-अदृश्य जगातली आहे. त्यामुळं या विकासानं ती घडणारी नव्हती-नाही. म्हणून ती घडू शकली नाही. दुसरं म्हणजे, बाह्य विकास-साधनं ही आकर्षून घेणारी, प्रभाव टाकणारी असल्यामुळं, स्वाभाविकपणे माणसं त्यामुळं प्रभावित झाली. बाह्य विकास पूर्वीही घडले. पण त्यांना आंतरिक विकासाची, श्रद्धेची आवश्यक जोड होती. अलीकडच्या विकासात तिकडं दुर्लक्ष झाल्यानं, आंतरिक विकासाची जोड कमी महत्त्वाची वाटू लागल्यानं, श्रद्धेचा विकास अंतरला, थांबला. तो जर बरोबरीनं आणि त्याचं महत्त्व राखून घडत राहिला असता तर, नुसतीच बाह्य समृद्धी आली नसती तर, समाधानाची श्रीमंतीही टिकली असती.*

*हे आकलन ज्यांना यथार्थ वाटेल, त्यासाठी लागणाऱ्या श्रद्धेचा परिचय आणि विकास साधावासा वाटेल, शांत-समाधानी अंतरंगाची गरज वाटेल - त्यांच्यासाठी, या विषयाला धरून संतकृपेनं केलेला हा नम्र प्रयास !*

*जिज्ञासू वाचकांपर्यंत ही सेवा पोचवण्यासाठी विविध टप्प्यांवर मनापासून मदत करणाऱ्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.*

*संतनगरी, सातारा.* *- सुहास पेठे*

प्रश्नानुक्रम..

१. श्रद्धा म्हणजे काय? ■१३

२. जीवनात श्रद्धेची गरज काय ? तिचा व्यवहाराला उपयोग होतो का ? असल्यास कसा ? ■१९

३. अश्रद्धा म्हणजे काय ? ■२४

४. अनेकदा श्रद्धा ठेवून फसवणुकी का होतात ? ■२५

५. अनेकदा मोठी माणसं एरवी बुद्धिमान, कर्तृत्ववान, अनुभवी असून श्रद्धा न ठेवताही यशस्वी होताना का दिसतात ? त्यांना श्रद्धेची गरज का पडत नाही ?■२६

६. श्रद्धेनं सगळे प्रश्न सुटतात का ? ■३०

७. श्रद्धा ठेवण्यात आपण बुद्धी गहाण टाकल्यासारखं होतं का? ■३१

८. श्रद्धेनं पर्वतही हालतील, हे म्हणतात, ते खरं आहे का ? असल्यास कसं ? ■३४

९. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि श्रद्धा यांत विरोध आहे का ?■३६

१०. स्वतःतल्या अस्तित्वाची-आहेपणाची आणि त्याला जोडलेल्या जगातल्या आणि जगदीशातल्या विलक्षण मोठ्या, अज्ञात, पण सुनियंत्रितपणे कल्याण करणाऱ्या व्यवस्थेची

खात्री म्हणजे श्रद्धा. हे लक्षात आलं तरी, आम्ही व्यवहारात जिथं श्रद्धा ठेवतो, ते कुणीतरी दैवत, संत, व्यक्ती - असंच काहीतरी असतं. याचा या श्रद्धेशी संबंध कोणता? त्या अर्थानं श्रद्धेच्या काही पायऱ्या, टप्पे आहेत का? श्रद्धेच्या परीक्षेचे प्रसंग असतात का ? ■४१

११. श्रद्धा व प्रयत्नवाद यांतला संबंध कोणता ? ■४९

१२. कर्म विवेकानं, विचारानं, मनापासून केल्यावर पुन्हा श्रद्धेची वेगळी गरज काय ? ■५१

१३. अलीकडं शिक्षणानं माणूस साधारणतः अश्रद्ध होत जाताना दिसतो, असं का होतं ? ■५२

१४. काही घरात पतीपत्नींची किंवा दोन पिढ्यांची श्रद्धास्थानं वेगवेगळी असतात. त्यातून मग दोनही स्थानांचे-गुरूंचे फोटो लावणं, उपासना करणं या गोष्टींवरून मतभेद होतात, याला काय करावं ? ■५९

१५. असलेली श्रद्धा एखाद्या प्रसंगात अश्रद्धा होते, डळमळते तेव्हा काय करावं ? असं होऊ नये असंही वाटतं, याला काय उपाय ? ■६१

१६. एखादं सामाजिक कार्य, कला, शिक्षण, क्रीडा यांसारख्या क्षेत्रांतल्या कार्यांवरची श्रद्धा आणि ईश्वर किंवा अज्ञात शक्तीवरची श्रद्धा यांत काय फरक आहे ? ■६४

१७. श्रद्धेचा अनुभव येतो का व कोणता ? अनुभव आणि श्रद्धा यांचा संबंध कोणता ? श्रद्धेनं आलेला अनुभव आणि भ्रम यांतला फरक कसा ओळखावा? श्रद्धा ठेवूनही अनुभव येत नाहीत, तेव्हा काय करावं ? ■६८

१८. काळजी असेल तर,श्रद्धा कमी पडते असं समजावं का ? ■८१

१९. श्रद्धेचे अनुभव येत असूनसुद्धा, त्या अनुभवांचा व्यावहारिक व पारमार्थिक प्रगतीला उपयोग होत नाही, अशा वेळी आम्ही काय करावं ? ■८२

२०. अनेक श्रद्धास्थानांच्या ठिकाणी काही विशिष्ट महत्त्वाच्या दिवशी भाविकांची प्रचंड गर्दी होते. त्यात अनवस्था निर्माण होऊन, घातपात होतात, गर्दीच्या गोंधळात अनेक माणसं मृत्युमुखीही पडतात. अशा प्रसंगी भाविकांवर आणि त्या श्रद्धास्थानांवरही अनेकदा चौफेर टीका होते. त्यानं काही प्रश्नही निर्माण होतात, क्वचित अश्रद्धाही होते. अशा वेळी काय करावं ? ■८५

२१. आपल्या श्रद्धेबद्दल काही व्यक्ती अश्रद्धा निर्माण करण्याचा प्रयत्न करतात, अशा वेळी आपली भूमिका काय असावी ? आपल्याला श्रद्धेचा अनुभव आला, तर त्याचा इतरांना लाभ होण्यासाठी त्यांना सांगावं असं वाटतं, अशा वेळी काय करावं ? श्रद्धा ठेवताना मनुष्य अंधश्रद्ध होईल का ? ■८७

२२. विद्या, बुद्धी, कला, सत्ता, पैसा - यांमुळं श्रद्धेची हानी होते, असं म्हणतात, या गोष्टी व्यवहारात अपरिहार्य आहेत. मग त्यांपासून होणारी श्रद्धेची हानी कशी टाळावी ? ■९१

२३. मनोकायिक आजारांवर श्रद्धा हा उपाय आहे म्हणतात, ते बरोबर आहे का व कसं ? ■९३

२४. काही व्यक्ती जन्मतः अश्रद्ध असलेल्या आढळतात, असं का होतं?त्यांच्या बाबतीत काही करता येतं का? काही वेळा आधी श्रद्धा नसलेल्या व्यक्तीही आयुष्यात एखाद्या टप्प्यावर श्रद्धावान होताना दिसतात. मग अशी श्रद्धा उत्पन्न होण्याची काही वेळ येते का ? ■९७

२५. श्रद्धेचं खरं स्वरूप म्हणजे आपल्यातल्या अस्तित्वाची, जगात अशाच तऱ्हेनं सर्वत्र असलेल्या अस्तित्वाची आणि त्यामागच्या अज्ञात शक्तीची-भगवंताची-अंतिम सत्याची जाणीव जागी असणं, हे आहे, हे कळू शकतं. पण अशा सूक्ष्म आणि अज्ञातावरची श्रद्धा ठेवणं, टिकवणं,हे सामान्य माणसाला अवघड वाटतं.श्रद्धेचा उपयोग, ती टिकली पाहिजे, जागी असली पाहिजे हेही पटतं. यासाठी काय करावं ? ■१००

२६. श्रद्धा निर्माण व्हायला, टिकायला, वाढायला पूरक कृती कोणत्या ? ■१०४

---

सुरुवातीलाच आपण ही गोष्ट लक्षात घेऊ की, आपल्या नेहमीच्या वापरातल्या एका शब्दाची व्याख्या आपण करू पाहातो आहोत. त्या शब्दानं नेमकं काय अभिप्रेत आहे, हे समजून घेऊ पाहातो आहोत. तसं पाहिलं तर, जी गोष्ट आपल्या इतक्या नेहमीच्या वापरातली असते, ती म्हणजे काय किंवा तिचा अभिप्रेत अर्थ काय, हे आपल्याला एरवीच्या व्यवहारात ठाऊक असतं. अगदी पहिल्यांदा आपण जेव्हा तो शब्द कुणाकडून ऐकतो, वाचतो, वापरतो तेव्हाच त्याचा अर्थ आपल्याला माहीत झालेला असतो आणि तो त्या व्यवहाराला साधारणतः पुरतोही.

जसं घर, झाड, डोंगर, मनोरा, यांसारख्या वस्तूंचे बोध करणारे शब्द किंवा संबंध - नातेवाईक, आईवडील, भाऊबहीण, मुलगा, मुलगी, सून - असे शब्द वापरतो तेव्हा, त्यांनी अभिप्रेत असलेला अर्थ, हा सर्वसामान्यपणे लवकर कळतो. तेच बाहेरच्या व्यवहारात व्यवसाय, उद्योगधंदा, शेती, नोकरी, शासन, राज्यव्यवस्था, सरकार, संस्था - असे शब्द वापरतानाही, एकदा ते कळले की, त्यांचा अर्थ आपल्याला कळतो. पण जितकी दगड,वीट, माती - असं म्हटल्यावर कळण्यात निश्चितता असते, तितकी निश्चितता - यंत्रणा, व्यवस्था, शासन - असं म्हटल्यावर नसते.

याचं कारण, पहिल्या गोष्टी जितक्या स्थूल, जड, दृश्यआणि त्यामुळं कळणाऱ्या, निश्चित स्वरूपाच्या वाटतात, कळतात, तेवढ्या दुसऱ्या गोष्टी, निश्चित स्वरूपाच्या वाटत नाहीत. म्हणजे उदाहरणार्थ, यंत्रणा म्हटल्यावर कळतं पण पूर्ण आणि निश्चित असं सांगता येत नाही. कोणती यंत्रणा, कोणती व्यवस्था, कोणतं किंवा कसलं शासन - याचा उलगडा, या नुसत्या शब्दांवरून होत नाही. कारण, एकतर त्याचे मागचेपुढचे संदर्भ कळल्याशिवाय अर्थ कळत नाही. यंत्रणा ही पाणीपुरवठ्याची यंत्रणा, की साफसफाईची यंत्रणा,

की राज्यशासनाची यंत्रणा - असे अनेक मागचेपुढचे संदर्भ कळावे लागतात. तर अर्थ कळतो.

थोडं पुढं जाऊन, चांगलंवाईट-योग्यअयोग्य-प्रेमळनिष्ठुर - असे शब्द आले की, अर्थ तर लक्षात येतो. पण त्यावर एकमत होईलच किंवा तो अर्थ परिपूर्ण असेलच, असं मात्र सांगता येत नाहीसं होतं. त्यात पुन्हा ते शब्द वापरणारे आपणच असू तरीसुद्धा, त्यात्या काळात, त्यात्या वयात त्याचे अर्थ पुन्हा बदलतात, असं आपल्या लक्षात येईल. जी गोष्ट मला आज योग्य वाटते, ती मला पूर्वी अयोग्य वाटत असू शकते. मग जर हा शब्द वापरणारे लोक वेगवेगळे असतील तर, एकच गोष्ट एकाच वेळी योग्य आणि अयोग्य अशी दोन्हीही ठरू शकेल, याचा अनुभव आपल्याला व्यवहारात अनेकदा आला असेल.

याचंच आणखी एक कारण, पहिले शब्द जेवढे स्थूल, दाखवण्यासारखे-दृश्य आहेत, त्याच्या अर्थावर जितकं एकमत होऊ शकतं, तितकं आत्ताच्या या गटातल्या शब्दांवर होताना दिसणार नाही. म्हणजे उदाहरणार्थ, एखादी वस्तू, ही वीट आहे की दगड आहे - या शब्दांच्या अर्थावर एकमत होतं. वीट म्हणजे काय, म्हणून पुन्हा विचारावं लागत नाही किंवा चर्चा करावी लागत नाही. तसं मात्र या चांगल्यावाईट-योग्यअयोग्य या शब्दांबद्दल होत नाही.

याचं कारण, पहिल्या वस्तू जशा दृश्य आहेत, तशा या गटातल्या वस्तू दृश्य नाहीत. त्यात पुन्हा चांगलंवाईट याला एक सापेक्ष अर्थ आहे. म्हणून एका देशाच्या दृष्टीनं, योग्य असलेली गोष्ट, दुसऱ्या देशाच्या दृष्टीनं अयोग्य असते. एका देशाच्या दृष्टीनं बंडखोर, द्रोही आणि म्हणून अयोग्य असलेली कृती आणि व्यक्ती अयोग्य असते. त्याचवेळी दुसऱ्या बाजूच्या देशाच्या दृष्टीनं ती कृती शौर्याची आणि व्यक्ती हुतात्मा ठरून, ते योग्य ठरतं.

त्यात पुन्हा योग्यअयोग्य, चांगलंवाईट - अशा गोष्टी या दृश्य जगात प्रत्यक्ष दाखवता येत नाहीत. त्याचे परिणाम एकवेळ

दिसतील. पण हे शब्द ज्या अर्थाचा बोध करण्यासाठी वापरले त्यामागचे विचार, मतं ही ज्या ठिकाणाहून येतात, ते ठिकाण दृश्य नसून अदृश्य आहे. ते आहे, हे जितकं खरं तितकंच, ते असण्याची यंत्रणा दाखवणं किंवा उलगडणं हे शक्य होत नाही, हेही खरं. माणसाचा न दिसणाऱ्या - अदृश्य जगाशी संबंध आणि संपर्क येतो, तो असा.

असं असल्यामुळं, हे इथंच लक्षात घ्यावं लागेल की, माणूस हाच असा प्राणी आहे की, ज्याला जेवढं विशाल, दृश्य आणि त्यातल्या त्यात उलगडू शकणारं, समजू शकणारं, एकमत होऊ शकणारं जग आहे, तितकंच, किंबहुना त्याहीपेक्षा कितीतरी विशाल असं, न दिसणारं, अदृश्य पण अत्यंत महत्त्वाचं जग आहे. हे लक्षात आलं तर, हेही पटू शकेल की, बाहेरच्या गोष्टी ठरवणारंसुद्धा जे जग आहे, ते आतलं - अंतरंगातलं अदृश्य जग आहे.

मनुष्य जेव्हा एखादी चांगली किंवा वाईट कृती करतो, ती एकवेळ दृश्य असेल. पण त्यामागं आधी जो विचार, निर्णय होतात, ते मात्र या अदृश्य जगात ठरतात. तेव्हाच ती कृती दृश्यात आकाराला येते. इतकंच नाही तर, समोर दिसणाऱ्या कृतीचंसुद्धा आपापलं पाहाणं, आकलन वेगवेगळं असू शकतं. एखादी वस्तू जरी एकाच ठिकाणी असली तरी, कोण कुठं उभा आहे, यावर ती पश्चिमेला आहे की, पूर्वेला आहे किंवा आणखी कुठल्या दिशेला आहे, हे ठरतं. यातलं प्रत्येकाचं उत्तर वेगळं असलं, तरी ते त्याच्यात्याच्या परीनं बरोबर असतं आणि अर्थातच इतरांच्या दृष्टीनं चूक असतं. एवढं सगळं लक्षात आलं तर, जगात असंख्य गोष्टींबद्दल परस्परविरोधीमतं, वाद, त्यावरून संघटना, संघर्ष, वेळी युद्धंसुद्धा का घडतात, हे लक्षात येईल. म्हणूनच अदृश्य जगाचं आकलन जेवढं जास्त तेवढी सापेक्षता कळते. एकांगी विचार-आकलनं टळतात. संघर्ष कमी राहातात. स्वाभाविकपणे चित्ताचं स्थैर्य, शांती अधिक राहू शकतात.

हे जर एवढ्या साध्या गोष्टीबद्दल घडू शकतं आणि त्यामुळं संघर्ष-दुःखं कमी होऊन, शांती वाढू शकते तर, माणसाच्या अशा अतिविशाल, अदृश्य, सूक्ष्म जगाचा परिचय घडला, आकलन झालं तर, माणसाच्या बाबतीतल्या अंतरंगातल्या शाश्वत, चैतन्यमय, शुद्ध जाणीवयुक्त सत्यस्वरूपाचा परिचय घडला, त्याचं आकलन झालं आणि त्यावर स्थिर राहून, आपले आंतरिक आणि बाह्य व्यवहार करता आले तर, मनुष्य कोणत्या आनंदात राहू शकेल, किती सुसंवादी राहू शकेल, याची कल्पना आपल्याला येईल.

श्रद्धा म्हणजे, आपल्या अंतरंगातली अशी शाश्वत, शुद्धजाणीवयुक्त, सदैव जिवंत, निरपेक्ष, स्वतःइतक्याच सर्व सृष्टीत भरून राहिलेल्या अस्तित्वाशी आणि त्या अस्तित्वाला आधार असलेल्या आणि त्यापलीकडं राहाणाऱ्या कल्याणकारी, शाश्वत,सदैव सत्यरूप असलेल्या, तर्कापलीकडल्या, आनंदमय अस्तित्वाशी, निरंतर एकरूप राहाणारी शक्ती होय.

ही शक्ती प्रत्येकाच्या ठायी आहे. प्रथमदर्शनी काहींना कदाचित हे लक्षात येणं कठीण वाटेल किंवा बुद्धीनं न पटणारं वाटेल. पण त्यामुळं तिच्या अस्तित्वावर काहीही फरक पडत नाही. कारण ती फक्त आहे आणि आहेच !

जसं सूर्य आणि त्याचा प्रकाश ही माझ्या पटण्यावर, मानण्यावर अवलंबून नाहीत. तो आणि त्याचा प्रकाश फक्त आहे आणि आहेच. जर असं असेल, तर मग साहजिकच असा प्रश्न पडेल की, मग ते मला जाणवत कसं नाही ? किंवा ही श्रद्धा सर्वांना, सर्वांच्या ठिकाणी तशीच प्रकर्षानं प्रत्ययाला का येत नाही ?

तसा हा प्रश्न सोपा आहे. अस्तित्व हाच माणसाच्या जगण्याचा खरा आधार आहे. तेच अस्तित्व त्याच्या सर्व शरीराला व्यापून असतं. त्याच्या शरीराचे सर्व व्यवहारही त्याच्यामुळंच चालतात. हे सत्य शाश्वत असलं तरी, प्रत्येकाला त्याचं ज्ञान याअर्थानं असतंच असं नाही. तो जागा असताना जे अस्तित्व जागं

असतं, ते आणि तसंच अस्तित्व तो झोपलेला असतानाही तितकंच जागं आणि कार्यरत असतं. आता त्याला हे पटेल, प्रत्ययाला येईल असं नाही. पण ते सदैव जिवंत, चैतन्यमय आहे, हे साधा विचार केला तरी, त्याच्या लक्षात येईल. मनुष्यानं त्याचे काही व्यवहार, कामं टाळली, सोडली, सोपवली, केली नाही तरी, तो जसा अस्तित्वात असतो, जिवंत असतो, तसेच झोपेत त्याचे व्यवहार थांबले, त्याच्या अस्तित्वाची जाणीव त्याला नसली, तरी तो अस्तित्वात असतोच. जिवंत असतोच. फक्त झोपेमुळं किंवा त्यामुळं येणाऱ्या बेसावधपणामुळं, त्याला आपलं अस्तित्व किंवा जिवंतपण त्यावेळी लक्षात येत नाही, एवढंच.

साध्या शारीरिक पातळीवरसुद्धा त्याला आयुष्यभर जाणीवसुद्धा नसलेल्या मेंदूच्या, शरीराच्या, पचनसंस्थेच्या- शरीराची वाढ-घट करणाऱ्या असंख्य यंत्रणा, प्रतिक्षणी आपलं काम करीत असतातच. त्याला माहीत नाही, तो अज्ञानी आहे, त्याचा विश्वास नाही म्हणून, त्याच्या मेंदूचं काम थांबत नाही. तो झोपला तरी, त्याचं अन्न पचायच्या क्रिया थांबत नाहीत. त्याचं अस्तित्व-जिवंतपण टिकूनच असतं. ते शाश्वत, निरपेक्ष सत्याची एक झलक आहे. तसं पाहिलं तर, माणसातल्या इतर कुठल्याही वय, व्यवसाय, देश, भाषा, शिक्षण, समजूत - असल्या कसल्याही भेदांवर हे निरपेक्ष सत्य आणि त्याचं काम अवलंबून नाही.

हे जे साधं शरीरयंत्रणेतलं आणि त्याच्यापेक्षा गुंतागुंतीच्या मेंदूच्या, मनाच्या यंत्रणेचं काम चालतं, ते केवळ त्या व्यक्तीतल्या घटकांवर अवलंबून नसून, बाहेरच्या सृष्टीतल्या आणि ती सृष्टीही नियंत्रित करणाऱ्या, अज्ञात अस्तित्वावर अवलंबून असतं - चालतं. साध्या जिवंतपणाला लागणारं अन्न-पाणी-वारा-ऊन-त्या सगळ्यांचं नियमन करणारी अज्ञात व्यवस्था, ही व्यक्तीत काम करीत असलीतरी, ती अशी जगाशी आणि अज्ञाताशी निगडित आणि सुसंवादी असते. याची मनुष्याला जाणीव असो वा नसो.

अशा प्रत्येक माणसाच्या ठिकाणी असलेल्या, जगाशी आणि जगदीशाशी सदैव जोडलेल्या, त्याच्याकडून प्रत्येकाच्यासाठी समानपणे, कल्याणबुद्धीनं कार्य नियंत्रित करणाऱ्या अस्तित्वाची निःसंदेह खात्री म्हणजे श्रद्धा होय.

म्हणूनच मनुष्य आहे, म्हणजेच तो श्रद्धामयच आहे ! आता हे उघड आहे की, साध्या व्यवहारातसुद्धा एखादं वाहन चालवायचं झालं तरी, ते नुसतं आपल्याकडं असून चालत नाही, ते चालवण्याचं ज्ञान आपल्याला असलं तर, त्याचा वापर करता येतो. तसं आपण श्रद्धामय आहोतच. पण ते नुसतं असून, त्याचा वापर करता येणार नाही. इतक्या वरच्या पातळीवरचा आणि तितकाच अत्यंत साध्या व्यवहाराशीसुद्धा संबंधित असलेला वापर, आपल्याला त्या 'श्रद्धेच्या खऱ्या स्वरूपा'चं शुद्ध ज्ञान असल्या शिवाय, करता येणार नाही, हे उघड आहे.

म्हणून श्रद्धा जन्मजात लाभूनसुद्धा त्या विलक्षण शक्तीचा आपल्याला, आपल्या कल्याणासाठी अनेकांना उपयोग करता येत नाही, असं आपल्याला आढळेल. यात अर्थातच श्रद्धेची, अस्तित्वाची कमतरता नसून, श्रद्धा म्हणजे काय, तिची व्याप्ती केवढी आहे, तिची उपयुक्तता निरपेक्ष समाधानी जीवन जगण्यापर्यंत कशी आहे, म्हणजेच साध्या भाषेत भगवंतप्राप्तीपर्यंत कशी आहे - याच्या ज्ञानाची कमतरता आहे. त्याविषयी जिज्ञासा नसेल, विपरीत माहिती असेल, काही गैरसमजुती, पूर्वग्रह - असतील, त्यामुळं हा लाभ आपल्याला होत नसेल, हे लक्षात घेणं गरजेचं आहे. साध्या व्यवहारातसुद्धा माझीच वस्तू माझ्याच उपयोगाची असून, तिच्याविषयी मला माहिती नसेल, तर जे नुकसान होतं, त्यासारखंच, पण त्याहीपेक्षा माझं फार मोठं नुकसान श्रद्धा म्हणजे काय याची कल्पना नसल्यानं होत असतं. तसंच त्याविषयीच्या शंकांचं निरसन होऊन, निःसंदेह श्रद्धेमुळं होणारे अमूल्य लाभ घेण्यासाठी, श्रद्धा म्हणजे काय, याचा उलगडा या निमित्तानं होणार आहे !

**

*२. जीवनात श्रद्धेची गरज काय ? तिचा व्यवहाराला उपयोग होतो का ? असल्यास कसा ?*

आपण पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात श्रद्धेचा खरा अर्थ समजून घेतला असेल, तर आपल्या लक्षात येईल की, शुद्ध अस्तित्वाची, अर्थात खऱ्या सत्याची, जिवंतपणाची, कल्याणकारी चैतन्याची निःसंशय खात्री, हे जर श्रद्धेचं खरं स्वरूप आहे, तर श्रद्धेची गरज हा प्रश्न मुळात तसा उद्‌भवणारच नाही. कारण, एका अर्थानं तो प्रश्न विचारणं म्हणजे, मी किंवा हे सारं जीवन-जग असण्याचीच काय गरज आहे, असं म्हटल्यासारखं होईल. मला जर अस्तित्वात असण्याची गरज आहे, तर मला श्रद्धेची गरज आहेच.

अर्थात या प्रश्नात अभिप्रेत असलेली गरज स्पष्ट करणंही आवश्यक आहे. ज्यावेळी आपल्याला एखाद्या गोष्टीची गरज आहे का, असा आपण विचार करतो, तेव्हा दोन गोष्टी नकळत त्यामागं असतात. एकतर, गरज असेल तर ती गोष्ट आवश्यक आहे आणि अर्थातच गरज नसेल, तर ती गोष्ट नसली तरी चालू शकेल, असं आपण गृहीत धरलं आहे. सोप्या भाषेत आपल्याकडं एक घर आहे, तर दुसरं घर घेण्याची गरज आहे की नाही, अशा पद्धतीनं आपण अनेक गोष्टींबद्दल, वस्तूंबद्दल विचार करतो. त्यामुळं अर्थातच दुसऱ्या घराची गरज नसेल तर ते नसणं, न घेणं चालू शकतं. तेच इतर वस्तूंच्या बाबतीत.

दुसरं नकळत असं गृहीत धरलेलं आहे, की एखाद्या गोष्टीची गरज ही आपण ती आपल्याला उपयोगी आहे की नाही, यावर ठरवीत असतो. तसंच आपण श्रद्धेबद्दल ठरवीत आहोत. म्हणजे असं की, एखादं चारचाकी वाहन आहे. ते त्याच्या कामाचा विचार करता उपयोगी असतं. पण मी जर महानगरातल्या दादरसारख्या ठिकाणी राहात असेन, तर ती वस्तू उपयोगी असली, तरी मला गरजेची नाही, कारण ती मला वापरता येणं शक्य नाही,

कदाचित त्यावर तिथं रहदारीच्या अडचणींमुळं बंदीही असू शकते.

तसा आपण श्रद्धेचा विचार केला, तर लक्षात येईल की, ती असली किंवा नसली तरी चालू शकेल अशाही पद्धतीची गोष्ट नाही आणि ती गरजेची असेल, पण मला उपयोगी नाही, अशाही पद्धतीची गोष्ट नाही. उदाहरणानं पाहायचं तर, आपल्या जीवनात हवेची गरज काय, असा प्रश्न आपण कधी विचारला नाही आणि विचारणार पण नाही. ती अस्तित्वाशी निगडित गोष्ट असल्यानं ती सृष्टीनं कुठंही माणसाला उपलब्ध ठेवलेलीच आहे. आपली अडचण आहे ती इथं की, श्रद्धेचं स्वरूप म्हणजे 'आहेपण','सत्' किंवा 'अस्तित्व' आहे, याची आपल्याला कल्पना नसते.

श्रद्धेच्या निश्चित स्वरूपाची कल्पना नसल्यामुळं ती कशावर तरी ठेवायची वस्तू आहे किंवा वेळी न ठेवण्याचीही वस्तू आहे, अशा आपल्या समजुती असतात. मनुष्य जिवंत आहे, तर त्याचं हृदय किंवा मेंदू किंवा रक्ताभिसरण चालू ठेवायचं की नाही, हे प्रश्न वेगळे उद्भवतच नाहीत, किंबहुना ते असणं, म्हणजेच तो जिवंत असणं आहे, याची कल्पना असलेली बरी.

गरजेच्या बाबतीतला दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा की, माणसाचं सबंध जीवन हे आहेपणावर, अस्तित्वावर पूर्ण होत असतं, जगलं जात असतं. त्या अर्थानं त्याच्या गरजेचा प्रश्नच नसून, श्रद्धा हीसुद्धा त्याच्या जीवनाच्या दृष्टीनं, तशीच त्याच्या अस्तित्वाला पूर्णत्व देणारी गोष्ट आहे. इतकंच नव्हे, तर ती तशी मुळात असतेच, फक्त आपल्याला त्याची अनेकदा कल्पना नसते.

उदाहरणानं पाहू. आपल्या समोर एखादा पाण्याचा तांब्या आहे. आपण साध्या भाषेत बोलताना तो भरलेला आहे किंवा रिकामा आहे, असे शब्द वापरतो. त्यावेळेला आपण असं गृहीत धरलेलं असतं, की त्यात पाणी पूर्ण भरलेलं आहे, म्हणजे तो भरलेला आहे आणि त्यात पाणी अजिबात नसेल, तर तो रिकामा आहे. आपण विचार केला, तरच हे लक्षात येईल, की तो आहे हे

जितकं खरं आहे, तितकंच तो कायम 'भरलेला' आहे, हे सहसा लक्षात येत नाही.

थोडा विचार करू, आपण ज्यावेळेला त्यात पाणी पूर्ण भरतो तेव्हा तो परिपूर्ण असतो, अशी आपली समजूत आहे. प्रत्यक्षात त्यातलं पाणी पूर्ण ओतून टाकलं आणि आपल्या समजुतीप्रमाणं तो रिकामा केला, तर तो अपरिपूर्ण किंवा रिकामा होत नाही, तर त्यावेळी तो हवेनं परिपूर्ण भरलेला असतो. तुम्ही तो पाण्यानं भरा किंवा न भरा. तो परिपूर्णच असतो आणि तसं असणं हा त्याचा स्वभाव आहे.

तसंच मनुष्य अस्तित्वात आहे, म्हणजे तो श्रद्धामयच आहे. पाणी असल्यावर तांब्या भरलेला वाटावा आणि हवा असल्यावर तो रिकामा वाटावा, हा आपल्याच विचारांतला भम्र आहे. कारण असणं, परिपूर्ण असणं हा श्रद्धेचा स्वभावच आहे. जसं एकाच वेळेला तांब्या हवेनं भरलेला असणं किंवा पाण्यानं भरलेला असणं कसंही असलं - तरी, तो 'असणं' म्हणजेच तो भरलेला असणं हा त्याचा स्वभावच आहे, हे आपल्या लक्षात येईल.

हे इतकं खरं आहे की, आपण एका दुसऱ्या उदाहरणानं पाहू. सलाईनच्या पाण्यानं पूर्ण भरलेली बाटली पहा. ज्यावेळेला त्यातला द्रव-पाणी काढून घेण्यासाठी, तिला छिद्र देऊन ते काढण्याची व्यवस्था केली जाते त्याच वेळी, आत पाणी कमी होत जाईल, तशी ती रिकामी होऊ शकत नाही, म्हणून दुसऱ्या बाजूनं हवा आत जाण्यासाठी वाट ठेवली जाते. तरच पाणी बाहेर काढता येतं. म्हणजे बाटली भरलेली असणं हा तिचा स्वभाव आहे. तुम्ही पाणी काढणार असाल, तर ती हवेनं भरून जाईल. कारण पूर्ण असणं, हा तिचा स्वभाव आहे.

आपल्याला दृश्य जगाची सवय आणि त्यावरच जास्त विश्वास असल्यामुळं ती बाटली रिकामी होत चालली आहे, असं आपल्याला वाटतं. प्रत्यक्षात तिच्यातलं पाणी कमी होऊन, ती हवेनं

भरत चाललेली असते, परिपूर्ण होत असते. आता यातलं पाणी आपल्याला कमीजास्त झालेलं दिसतं, पण त्याचवेळी, त्याचप्रमाणात भरत चाललेली हवा दिसत नाही. हा अस्तित्वाचा सूक्ष्म गुण न दिसणं, हा आपल्या अज्ञानाचा परिणाम आहे, माहिती नसण्याचा परिणाम आहे. हे लक्षात घेतलं तर, श्रद्धेचं स्वरूपही असंच 'सदैव' असण्याचं आणि तेही 'परिपूर्ण' असण्याचं असतं, हे कळू शकेल.

अर्थात त्यावरून हेही लक्षात येईल, की श्रद्धा हा तिची गरज असणं-नसणं, ठेवणं-न ठेवणं, ती कमी-जास्त असणं, किंवा नसणं - यांचा विषयच नाही. ती असतेच, फक्त पाण्यासारखी ती असलेली आपल्याला जाणवते आणि वायुरूप असल्यावर ती नाही किंवा नसते असं आपल्याला वाटतं. या आपल्या आकलनाच्या मर्यादा आहेत. आता अगदीच गरजेचा विचार केला, तर अतिशय तहान लागल्यावर माणसाला पाण्याची गरज आहे की नाही, हा प्रश्न जसा पडत नाही, ती आहेच हे नकळत कळतं. तसंच श्रद्धेची गरज आहे की नाही, हा प्रश्न पडण्याचं कारण नाही, ती गरज आहेच. किंबहुना ती श्रद्धा आत असतेही. फक्त तिचं स्वरूप नीट न कळल्यामुळं किंवा आधी पाहिल्याप्रमाणं, ती दृश्य स्वरूपाची नसल्यामुळं असे प्रश्न उद्‌भवू शकतात.

व्यवहाराला तिचा उपयोग काय असा जो प्रश्न वाटतो, तोही विचार केला तर तसा गैरलागूच आहे, हेही लक्षात येऊ शकेल. एखाद्या माणसाशी एखादा व्यवहार करायचा आहे. तर ज्याच्याशी व्यवहार करायचा, त्यात तो जिवंत असण्याचा उपयोग काय, अस्तित्वात असण्याचा उपयोग काय - असं आपल्या मनात सुद्धा येत नाही. कारण, उलट तो मनुष्य अस्तित्वात असला, तरच व्यवहार होऊ शकतो. तसंच व्यवहारात श्रद्धा असेल, तरच खरा व्यवहार होऊ शकतो. तो विश्वासार्हपणे पूर्ण होऊ शकतो.

सूक्ष्म स्वरूपात अस्तित्वाचं म्हणजे अज्ञात शक्तीचं-भगवंताचं आपल्यातलं सदैव विद्यमान असलेलं स्वरूप म्हणजे श्रद्धा

होय. ती ज्यावेळेला अशा व्यवहारात उतरते, त्यावेळी तिला प्रामाणिकपणाचं, विश्वासार्हतेचं व्यवहारात लागणारं आणि कळणारं स्वरूप प्राप्त होतं. श्रद्धा म्हणजे मुळातच सत्-खरं, सत्य - असं असल्यानं व्यवहार तिच्या आधारावर झाला, तर त्याच्यात व्यवहाराला लागणारा खरेपणा येतो. त्यासाठी श्रद्धा खऱ्या स्वरूपात जागी असावी लागते, हे खरं. ती असेल, तर अशा माणसाशी नात्यागोत्यातला व्यवहार, कंत्राट, जमिनीची खरेदी-विक्री, देणं-घेणं - कसलाही व्यवहार केला, तरी तो पाळला जातो. कारण त्याच्यामागं सत्याचं स्वरूप असलेली 'श्रद्धा' उभी असते.

तिची व्यवहारातली उपयुक्तता ही खूपच मोठी आहे. कारण ज्याच्याशी व्यवहार करणार तो, स्वभाव म्हणून श्रद्धामय माणूस असला तरी, जर असा श्रद्धेबद्दल जागा नसेल, तर तो व्यवहार तडीला जात नाही, खोटा पडतो, त्रास उद्भवतात.

याठिकाणी श्रद्धा खऱ्या स्वरूपात माहीत असणं आणि ती जागी असणं, हे शब्द लक्षात घेण्याची गरज आहे. कारण श्रद्धेच्या बाबतीत जागा असेल, तर मनुष्याचा व्यवहार त्याअर्थानं खरा आणि विश्वासाचा ठरतो. साध्या भाषेत नफा-नुकसान याचासुद्धा विचार न करता, शब्द खरा करणाऱ्याशीच व्यवहार करणं आपण पसंत करतो. त्यानं त्याचा शब्द खरा केला, असं जे आपण म्हणतो, त्यामागं त्याची श्रद्धा जागी आहे, असं खरंतर आपल्याला म्हणायचं असतं. कुठलेही शब्द देणाऱ्या, आपला कितीही फायदा करून देऊ म्हणणाऱ्या आणि फसवणूक करणाऱ्या माणसांशी व्यवहार करणं, म्हणजे असत्याशी अर्थात, अश्रद्ध माणसाशी व्यवहार करण्यासारखंच आहे. ते तर अर्थात कुणालाच नको असतं. एकवेळ व्यवहारात थोडं नफा-नुकसान झालेलं परवडतं.

म्हणूनच श्रद्धेचा व्यवहारात उपयोग तर आहेच, पण श्रद्धावान माणसाशीच व्यवहार करणं, आपल्याला सुखाचं जातं, हे आपल्या अनुभवावरून आपण ठरवावं !

**

## ३. अश्रद्धा म्हणजे काय ?

'अश्रद्धा' हा शब्द आपण ऐकतो, वापरतो. त्याचा अर्थ श्रद्धा नाही, श्रद्धेचा अभाव असणं - असा गृहीत धरतो. पण श्रद्धा जर अंगभूत, स्वाभाविक, अस्तित्वाशी निगडित आहे, तर तिचा अभाव कधीच असू शकत नाही. अर्थात ती नसणं म्हणजे माणूस नसणंच!

मग अश्रद्धा म्हणजे आपल्याला काय म्हणायचं आहे, हे समजून घेऊ. आजच्या आपल्या श्रद्धेच्या कल्पना या कुणातरी व्यक्तीवर, दैवतावर विश्वास - अशा स्वरूपाच्या आहेत. त्यामुळं तो विश्वास नसणं म्हणजे अश्रद्धा, अशी आपली समजूत होते. पण पहिल्या उत्तरात म्हटल्याप्रमाणं स्वतः आहोत, याची खात्री म्हणजेच जर श्रद्धा आहे, तर अश्रद्धा किंवा श्रद्धा नाही असं म्हणणं, म्हणजे मी अस्तित्वात नाही, असं म्हणण्यासारखं होईल. आपण स्वतः अस्तित्वात असेपर्यंत तरी, तसं कधी म्हणूही शकणार नाही.

मग अश्रद्धा म्हणजे काय उरतं, तर मी श्रद्धेबद्दल जागा नाही, एवढंच. मनुष्याला झोप लागते, त्यावेळी मनुष्य म्हणून तो त्याच्या सगळ्या अस्तित्वाला विसरलेला असतो, जागा नसतो. पण असं असलं तरी, मनुष्य झोपला म्हणजे गेला, असं नव्हे. तसंच मनुष्य अश्रद्ध असला किंवा आपण तसं म्हणत असलो, तरी त्याचा अर्थ, तो श्रद्धेच्या बाबतीत किंवा तिच्या शक्तीच्या, स्वरूपाच्या बाबतीत झोपी गेलेला आहे - जागा नाही, एवढाच आहे.

मनुष्य झोपी गेला तर, त्याचे दृश्य व्यवहार एकवेळ थांबतील, पण अदृश्य व्यवहार आणि अस्तित्व कायमच असतात. फक्त तो जागा झाला की, ते व्यवहार परत सुरू होतात. तसंच श्रद्धेबद्दल जागा नसला तरी, श्रद्धा अस्तित्वात असतेच. फक्त तिचे व्यवहारातले परिणाम दिसत नाहीत. कधी काही कारणानं तो जागा झाला की, ते सुरू होतात. श्रद्धा कायम असतेच !

**

*४. अनेकदा श्रद्धा ठेवून फसवणुकी का होतात ?*

श्रद्धेचा मूळ अर्थ माहीत नसल्यानं किंवा लक्षात न राहिल्यानं अशा फसवणुकी होऊ शकतात. तुम्ही स्वतः अस्तित्वात आहात, तितकंच जग आणि भगवंतही अस्तित्वात आहे - या श्रद्धेच्या स्वरूपाबद्दल फसवणूक कधीच होऊ शकत नाही. कारण तुम्ही स्वतःच्या अस्तित्वावर श्रद्धा ठेवली आहे आणि ती खरी ठरली नाही, त्यात फसवणूक झाली - असा अनुभव तुम्हाला जिवंतपणीयेणं कधीच शक्य नाही.

फसवणूक कुठं होते, तर आपण कशावर तरी श्रद्धा ठेवतो, मग तो साधा पाषाणाचा देव असो, कुठलं झाडपेड असो, कुठलंलौकिक स्थान असो, कुणी व्यक्ती असो - त्यात आपल्याला अपेक्षित ते मिळालं नाही, की आपल्याला ती फसवणूक आहे, असं वाटतं. खरंतर, यात आपल्या फायद्यासाठी आपण ठेवलेला तो विश्वास असतो, ती श्रद्धा नसतेच. हा तर व्यवहारच झाला. तसं तर व्यवहारात फसवणूक होऊ शकतेच. त्यातही पुन्हा आपण जर आपला फायदा बघणार असू आणि त्यासाठी विश्वास ठेवणार असू, तर जगही स्वतःचा फायदा बघेल आणि अर्थातच आपलं नुकसान होईल. व्यवहारातल्या विश्वासात असा नफा-तोटा गृहीत आहे.

आपली अस्तित्वावरची निरपेक्ष श्रद्धा असेल, तर नफ्या-तोट्याचा-फसवणुकीचा प्रश्न उद्‌भवत नाही. कारण श्रद्धेनं, अर्थातच निखळ अस्तित्वानं जे घडतं, ते असं वैयक्तिक नसतं, वैश्विक कल्याणाचं असतं. त्यात तुम्हाला तात्कालिक लाभ-हानी असू शकते. पण फसवणूक नक्की होत नाही. कल्याण मात्र तितकंच नक्की साधतं.

त्यामुळं शुद्ध श्रद्धेबद्दल सतत जागं राहावं, म्हणजे फसवणुकीचा प्रश्न निर्माण होणारच नाही !

**

*५. अनेकदा मोठी माणसं एरवी बुद्धिमान, कर्तृत्ववान, अनुभवी असून श्रद्धा न ठेवताही यशस्वी होताना का दिसतात ? त्यांना श्रद्धेची गरज का पडत नाही ?*

लौकिकातल्या कामांसाठी ज्या कौशल्याची, बुद्धिमत्तेची, तंत्रज्ञानाची, शरीरशक्तीची, व्यावसायिक संबंधांची - अशा ज्याज्या घटकांची गरज असते, ते घटक त्यात्या व्यक्तींजवळ असतात. म्हणून अशी माणसं यशस्वी होताना दिसतात.

श्रद्धेशिवाय अशी लौकिक यशं मिळणार नाहीत, असं 'आपल्याला' वाटतं. ते जरा तपासून बघावं लागेल. खरं तर त्याचं उत्तर असं की, एकतर ज्यांना असं यश मिळतं, त्यांच्या जीवनाचं निरीक्षण केलं, तर आपल्याला असं आढळेल, की त्यांच्या ठिकाणी त्यांनी हाती घेतलेलं काम यशस्वी होणार, अशा तऱ्हेचा सकारात्मक आत्मविश्वास असतो.

दुसरं म्हणजे, काम यशस्वी होण्यासाठी लागणाऱ्या आणि त्यांच्याकडं असलेल्या सर्व क्षमतांचा ते निरलसपणे पूर्ण वापर करतात. तिसरं म्हणजे अशा व्यक्तींना त्यांच्या या प्रवासात अपयशं येत नाहीत, असं नसतं, पण त्यांच्या ठिकाणच्या मूळ सकारात्मक आत्मविश्वासामुळं ते त्या अपयशानं खचून जात नाहीत, काम थांबवीत नाहीत. म्हणून ते शेवटी यशस्वी होतात.

या सगळ्याचा भावार्थ असा झाला की, या साऱ्याची सुरुवातही त्यांच्या आत्मविश्वासावर झालेली आहे. याचाच अर्थ, त्यांची स्वतःवर श्रद्धा आहे. ती नसेल तर, आत्मविश्वासही निर्माण होत नाही. फक्त आपल्या श्रद्धेच्या ज्या रूढ कल्पना आहेत, त्यात ही 'आत्मश्रद्धा' आहे, हे लक्षात येत नाही. कदाचित ते त्यांच्याही लक्षात येत नसेल. कारण त्यांच्याही श्रद्धेच्या कल्पना रूढ अर्थाच्या असू शकतात. मग, काही वेळेला माझी कुठल्या दैवतावर, संतांवर, मूर्तीवर श्रद्धा नाही, असे उद्‌गार आपल्याला ऐकायला मिळतात

आणि ते अश्रद्ध आहेत, अशी त्यांची आणि आपलीही समजूत होते.

थोडं पुढं जाऊ. मूळ श्रद्धा ही निरंतर अस्तित्वात असलेली, निरंतर कार्यरत असलेली, ध्येयाचं सतत स्मरण असलेली, त्या दिशेनं वाटचाल करणारी, वाटेतल्या अडथळ्यांवर मात करून सतत शाश्वत ध्येयाच्या दिशेनं पुढं जाणारी शक्ती आहे.

आता इथला विषय लौकिकातल्या ध्येयाचा आहे. याच साऱ्या गोष्टी त्यांनीही लौकिक ध्येयासाठी केलेल्या आहेत. म्हणज त्या अर्थानं ते सश्रद्धच आहेत. फक्त ते आत्ता लौकिक जीवनातल्या ध्येयाविषयी श्रद्धावान आहेत.

इथं आणखी एक गोष्ट लक्षात घेणं आवश्यक आहे. श्रद्धा या शब्दाच्या अर्थाची पूर्ण कल्पना जर असेल, तर हे समजून घेणं सोपं होईल. ही जी बुद्धिमान, यशस्वी, कर्तृत्ववान माणसं आहेत, तीती त्यात्या क्षेत्रांत आपल्याला यशस्वी दिसतात. पण ते यश आणि त्यामागचं कर्तृत्व या दोन्हीही गोष्टी अपुऱ्या आहेत.

शिवाय त्याचे होणारे परिणामही किंवा तोतो व्यवसाय, त्यात्या यशाचा विषय हेही काही काळ टिकणारे आहेत. कारण कित्येक बाबतीत यश मिळतं, पण ते तसंच मिळत राहात नाही. काही वेळा मिळालेलं यश हे लोकांना मोठं, आकर्षक वाटत असलं तरी, त्यांना स्वतःला ते समाधानात ठेवीत असतंच असं नाही. हे उदाहरणानं अधिक पटेल.

विलक्षण कर्तृत्व असलेली माणसं एखादा मोठा उद्योग यशस्वी करताना दिसतात. रूढ अर्थानं त्यांची कुणावर श्रद्धाही नसते. पण आलेल्या यशानं मिळालेला पैसा, वाढत गेलेल्या स्थावर, जंगम मालमत्ता- त्याच्या वाटण्यांवरून, साठवण्यावरून, गुंतवणुकींवरून त्यांच्यातच मतभेद निर्माण करताना दिसतात. त्यांच्या अस्वास्थ्यालाही यशंच कारणीभूत होतात.

लोकांना लांबून फक्त यश दिसतं, पण हे अंतर्गत कलह व त्यांना भोगावी लागणारी अशांती - अशा गोष्टींची लोकांना कल्पना

नसते. त्या गोष्टी जेव्हा कधी विकोपाला जातात किंवा कोर्टकचेरीत जातात, तेव्हा कधी हे कळलं आणि त्याचा अर्थ कळला, तर लौकिक ध्येयं ही अपूर्ण आणि अशाश्वत असतात, हे लक्षात येऊ शकेल. मग अशा यशस्वी बिझनेस हाउसेसमधल्या सर्वांत वरच्या वर्तुळांत किंवा ते चालवणाऱ्या कुटुंबांतले संघर्ष, अशांती, त्रास का दिसतात, ते लक्षात येईल.

त्याचबरोबर हीच बाब इतर क्षेत्रांतल्या व्यक्तींबद्दल असलेली लक्षात येईल. एखादे सत्ताधारी, राजे, नेपोलियन, सिकंदर, हिटलर-अशा तऱ्हेच्या लौकिकदृष्ट्या प्रचंड कर्तृत्व, बुद्धी, अनुभव आणि त्यामुळं यश, असं असलेल्या व्यक्तींच्या बाबतीतही आपल्यालाही श्रद्धेची बाब तपासून पाहाता येईल. अशी माणसं शेवटी सामान्य माणसाला शेवटपर्यंत असलेल्या शांतीपेक्षाही खालच्या अवस्थेत जाऊन का पडतात - हे कळायला श्रद्धेचं जे शाश्वत-अशाश्वत याबद्दलचं स्वरूप आहे, ते समजून घेणं गरजेचं ठरेल. खरी श्रद्धाही अशाश्वत गोष्टींबद्दल-जगाबद्दल उदासीन नसते, पण ती ते अंतिम मानीत नाही. ती जे शाश्वत आहे, ते अंतिम मानते.

या यशस्वी माणसांच्याबद्दलची दुसरी बाजूही इथंच लक्षात घेऊ. लौकिकदृष्ट्या कर्तृत्ववान, बुद्धिमान आणि यशस्वी असलेली माणसं ही अशा तऱ्हेनं शाश्वताचं भान राखल्यामुळं, खऱ्या अर्थानं सश्रद्ध असतानाही दिसतात. ते भान असल्यामुळं लौकिकातलं कर्तृत्व करूनही, ते शेवटी या अंतिम कर्त्या भगवंताचं स्वरूप ओळखून, यांतलं कुठलं यशापयश आपल्या मनात न घेता, म्हणज त्या अर्थानं श्रद्धेची जाग कायम ठेवून असतात. म्हणून त्यांच्या वाट्याला असली अशांती येत नाही.

कदाचित लौकिक कारणामुळं किंवा परिस्थितीतल्या बदलामुळं यशाचं अपयश झालं, कीर्तीची अपकीर्ती झाली, कारखानाव्यवसाय सुरूचा बंद झाला - तरी त्यांच्या श्रद्धेचं स्वरूप

व्यापक असल्यामुळं, या श्रद्धेत जो शाश्वत भगवंत कर्ता आहे, त्याच्या इच्छेप्रमाणं हे घडत असून, ते आपल्या कल्याणाचंच आहे, यावर त्यांची ठाम श्रद्धा असते. त्यापोटी ते लौकिक यश किंवा अपयश अशा दोन्ही अवस्थांत शांत आणि समाधानी राहू शकतात.

यावरून हे स्पष्ट होईल की, एरवीची बुद्धिमान, कर्तृत्ववान, मोठी माणसं यशस्वी होतात, तीही सश्रद्धच असतात. फक्त त्यांची श्रद्धा, त्यांचं अस्तित्व - मर्यादित लौकिक व्यवहारातल्या यशापुरतं म्हणजे, 'अशाश्वत' गोष्टींपुरतं काम करीत असतं. तर अशीच इतर बुद्धिमान, कर्तृत्ववान, मोठी माणसं श्रद्धेचं खरं आणि पूर्ण स्वरूप जाणून काम करीत असल्यामुळं ती अशाश्वत गोष्टी यशस्वी करतानाही शाश्वताचं, खऱ्या कर्त्याचं, जग चालवणाऱ्या सुनियंत्रित व्यवस्थेचं भान राखू शकतात. त्यामुळं त्यांची श्रद्धा खरी आणिपूर्ण असल्यामुळं त्यांना कसल्याही लौकिक परिस्थितीत समाधानी ठेवू शकते.

त्यामुळं मूळ प्रश्न अश्रद्धेचा नसून, ती कोणत्या पातळीवर काम करते आणि तिचं खरं स्वरूप समजलं तर, आपल्याला कोणत्या पातळीवर काम करता येऊ शकतं, याचा आहे. श्रद्धेच्या खऱ्या स्वरूपाची कल्पना नसल्यामुळं, काही माणसं स्वतःला अश्रद्ध समजतात किंवा लोकांना तसं सांगतात, एवढंच !

**

याचं खरं उत्तर श्रद्धेनं सगळे प्रश्न सुटतात, असं नसून श्रद्धेनं प्रश्न निर्माणच होत नाहीत, असं आहे !

असं का आहे, ते पाहू. मुळात प्रश्न निर्माण होतात, ते बुद्धीवर अवाजवी विश्वास असल्यामुळं आणि आपण मनाच्या ताब्यात असल्यामुळं ! श्रद्धा ही बुद्धीच्या पलीकडची वस्तू आहे. तिला बुद्धीचं वावडं नाही. पण ती बुद्धीच्या मर्यादा ओळखू शकते. त्यामर्यादेमध्ये तिचा उपयोग करून घेऊ शकते. बुद्धी असंख्य प्रश्ननिर्माण करते, पण त्यातले निम्मेसुद्धा सोडवू शकत नाही. तिच्यात बसणाऱ्या गोष्टीच फक्त खऱ्या आहेत, असा तिचा भ्रम असतो. विश्वाची, जगाची व्यवस्था किंवा अगदी स्वतःच्या आयुष्याची व्यवस्था काय - तिचे प्रश्न सोडवणंसुद्धा तिच्या हातात नाही. कुठं राहाणार, कुठली नोकरी, कुणाशी व्यवहार, कोणती-किती मुलंबाळं, कुणाशी विवाह - अशा साध्या, पण व्यवहाराच्या दृष्टीनं महत्त्वाच्या असलेल्या गोष्टींबद्दलसुद्धा तिच्याकडं निश्चित निर्णय किंवा भविष्याची खात्री नसते. तरी बुद्धी ते सारं सोडवायला जाते आणि शेवटी माणसाला घोटाळ्यात टाकते. मन आपल्यापरीनं स्वार्थ, भय, अहंकार मिसळून सरळ असलेल्या गोष्टींचे प्रश्न निर्माण करतं. त्याचं आपल्याला भय दाखवतं आणि मी ते सोडवीन असं म्हणत, आपल्याला शेवटी मनही घोटाळ्यात नेऊन टाकतं.

याच बाबतीत खऱ्या श्रद्धेची भूमिकाच वेगळी असते. ती एका मर्यादेपर्यंत बुद्धी आणि मन वापरते आणि मग जे होणार आहे, ते कल्याणाचं आहे, याची खात्री असल्यामुळं, कुठले प्रश्न निर्माण न करता, आज जगते आणि उद्यालाही सामोरं जाते. श्रद्धा म्हणजे भगवंताची सोबत. त्यामुळं प्रश्नच पडत नाहीत. शिवाय चित्त शांत राहातं, ते वेगळंच !

**

## ७. श्रद्धा ठेवण्यात आपण बुद्धी गहाण टाकल्यासारखं होतं का?

हा प्रश्न विचारण्यामागं अशी शंका आहे की, श्रद्धा ठेवायची म्हणजे बुद्धी वापरायची नाही का? त्यात पुन्हा श्रद्धा ठेवणं म्हणजे, जो या शब्दाबद्दलचा रूढ अर्थ आहे, त्यात अभिप्रेत असल्याप्रमाणं कुणावर तरी श्रद्धा असणं, कुणीतरी सांगितलेलं ऐकणं - त्याला धरून हा प्रश्न निर्माण होतो. मग त्यात आपल्या बुद्धीचा वापर करणं-न करणं हे प्रश्न उद्‌भवतात.

मुळात प्रत्येक माणसाला ज्याज्या शक्ती दिल्या आहेत, त्यात काही आधारभूत आणि व्यापक अशा शक्ती आहेत आणि काही विशिष्ट कामासाठी उपयोगात आणायच्या अशाही शक्ती आहेत. त्यातली श्रद्धा ही अशी जिवंतपणासारखी व्यापक शक्ती आहे. तर, बुद्धी ही माणसाच्या कृती बरोबर व्हाव्यात म्हणून, त्याला साधक-बाधक, सार-असार, योग्य-अयोग्य, शाश्वतअशाश्वत- असे जे विचार करावे लागतात, त्यासाठी लागणारी शक्ती आहे. म्हणजेच बुद्धी ही व्यवहार योग्य व्हावेत, म्हणून वापरण्यासाठी गरजेची असलेली, शक्ती आहे.

एखादी लढाई असली, तर तिच्यामध्ये नियोजन, शस्त्रांची सज्जता, शत्रूंचा अंदाज, विजयाचं लक्ष्य, त्यासाठी लागणारे डावपेच, संभाव्य धोके-अडचणी अशांसारख्या अनेक गोष्टींवर विचार करायला लागतो. त्यावेळी जसं संघर्षाला तलवार किंवा तत्सम शस्त्राची जरूर लागते, तशी हे सारे विचार करायला बुद्धीच्या शस्त्राची जरूर लागते. लढाई नसताना किंवा शांततेच्या काळामध्ये या पद्धतीच्या शस्त्रासारख्या बुद्धीची जरूर नसते. म्हणून लढाई संपली की, तलवार म्यानातच ठेवायची असते. तिची उपयुक्तता होती, पण ती त्या काळात. एरवीच्या काळी ती बाजूला ठेवणं, याचीसुद्धा गरज असते.

तशी माणसाच्या आयुष्यात येणाऱ्या प्रसंगांत वा करायच्या

कामांत बुद्धीच्या साहाय्यानं होणारे विचार करणं गरजेचं असतं. एखाद्या कौटुंबिक प्रसंगातून मार्ग काढणं, एखादा निर्णय घेताना साधक-बाधक विचार करणं, संशोधनाच्या किंवा न्यायदानाच्या बाबतीत आधार, पुरावे यांचा तर्कसंगत मेळ घालून निष्कर्ष काढणं - या सगळ्या ठिकाणी बुद्धीची गरज आहे. आपण त्यासाठी बुद्धी आणि तिच्या साहाय्यानं होऊ शकणारे हे विचार होऊ द्यावेत. बुद्धी वापरावी.

पण बुद्धी म्हणजे माणसाला दिलेल्या शक्तींतली एक शक्ती आहे, हे लक्षात घ्यावं. सगळेच प्रश्न बुद्धीच्या कक्षेत मोडत नाहीत. माणुसकी, करुणा, प्रेम, सहानुभूती - या आणि अशा असंख्य भावांचीही शक्ती माणसाच्या ठिकाणी आहे. त्यांची गरजही आहे. त्यानुसार आपले अनेक व्यवहार होत असतात. फक्त या शक्तीच्या बाबतीतही, कधीतरी कर्तव्यासाठी त्या भावना बाजूला ठेवाव्या लागतात.

माणसाच्या ठिकाणी अशा तऱ्हेच्या अनेक शक्ती आहेत. त्यांचात्यांचा वापर करणं-न करणं, त्या बाजूला ठेवणं हे सगळं सामान्य माणसाच्या व्यवहारात स्वार्थ, मतलब, अहंकार अशा प्रेरणांनी केलं जाण्याची शक्यता जास्त असते, नव्हे तसा अनुभवही आपल्याला प्रत्यक्ष येईल. म्हणून या साऱ्या शक्तींना वापरणं, बाजूला ठेवणं, वेळी पूर्ण तटस्थ-साक्षी राहाणं आणि कुठल्याही परिस्थितीत अंतिम कर्तृत्वाच्या-कल्याणकारी असलेल्या भगवंताच्या भगवंताच्या अस्तित्वाचं भान ठेवून, हे सारं करणं आवश्यक असतं. ते करणारी माणसामधली पूर्ण व्यापक आणि सर्वोत्तम शक्ती म्हणजे श्रद्धा होय. तिची पूर्ण आणि खरी ओळख ही गरजेची आहे, ती यासाठी.

तिच्या प्रकाशात आधी पाहिलं तसं कधी बुद्धी, कधी भावना, कधी कल्पना, कधी संबंध - अशा अनेक गोष्टी योग्य वेळी बाजूला ठेवणं किंवा वापरणं याचं भान आणि व्यवस्थापन श्रद्धा

करीत असते. आता हे करताना तिला जशा कधी कल्पना, कधी भावना, कधी संबंध अंतिम हितासाठी बाजूला ठेवावे लागतील, तशीच कधी श्रद्धेला बुद्धीही बाजूला ठेवावी लागेल. म्हणून त्या अर्थानं बुद्धीच्या कक्षेत न येणाऱ्या गोष्टींच्या बाबतीत बुद्धी बाजूला ठेवणं, म्हणजेबुद्धी गहाण टाकणं नसून, बुद्धीच्या मर्यादा ओळखून, केलेलं ते श्रद्धेचंच नव्हे, तर बुद्धीचंही परिपक्व कार्य होय.

साध्या स्वतःच्या कामांत जे काम आपल्याला खरोखर व्यवस्थित येतं, ते काम मनापासून करणं आणि जे आपल्याला जमत नाही, ते ओळखून, ते काम ज्याला जमतं, त्याच्या हाती देणं आणि आपण शांतपणे बाजूला राहाणं, हे साध्या जीवनातही आदर्श असतं. ते न केलं, तर उलट गोंधळ होतो, स्वतःचा, कामाचा आणि इतरांचाही. हे ज्याच्या लक्षात येईल, तो मनुष्य जसा अधिक समजूतदार आणि योग्य ठरेल, तसंच असं वेळेला बुद्धी बाजूला ठेवणं समजूतदार आणि योग्य ठरेल.

हे काम अर्थातच बुद्धी, भावना, तर्क, कल्पना - असल्या माणसाला दिलेल्या कुठल्याही देणग्यांचा वापर करणं किंवा न करणं, हे त्यांच्यापेक्षा मोठ्या असलेल्या आणि परिपक्वपणे आपल्याला ध्येयाकडं नेऊ शकणाऱ्या समर्थ शक्तीचं कार्य आहे. ती समर्थशक्ती म्हणजेच श्रद्धा होय. तिच्या प्रकाशात या प्रत्येक गोष्टीची क्षमता, मर्यादा, अडथळा हे सारं ध्यानात येऊ शकतं. मग बुद्धीसारख्या सगळ्या घटकांचा योग्य वापर करता येतो. त्या अर्थानं इतर शक्तींप्रमाणंच काही वेळेला बुद्धी बाजूला ठेवावी लागते. पण ती गहाणही टाकली जात नाही आणि तिचा योग्य वेळी वापरही केला जातो. जसं एखाद्या क्षेत्रातल्या कामाच्या बाबतीत त्यातल्या पूर्ण जाणकार माणसाचं ऐकून, म्हणजेच अर्थात त्यावेळी आपली बुद्धी बाजूला ठेवून काम करणं, आपल्याच हिताचं असतं, तसंच बुद्धीच्या शक्तीच्या बाहेरच्या क्षेत्रात काम करताना बुद्धी बाजूला ठेवणं हिताचं असतं. ते कार्य श्रद्धेच्या मदतीनं होतं, हे तिचे उपकार !

**

*८. श्रद्धेनं पर्वतही हालतील, हे म्हणतात, ते खरं आहे का ?*
*असल्यास कसं ?*

श्रद्धेनं पर्वतही हालतात, हे म्हणणं खरं आहे ! फक्त ते म्हणणं आलंकारिक आहे. त्यात अभिप्रेत अर्थ - अशक्य गोष्टी शक्य होतील, हा आहे. त्या अर्थानं ते खरं आहे !

तसं पाहिलं तर, प्रत्यक्षात अशा तऱ्हेनं व्यवहारात पर्वत हालवावाही लागत नाही आणि त्याची गरजही नाही. मात्र, आत्ता पाहिलं त्याप्रमाणं, एरवी बुद्धीनं ज्या गोष्टी अशक्य वाटतात, पण घडणं आवश्यक वाटतं - त्या गोष्टी घडण्याची शक्यता, शक्ती, अनुकूलता-हे नसल्यामुळं त्या घडणार नाहीत, असं आपली बुद्धी आपल्याला सांगते. ते बुद्धीच्या मर्यादेत खरं असलं तरी, 'श्रद्धे'ची शक्ती, ही बुद्धीच्या कितीतरी पट मोठी आहे, हे आपण आधी पाहिलंच आहे. त्या श्रद्धेच्या बळावर, या अशक्य वाटणाऱ्या गोष्टी, प्रत्यक्षात घडतात. या अर्थानं श्रद्धेनं पर्वत हालतात !

आता असं का आणि कसं होतं ते पाहू. एखाद्या माणसाच्या शरीरातली शक्ती ही दहा किलो वजन उचलण्याची आहे. त्याला वीस किलो वजन उचलायला सांगितलं तर, ते बुद्धीनं अशक्य दिसतं. पण त्यासाठी हातभार लावणारा दुसरा कोणी तिथं आला, त्यानं मदत केली, तर ते वीस किलोचं वजन उचललं जाऊ शकतं. आता यात त्याच्या बुद्धीनं तिच्या मर्यादेत ते अशक्य ठरवलं, हे बरोबर आहे. पण अशा बुद्धी, शक्ती, भावना, कल्पना - या साऱ्यांना ओलांडून, सर्वसमर्थ भगवंतापर्यंत पोचू शकणारी शक्ती म्हणजे श्रद्धा होय. ती प्रत्येकाच्या ठिकाणी आहे. तिच्याबद्दल आपण जागे असू आणि बुद्धीच्या मर्यादा आपण ओळखलेल्या असल्या तर, आपण श्रद्धेला आवाहन करू शकतो. ती आपल्यात आहेच, ती जागीही आहे आणि विश्वशक्तीशी जोडलेलीही आहे. त्यामुळं इथं जसं दुसऱ्या माणसाच्या मदतीनं, बुद्धीच्या मर्यादेत अशक्य असलेलं

कार्य घडतं, तसं आपल्यातल्या या श्रद्धेच्या असीम शक्तीच्या साहाय्यानं, अशी अशक्य वाटणारी कार्यं घडतात. आता मदत करणारी व्यक्ती बाहेर नसून, ती म्हणजेच आपल्या आतली श्रद्धा, भगवंत असतो, हे लक्षात घ्यावं.

अशा वेळी नेमकं काय घडतं ? तर श्रद्धेला आणि त्याअर्थानं भगवंताला काहीच अशक्य नसल्यामुळं, आपण आपल्या बुद्धीची मर्यादा ओळखून, त्या अर्थानं समजूतदारपणे प्रार्थना करतो की, माझ्या बुद्धीच्या अनुसार माझी ताकद संपली. आता यापुढचं काम, तुम्ही बघा. तर ती जबाबदारी श्रद्धेवर आणि पर्यायानं भगवंतावर येऊन पडते. ते एवढंच पाहातात की, यानं आरंभलेलं काम हे त्याच्या अंतिम हिताचं आहे की नाही. ते हिताचं असेल तर, त्यासाठी आपल्यातच असलेल्या आणि बुद्धीच्या कक्षेत न बसणाऱ्या इतर कल्पना, भावना, एकाग्रता - अशा अनेक सुप्त शक्ती श्रद्धा जागृत करते. कारण ती या सगळ्यांना जाणून असते आणि ती त्याही पलीकडं असते. त्या शक्तींची मदत घेऊन, ती ते काम करते.

मग एक प्रश्न असाही वाटू शकेल की, मग हे काम बुद्धीच का करीत नाही ? तर, मानवी बुद्धी मुळात एकतर मर्यादित असते आणि तिला आपण जणू अमर्याद आहोत, असा अहंकार असतो. यामुळं जसा एखादा अहंकारी माणूस हा दूरदृष्टीचाही नसतो, दुसऱ्याशी सुसंवादीही नसतो आणि त्याला दुसऱ्याची मदत घेण्यात कमीपणा वाटतो - त्यामुळं बुद्धीला हे काम करता येत नाही. असे घटक बुद्धीत नसतील तर, बुद्धी श्रद्धेलाच शरण जाईल. तरीही ते काम होईलच.

फक्त साधारणपणे ते काम बुद्धीला का होत नाही किंवा अनेकांना ते पटत का नाही, अशक्य का वाटतं - याचं उत्तर या मर्यादित आणि अज्ञानी बुद्धीत असतं. तिच्या मर्यादा ओळखल्या, श्रद्धेवर सोपवू शकलो तर पर्वतही हालतातच !

**

## ९. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि श्रद्धा यांत विरोध आहे का ?

श्रद्धा ही माणसातली सर्वव्यापी, अस्तित्वमय, सकारात्मक अवस्था आहे. त्यामुळं माणसाच्या जीवनाच्या कुठल्याही अंगाशी तिचा कधी विरोध असत नाही. जसे शरीरात वेगवेगळी कामं करणारे हात, पाय, डोळे, कान, हृदय - असे अनेक अवयव असले आणि ते वेगवेगळे दिसत असले तरी, त्यांना सुनियंत्रित ठेवणारी मेंदूसारखी यंत्रणा ही यांतल्या कुठल्याच अवयवाच्या विरोधात नाही. उलट त्यांचं व्यवस्थापन करून, ते सर्व सुसंवादी ठेवून, ती माणसाचं इच्छित ध्येय त्याला गाठून देते. तसंच श्रद्धेचं आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोन आणि श्रद्धा यांत त्याअर्थानं विरोध असणार नाही, हे उघडच आहे. त्यातल्या त्यात या प्रश्नात आपल्याला काय म्हणायचं आहे, ते समजून घेऊ. मुळात विज्ञान म्हणजे विशिष्टाचा, विशेषतः दृश्य जगाचा, बुद्धीच्या साहाय्यानं, तर्कसंगतपणे अर्थ लावून, त्यातले कार्यकारणभाव शोधून, सतत प्रयोगशील राहून, स्थलकालाच्या मर्यादेत, पण त्यातल्या त्यात जगात कुठंही सारखेच खरे राहू शकणारे संबंध शोधून काढणं आणि शक्य असल्यास ते नियंत्रित करणं होय.

यासाठी माणसाच्या ठिकाणची बुद्धी, त्यावर अवलंबून असलेली त्याची विचारशक्ती,विश्लेषण-संश्लेषण शक्ती, तर्कशुद्धता - या जेवढ्या प्रगल्भ असतील, त्याप्रमाणात जगात असलेल्या आणि घडणाऱ्या दृश्य घटनांचा उलगडा त्याला करता येतो. त्यामुळं अशा प्रगल्भ व्यक्ती विज्ञानाच्या क्षेत्रात मौलिक, नेत्रदीपक संबंध शोधून काढतात, सिद्धान्त मांडतात. तर, इतर व्यक्ती त्या संबंधांचा वापर करून, निर्माण केलेलं ज्ञान किंवा त्यावर आधारलेली यंत्रं, शस्त्रं, शास्त्रं - यांचा वापर करतात. त्याअर्थानं, अशा बहुसंख्य व्यक्ती स्वतंत्रपणे कार्यकारणसंबंध, संशोधनं केलेल्या नसल्या तरी, संशोधनाच्या साहाय्यानं निर्माण झालेल्या यंत्रांचे, वस्तूंचे वापर

करण्या इतपत बुद्धी, तर्क म्हणजे त्या अर्थानं विज्ञान वापरू शकतात. तितपत वैज्ञानिक दृष्टिकोनही बाळगतात.

यात अडचण कुठं आहे, त्याचा विचार करू. प्रगल्भ शास्त्रज्ञ असोत किंवा त्यांनी निर्माण केलेल्या गोष्टींचा वापर करणारं इतर सर्वसामान्य, बुद्धिमान जग असो - सर्वांची भिस्त, हे जग कार्यकारणभावानं बद्ध आहे, या गृहीतकावर आधारलेली आहे. त्यात दृश्य जगाशी जास्त संबंध येत असल्यामुळं यंत्रं, वस्तू, जगातल्या-निसर्गातल्या यंत्रणा व त्यांचं कार्य हे डोळ्यांना दिसत असल्यामुळं, त्याची अधिक खात्री वाटते.

त्यातून नकळत आपण स्वतःला, जगाला अशाच पद्धतीनं, वैज्ञानिक दृष्टिकोनानं, बुद्धीच्या साहाय्यानं समजू शकू - असा समज निर्माण होतो. त्याचबरोबर यात जे बसत नाही, ते खरं नसलं पाहिजे किंवा असणार नाही, अशीही एक समजूत नकळत होऊन बसते. बुद्धिप्रधान व्यवहारामुळं ती समजूत वयानुसार अधिकाधिक पक्कीही होत जाते.

यावर विचार करण्याची मूलभूत गरज आहे. एकतर, ज्याचा कार्यकारणभाव समजू शकत नाही, शोधता येत नाही, टाळता येत नाही - असं प्रचंड जग माणसाच्या अनुभवाला येत असतं. अगदी साधं म्हणजे, एखादा मनुष्य दुसऱ्या माणसाशी कसा वागेल, तो बाहेर वागताना दिसतो, तसंच त्याच्या मनात असेल की नाही, आज तो असा वागला तर, तो उद्या तसाच वागेल की नाही, इतकंच काय, आपण स्वतःही नक्की कसे आहोत आणि कसे वागू - यांसारख्या अनेक बाबी माणसाला अनुभवाला येतात आणि त्याची उत्तरं या वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या मर्यादेत देता येत नाहीत.

शिवाय जे आपल्याला दिसत नाही - दृश्य स्वरूपाचं नाही, तरीही अनुभवाला येतं, किंबहुना माणसाच्या अनेक वर्तनांचं कारण असतं -ते मन,या कुठल्या वैज्ञानिक पद्धतीनं,बुद्धीनं दिसतही नाही, आकलनही करता येत नाही. एकवेळ आचरण किंवा वर्तन दिसेल,

पण त्यामागची कारणं अदृश्य राहातात, उलगडता येत नाहीत. इतर वैज्ञानिक प्रयोगांत जसे कार्यकारणभाव निश्चिततेनं सिद्ध होऊ शकतात, तसे त्याबाबतीत सिद्धही करता येत नाहीत. त्यामुळं अर्थातच, अमर्याद असं अदृश्य विश्व या वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या - बुद्धीच्या कक्षेबाहेर राहातं. ते अस्तित्वात असतं, कार्यशील असतं आणि आजवरचा इतिहास पाहाता, ते तसंच बुद्धीच्या कक्षेच्या बाहेर राहाणार आहे.

त्याशिवाय असंही एक दुसरं विश्व आहे. माणसाच्या आयुष्यात असंख्य घटना घडतात, अनेक बदल-घडामोडी होतात, त्या तर त्याच्या प्रत्यक्ष अनुभवाला येत असतात. त्यामुळं त्याअर्थानं त्या खऱ्या असतात. पण त्यांचे कार्यकारणभाव त्याला बुद्धीनं शोधता येत नाहीत. एकाच घरातली, सारख्याच संस्कारांत वाढलेली दोन मुलं दोन टोकांच्या स्वभावांची निघतात, विशिष्ट गावी-विशिष्ट काळच त्याला राहावं लागतं, त्याच्या कल्पनेत नसलेल्या माणसांशी त्याचा तात्पुरता किंवा कायमचा संबंध येतो, कुणी अपरिचित व्यक्ती त्याला अचानकपणे मोठी मदत करून जाते,त्याचबरोबर कुणी विश्वासू व्यक्ती वेळेला त्याच्या मदतीला येत नाही-या आणि अशासारख्या असंख्य गोष्टी प्रत्यक्ष घडत असून, त्याला प्रत्येकाला सामोरं जावं लागत असूनसुद्धा-त्याची तथाकथित वैज्ञानिक बुद्धी, दृष्टिकोन, तर्क-त्यांचा अर्थ लावू शकत नाहीत. तो अर्थ न लागल्यानं, अर्थातच त्यांच्यावरचं नियंत्रणही त्याला करता येत नाही. हे मान्य करणं समजूतदारपणाचं, प्रामाणिकपणाचं आहे.

या पार्श्वभूमीवर विचार केला आणि श्रद्धेचा आधी पाहिलेला व्यापक अर्थ पाहिला तर, बुद्धीपेक्षा श्रद्धेचा पट कितीतरी विस्तीर्ण असतो. त्यामुळं यांतल्या अनेक घटनांचा एकतर,अर्थ लागतो किंवा काहींचा अर्थ लागला नाही तरी, अस्वस्थता येत नाही. शिवाय काहींचा अर्थ न लागणं, हेच योग्य आहे, अशीही स्वस्थता मनाला असते. त्याच्याचबरोबर श्रद्धेमध्ये जी अस्तित्वरूप भगवंताच्या

कल्याणकारी यंत्रणेची निःसंशय खात्री असते, तिच्यापोटी अशा काही घटनांचे अर्थ आपल्याला लागले नाहीत तरी, ते लागलेच पाहिजेत, अशी बुद्धीत निर्माण होणारी ऊर्मी, श्रद्धावान व्यक्तीत नसते आणि त्याअर्थानं ती त्याला त्रास देत नाही. अस्वस्थ करीत नाही. एखादं आपल्या कक्षेत न बसणारं किंवा न जमणारं काम दुसऱ्या समर्थ माणसावर सोपवल्यावर, मनुष्याच्या मनाला जी निश्चिंतता असते, ती निश्चिंतता श्रद्धा त्याला देत असते.

आधी पाहिलेल्या उदाहरणात अगदी सहज समजू शकणारी ही गोष्ट आहे. डोळ्यांना धोकादायक असलेली एखादी वस्तू किंवा एखादा साधा कणही, डोळ्यांसमोर यायच्या आत, क्षणार्धात पापणी का मिटली जाते, याचा विचार पाय करीत नाही आणि त्यानं तो करण्याची गरजही नाही. तसंच पावलाच्या पुढं काटा आहे, हे डोळ्यांनी लक्षात आणून दिल्यावर, पटकन पाय त्याच्यापुढं का टाकला जातो, याचा विचार हात करीत नाही आणि तो करण्याची हाताला गरज नाही. कारण हे सर्व सांभाळणारी यंत्रणा या एखाद्या अवयवापेक्षा खूप व्यापक, शरीराचं हित बघणारी असते. प्रत्येक अवयव स्वतंत्रपणे पूर्ण असला आणि आपलं काम करीत असला तरी, तो या मूळ व्यापक यंत्रणेशी-मेंदूशी-इतका अतूटपणे जोडला गेला आहे की,त्याचं काम त्यानं मर्यादेत पूर्ण केल्यावर,त्याचा इतर अवयवांशी विरोधही असत नाही व मेंदूशीही विसंवाद असत नाही.

बुद्धी, तिच्यावर अवलंबून असलेला वैज्ञानिक दृष्टिकोन, मन-भावना-कल्पना,पूर्वकर्म-त्याचे आत्ताचे दृश्य परिणाम,आत्ताच्या कर्मांचे भावी परिणाम - अशा माणसाच्या असंख्य घटकांची आणि श्रद्धेच्या संबंधाची तीच अवस्था आहे. जसं मेंदूच्या व्यापक यंत्रणेनं माणसाच्या शरीराचं सुयोग्य व्यवस्थापन, नियंत्रण केलं जातं, तसं श्रद्धेच्या व्यापक आधारावर बुद्धी, मन, भावना -अशा साऱ्यांचं नुसतंच नियंत्रण केलं जात नाही तर, शरीराचं जेवढं व्यवस्थापन, संरक्षण मेंदू करीत असेल, त्याच्या कितीतरी पट,कालातीत कल्याण

श्रद्धा करीत असते.

आधी ज्या गोष्टी आपल्याला आकलन होत नाहीत, अर्थ लागत नाहीत, नियंत्रण करता येत नाही, त्याला असलेली दिशा लक्षात येत नाही- त्यांतलं बरंचसं या श्रद्धेच्या आधारानं आपल्याला कळतं. श्रद्धा जितकी प्रगल्भ असेल, तितकं जास्त कळतं आणि जरी ती कशीही असली, तरीही चित्ताची निश्चिंतता कायम राहाते.

याचाच अर्थ, श्रद्धा ही दृश्य जगातले कार्यकारणभाव शोधण्याशी जेवढी निगडित आहे, तेवढीच ती अदृश्य जगातले व्यवहार, कार्यकारणभाव, त्या सर्वांची कल्याणाची दिशा-या साऱ्यांचं नियंत्रण घडवून आणायला समर्थ आहे. हेही लक्षात घेणं आवश्यक आहे की, मेंदूच्या कक्षेत एकवेळ पायाचा संभाव्य धोका टाळणं, म्हणजे शरीराचं रक्षण करणं, एवढं कार्य साध्य होऊ शकतं. पण पायानं जिथं जायचं, तिथं आपलं कल्याण होईलच, हे त्या कक्षेत येणार नाही.

आधीच्या उदाहरणानं स्पष्ट करायचं तर, पायाचा मेंदूशी विरोध तर नसतोच, पण त्याच्या अस्तित्वामुळंच तो आपलं कार्य व्यवस्थित करू शकतो. तसंच बुद्धीचा - वैज्ञानिक दृष्टिकोनाचा श्रद्धेशी विरोध नसतो. उलट तिच्या संबंधामुळं, बुद्धी शुद्ध राहून, आपलं कार्य ती अधिक योग्यपणे करू शकते. यात आणखी एक गोष्ट लक्षात येईल की, नुसत्या बुद्धीचं मनाशी, कल्पनेशी जमतंच असं नाही. पण श्रद्धेशी निगडित असतील, तर त्यांचंही एकमेकांशी जमेल आणि अधिक चांगल्या तऱ्हेनं माणसाचं कार्य चालू शकेल. अधिक प्रगती होऊ शकेल.

डोळे, हात, पाय - अशा यंत्रणांचे जसे विरोध नसतात, उलट ते मेंदूशी निगडित असल्यामुळं सुसंवादी राहून, शरीर अधिक कार्यशील राहू शकतं. तसंच श्रद्धेच्या विशाल आधारानं, वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारी बुद्धी, मन आणि इतर सर्व ईश्वरी शक्ती माणसाच्या जीवनाचं अधिक कल्याण करू शकतात !

**

*१०. स्वतःतल्या अस्तित्वाची - आहेपणाची आणि त्याला जोडलेल्या जगातल्या आणि जगदीशातल्या विलक्षण मोठ्या, अज्ञात पण सुनियंत्रितपणे कल्याण करणाऱ्या व्यवस्थेची खात्री म्हणजे श्रद्धा. हे लक्षात आलं तरी,आम्ही व्यवहारात जिथं श्रद्धा ठेवतो, ते कुणीतरी दैवत,संत,व्यक्ती - असंच काहीतरी असतं. याचा या श्रद्धेशी संबंध कोणता? त्या अर्थानं श्रद्धेच्या काही पायऱ्या, टप्पे आहेत का? श्रद्धेच्या परीक्षेचे प्रसंग असतात का ?*

श्रद्धा मूलतः एकच असते. जसं माणसं स्वतः जिवंत असोत, जगाशी व्यवहार करोत, अज्ञात शक्तीवर - भगवंतावर विश्वास ठेवोत-न ठेवोत, ते सारं त्या मूळ श्रद्धेचंच स्वरूप असतं. ते समजून घेण्यासाठी थोडी पार्श्वभूमी लागेल.

ज्या अर्थानं वर अस्तित्व म्हटलं, त्याचा लौकिक अर्थानं समावेश निर्गुणात, अदृश्यात किंवा न दिसणाऱ्या विश्वात होतो. जिवंतपणाचा किंवा अज्ञात शक्तीचा, विश्वास असणाऱ्या-नसणाऱ्या सर्व व्यक्तींना असंख्य वेळा प्रत्यय येतो. तरीही, तो जिच्यामुळं येतो, ती श्रद्धा त्याला समोर एखाद्या वस्तूसारखी दिसत नाही. म्हणजे ती निर्गुण, अदृश्य राहाते.

आता माणसाचा व्यवहार तर, तसा दृश्य, समोर घडणारा म्हणजे त्या अर्थानं आकारातला, सगुणातला असतो. अगदी साध्या उदाहरणानं पाहायचं तर, किराणा दुकानातल्या काउंटरवर गिऱ्हाइकाच्या हातात असलेली दहा रुपयांची नोट आणि दुकानदाराच्या हातात असलेली दहा रुपयांची वस्तू, या एकमेकांना दिल्या जातील, तेव्हा व्यवहार पूर्ण होईल. पण अविश्वासाचाच प्रश्न आला तर, तो अशा साध्या व्यवहारातसुद्धा सोडवणं अवघड नव्हे, अशक्यही आहे. कारण दुकानदाराला वाटू शकतं, मी वस्तू दिली आणि हा नोट न देता निघून गेला तर काय, आणि गिऱ्हाईकाला वाटू शकतं, मी नोट आधी दिली आणि यानं वस्तू नंतर दिली नाही

तर काय ? त्यात पुन्हा, असंही घडू शकतं, गिऱ्हाईकानं वस्तू घेतली आणि नोट मी आधीच दिली आहे, असं त्यानं म्हटलं किंवा दुकानदारानं मी आधीच वस्तू दिली आहे, तुम्हीच अजून नोट दिली नाही, असं म्हटलं तर काय? त्यातही, एका हातानं नोट द्या आणि एका हातानं वस्तू देतो, इथंपर्यंत पर्याय काढला तरी, त्यात हिसकाहिसकी होऊ शकते. म्हणजे या ठिकाणी जो एकमेकांना एकमेकांच्याबद्दल व्यावहारिक विश्वास लागतो, तो म्हणजे परमार्थातली श्रद्धा !

ती श्रद्धा आता व्यावहारिक पातळीवर उतरल्यामुळं, तिचं स्वरूप विश्वासाचं झालं आहे. तो विश्वास सार्थ ठरण्यासाठी ज्याची मूळ श्रद्धा बळकट आहे, त्याच्याकडूनच तो तडीला जाईल. कारण मूळ श्रद्धा ही अस्तित्वा इतकीच प्रामाणिक खात्रीची असते. त्यामुळं तिच्याकडून निर्माण झालेला हा व्यावहारिक विश्वास व्यवहारात उतरून, त्या व्यक्तीकडून हा व्यवहार खात्रीनं पुरा होऊ शकतो.

मुळात मनुष्य अश्रद्ध असेल, म्हणजे त्याला त्याच्या ठायी विद्यमान असलेल्या श्रद्धेची जाणीव नसेल तर, अशा माणसांना परमेश्वराच्या अंतिम नियंत्रक, शासक व्यवस्थेवरही विश्वास नसतो. मग तो व्यवहारात फसवणूक करतो आणि असं तर त्यानं किंवा इतर कुणी मलाही फसवलं आहे,असं त्याचं समर्थनही करू शकतो. हे अर्थातच, व्यावहारिकदृष्ट्यासुद्धा आदर्श तर नाहीच पण त्याज्य मात्र आहे. शिवाय त्यामुळं व्यवहारात गोंधळ, असंख्य फसवणुकी आणि इतर दुष्परिणाम होतात, हे आपण आजही पाहातो आहोत.

म्हणजे साध्या व्यवहारातसुद्धा मुळातल्या श्रद्धेतून आलेला व्यावहारिक पातळीवरचा विश्वास गरजेचा आहे. यातही तो तिथून आलेला का असावा लागतो, ते पाहू. तो जर मूलभूत अस्तित्व आणि भगवंताचं सर्वसमर्थ अस्तित्व यांतून आलेला असेल तर, व्यवहारात अविश्वासानं वागण्याची, फसवणूक करण्याची त्याच्यावर वेळ आली की, ही आतली भगवंताशी जोडलेली श्रद्धा त्याला अशा गोष्टींना होणारं अज्ञात शासन आणि विश्वासानं व्यवहार करण्याची

नैसर्गिक गरज जाणवून देते. तसंच तो व्यवहार त्याला अविश्वासाचा करू देत नाही. म्हणून मूळ श्रद्धेशी निगडित असलेल्या आणि त्यातून उत्पन्न झालेल्या विश्वासाची व्यवहारात कधीही गरजच असते. तरच व्यवहार उभयपक्षी पूर्ण आणि सुखाचे होतात.

आता आपल्या मूळ प्रश्नात पाहिल्याप्रमाणं, आपण व्यवहारात जी श्रद्धा ठेवतो ती देवावर, कुणा व्यक्तीवर किंवा देवाच्या नामावर ठेवतो. त्याचं कारण आपण व्यवहारात म्हणजे आकारात, सगुणात, दृश्य स्वरूपाच्या व्यवहारात वावरतो. तिथं आपल्याला अशा तऱ्हेचं निर्गुणाचं भान ठेवून दृश्य-लौकिक व्यवहार करता येईल, असं नाही. शिवाय, निर्गुण कितीही खरं असलं तरी, मी सगुणात वावरत असल्यामुळं मला निर्गुणापेक्षा सगुणाची अधिक खात्री वाटते आणि त्यावर विश्वास ठेवणं सोपं जातं. म्हणून देवळातली एखादी मूर्ती, एखादे सत्पुरुष, समाधी, दैवी नाम - अशा त्यातल्यात्यात सगुण, स्थिर, निश्चित स्वरूपाच्या गोष्टींवर व्यवहारात विश्वास ठेवणं सोपं जातं. ते त्या अर्थानं गरजेचंही आहे.

उदाहरणानं पाहायचं तर, एखादं विशिष्ट दैवत दोघांचं श्रद्धेचं-विश्वासाचं स्थान असेल तर, त्याला स्मरून ते दोघं एकमेकांच्यातला व्यवहार करतात. मग स्वाभाविकपणे विश्वास त्या श्रद्धेतून आलेला असल्यामुळं त्या व्यवहारात फसवणूक होत नाही. व्यवहार तडीला जातो. उलट नफानुकसान व्हायची वेळ आली तर, दोन्ही बाजू एकमेकांना दोष न देता, त्या विशिष्ट दैवताची तशी इच्छा आहे, हे लक्षात ठेवून, नुकसान स्वतःकडं घ्यायची तयारी दाखवतात.या व्यवहाराचा दर्जा श्रेष्ठ असून,या विशिष्ट दैवतावरच्या वा संतांवरच्या श्रद्धेमुळं, व्यवहार तर विश्वासानं पूर्ण होतोच, पण नफानुकसानीच्या प्रसंगातसुद्धा तो व्यवहार निभावून तडीला नेला जातो.

याउलट, जी माणसं लौकिक अर्थानं अश्रद्ध असतील, ती फक्त त्यातलं त्यांचं नफानुकसान पाहतील, तोट्याचा प्रसंग आला

तर, शब्द फिरवतील, व्यवहार अर्धे सोडतील, टाळतील, पण काहीही मार्गानं स्वतःला तोशिस लागू देणार नाहीत. स्वार्थ पाहातील.

त्यांना त्याचा तात्कालिक लाभही होईल. पण अंतिमतः भगवंताच्या तटस्थ, सर्वसमर्थ, नियंत्रक, शासक व्यवस्थेकडून त्यांचं त्यावरच्या दंडासह नुकसान होईल. अशा खऱ्या अर्थानं श्रद्धेची आणि भगवंताची ओळख नसलेल्या व्यक्तींच्यामुळं कुटुंबांत, समाजात, जगात असंख्य प्रकारचे स्वार्थाचे वाद आहेत. ते याकारणामुळं न मिटणारेही आहेत.

तेच पुढं आपल्याला प्रचंड प्रमाणात कोर्टांतून साठलेले दिसतात. ते मुळातच अश्रद्धेवर, अविश्वासावर, भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव नसल्यामुळं - निर्माण झालेले आहेत. असे कोर्टांतले आणि कोर्टाबाहेरचे स्वार्थाचे वाद असंख्य माणसांचं, कुटुंबांचं, समाजाचं, देशांचं किती नुकसान करीत असतात, काळाचा, पैशाचा किती अपव्यय करीत असतात, ते अवश्य पाहावं.

त्यात अगणित माणसांच्या स्वास्थ्याची होणारी हानी, ही तर कल्पनातीत आहे. ते कळूनही माणसं पिढ्यान्‌पिढ्या ही हानी पत्करतात. पण श्रद्धेतून निर्माण झालेला साधा विश्वास जपत नाहीत, ही माणसाला परमेश्वरानं दिलेल्या श्रद्धेच्या देणगीची माणसानं केलेली शोकांतिका आहे ! अशावेळी श्रद्धेची आणि त्यातून निर्माण झालेल्या विश्वासाची, व्यवहारातसुद्धा किती गरज आहे, याची कल्पना करावी !

आता हा व्यवहारातला विश्वास, मूळ श्रद्धेचं निर्गुण आणि ऐक्यमय स्वरूप लक्षात ठेवून, कुठल्याही दैवतावर ठेवला, संतांवर ठेवला, व्यक्तीवर ठेवला आणि त्याला धरून आपला व्यवहार केला तरी, श्रद्धेप्रमाणंच हा विश्वास माणसाला स्वास्थ्य देतो. फक्त माणसाच्या मनाच्या स्वभावाप्रमाणं, तो या विश्वासातसुद्धा आजएक-उद्या एक, कधी त्यांना विचारून-कधी न विचारता, कधी दैवताचं भान न ठेवता, त्यांना अपेक्षित पद्धतीनं व्यवहार न करता

जगतो. त्याला ते दैवत, संत, व्यक्ती जबाबदार नाहीत. त्यांचं स्मरण न ठेवता, त्यात्या दैवताच्या-सत्पुरुषाच्या सांगण्याप्रमाणं न वागता, मनाच्या प्रापंचिक-स्वार्थाच्या स्वभावाला धरून, तो व्यवहार करतो. मग त्याचे दुष्परिणाम त्याला सोसावे लागतात.

आता यात, ते दैवत समजा साध्या भाषेत, अगदी दगडाचं आहे किंवा संत-सत्पुरुष त्यांच्यासारखाच माणूस आहे, तरीही, त्याच्यावर श्रद्धा-विश्वास ठेवणाऱ्या माणसाच्या त्या श्रद्धेच्या बळकटपणावर, त्यात्या माणसाला भगवंत अनुभव देत असतो, हे संत-सत्पुरुष जाणून असतात. म्हणून ते स्वतःही अनेकदा सांगताना दिसतात की, पंढरीचा विटेवरचा पांडुरंग जितका खरा आहे, तितकाच तुमच्या गावातल्या देवळातला पांडुरंगही खरा आहे. कारण अनुभव देणारा, तुम्हाला पांडुरंग वाटत असला, तरी तो अनुभव खरा त्याशाश्वत भगवंताकडून येत असतो. म्हणून श्रद्धेला नेहमी अनुभव येतो आणि तो खरा असतो.

तीच गोष्ट जिच्यावर श्रद्धा ठेवली त्या व्यक्तीच्या बाबतीतही असते. व्यक्तीवर श्रद्धा ठेवण्यासारखी काही परिस्थिती किंवा अनुभव असल्याशिवाय मुळात माणूस विश्वास ठेवणार नाही. उलट अशा व्यक्ती किंवा देहातले संतसुद्धा अनेकदा हे सांगताना दिसतील की, विश्वास ठेवण्यापूर्वी तुमच्या बुद्धीनं, तुम्हाला गरज असेल, तेवढ्या वेळा तुम्ही परीक्षा घ्या. खात्री करा आणि मग मात्र एकदा श्रद्धा ठेवलीत की, नंतर संभ्रमात-संदेहात-भ्रमात टाकणारी बुद्धी बाजूला ठेवा. फक्त सांगितलेलं श्रद्धेनं करा. तुम्हाला त्याचा अनुभव येईल.

या बाबतीतही त्या अनुभवाचं श्रेय असे संत स्वतःकडं घेत नाहीत. कारण मूळ अनुभव देण्याइतकं सामर्थ्य त्यांच्याकडं नसलं तरी, त्यांचा ज्या भगवंतावर विश्वास आहे, तो या श्रद्धा ठेवणाऱ्या माणसाच्या श्रद्धेच्या बळकटपणामुळं-निःसंदेहपणामुळं त्याला या व्यक्तीच्यामार्फत अनुभव देतो. ती जबाबदारी त्या भगवंताची आहे

आणि ती तो पुरी करतोच. तो अनुभव देण्यासाठी लागणारं सामर्थ्य व्यक्तीत नसलं तरी, त्या प्रसंगी ते त्याच्यात उत्पन्न करण्याचं सामर्थ्य भगवंतात आहे. प्रश्न श्रद्धा ठेवणाऱ्या व्यक्तीच्या श्रद्धेचा - विश्वासाचा आणि त्याच्या बळकटपणाचा आहे. तो त्या व्यक्तीनंच सोडवावा आणि अनुभव घ्यावा !

इथं हे लक्षात घेणं आवश्यक आहे की, भगवंत, व्यक्तीत असलेली अस्तित्वमय श्रद्धा, तिचं व्यवहारातलं विश्वासाचं स्थान -हे सारं एकाच गुणधर्माचं आहे, निगडित आहे. त्यात तो काय मागतो आहे, त्याचबरोबर ते देण्याचं सामर्थ्य असलं तरी, त्याच्या कल्याणाची काळजी करण्याची यंत्रणाही आहे !

म्हणून अनेकदा विश्वास असून, काही गोष्टी मागून, पूर्वी त्या मिळालेल्या असूनही आत्ता त्या मिळत नाहीत. यावेळी माणसाच्या श्रद्धेची परीक्षा असते. ती मोठी अवघड असते, असं नाही. त्यात फक्त एवढं लक्षात राहिलं तरी पुरे की, विश्वासाला जागण्याचं त्यांचं कर्तव्य ते करतातच आहेत. ते देताना पूर्वी कल्याण होणार होतं म्हणून दिलं. आज ते तसं होणार नाही, म्हणून ते दिलं नाही.

ज्यांचा विश्वास नुसतं -मिळण्यावर- आहे, त्यांचा विश्वास- न मिळण्यानं- उडतो, डळमळतो. याला त्यात्या माणसाला श्रद्धेच्या कल्याणकारी शक्तीची कल्पना नसणं आणि त्याचा स्वतःचा स्वार्थ प्रबळ असणं, ही कारणं आहेत. ज्यांच्यावर श्रद्धा ठेवतो, ते संत, व्यक्ती,भगवंत - हे त्याला कारण नाहीत, कारण त्यांना मागितलेलं द्यायचं नाही, कल्याणाचं द्यायचं आहे !

आपण सगुणात असल्यामुळं आपल्याला असल्या सगुण स्वरूपातल्या दैवताची, संतांची, सत्पुरुषांची किंवा सद्ग्रंथांची गरज आहे. त्यांच्यावरच्या श्रद्धेमुळं, आधी पाहिलं तसे, आपल्या बाजूनं तरी व्यवहारात लाभ हानी काहीही होवो, ते व्यवहार न्याय्य होतात, सुकर होतात आणि स्वास्थ्याचे होतात. आयुष्यात स्वास्थ्य किंवा समाधान यांपेक्षा श्रेष्ठमूल्यच नाही. मग ते देऊ शकणाऱ्या अशा

श्रद्धेची-विश्वासाची गरज आणि महती काय वर्णावी ?

आता श्रद्धेच्या काही पायऱ्या असतात का, या प्रश्नाचा विचार करू. अशी श्रद्धा आपल्या ठिकाणी व्यवहारात कुणा दैवताच्या, संतांच्या, सत्पुरुषांच्यावर असलेल्या विश्वासाच्या रूपानं असणं, हे भाग्याचं लक्षण आहे. हे कळलं तरीसुद्धा ते कळताना एकतर कुणाकडूनतरी कळतं, कुठंतरी पाहून कळतं, कुठं वाचून कळतं, कुणीतरी सांगितलं म्हणून कळतं - अशी कळण्याची पहिली पायरी असते. मन-बुद्धीच्या ठेवणीनुसार काहींना ते पहिल्या पायरीवरच पटून जातं. पुरेसं असतं.

काहींना पुढच्या पायरीवर त्यांना स्वतःला त्याचा अनुभवयावा लागतो. काहींची एका अनुभवानं खात्री होते. काहींची अनेक अनुभव आले तरी, खात्री होत नाही. हाही पुन्हा ठेवणीचा प्रश्न आहे. बुद्धीला फार वाव दिला, मनाला भरकटू दिलं तर, अनेक अनुभव येऊन सुद्धा या पायरीवरून मनुष्य पुढं जात नाही. म्हणून त्याला स्वतःच्या अनुभवांची व्यवस्थित जाणीव असणं, ते कळणं, ते लक्षात राहाणं, निदान अनेकदा आल्यावर तरी त्याची खात्री वाटणं आणि स्वतःत तो विश्वास निर्माण होणं - ही दुसरी पायरी आहे.

देवाचं स्वरूप मुळात निर्गुणच असल्यामुळं आणि ते फक्त व्यक्तीचं कल्याण जाणत असल्यामुळं, त्याला अमुक दैवत, संत, सत्पुरुष - अशा कुठल्याही मार्गानं अनुभव देण्यात कुठलीच अडचण नसते. पायऱ्या असतात, त्या अनुभव घेणाऱ्याच्या बाजूनं. काहींनी ही दुसरी पायरी ओलांडली तर, त्यांना वेगवेगळ्या अनुभवांतून त्यांच्या विश्वासाची खात्री अधिकाधिक होत जाते. तेव्हा साधा विश्वास हा निष्ठेचं म्हणजे बळकट श्रद्धेचं स्वरूप धारण करतो -ही तिसरी पायरी.

यातल्या अनुभवांबद्दल इथंच खुलासा करू. अनुभव म्हणजे अनेकांच्या कल्पना दृश्य स्वरूपातल्या म्हणजे आपल्या मनातल्या, आपल्याला हव्या असलेल्या गोष्टी, अशी श्रद्धा ठेवायला लागलं तर

घडणं, नुकसान टळणं, आजार बरे होणं, विविध निकाल आपल्या बाजूनं लागणं, परीक्षांत यश येणं-अशा ढोबळ स्वरूपाच्या असतात.

तर काहींच्या कल्पना आपला जप अधिक चांगला होणं, मनाला अधिक स्वास्थ्य असणं, व्यवहारातल्या नफानुकसानींना पूर्वीसारखं महत्त्व नसणं आणि त्यामुळं कसल्याही परिस्थितीत मनाची शांती टिकणं, भगवंताच्या अंतिम कर्तृत्वाची अधिकाधिक सत्यता पटत जाणं, व्यवहार करतानासुद्धा भगवंताचं अनुसंधान टिकण्याचं प्रमाण वाढणं,स्वतःशी आणि जगाशी सुसंवादी असण्याचं प्रमाण वाढणं - अशा स्वरूपाच्या अधिक परिपक्व असतात.

यांतल्या आधीच्या ढोबळ स्वरूपाच्या अनुभवांना महत्त्व नाही, असं नाही किंवा त्या कल्पना चुकीच्या आहेत, असंही नाही. पण तसं घडण्यावर आपला विश्वास अवलंबून नसणं, ही या पायरीवरची परीक्षा आहे. घडलं तर, कल्याणाचं होतं आणि त्यांनी केलं, म्हणून झालं. आणि न झालं तर, कल्याणाचं नव्हतं म्हणून यांनी केलं नाही, अशी खात्री असणं. ही या पायरीवर पोचल्याची खूण आहे. ज्यांच्या कल्पना वर म्हटलं तशा अधिक परिपक्व असतील, त्यांचा पुढचा प्रवास अधिक सोपा होईल, हे उघड आहे.

व्यवहारात असल्यामुळं, आपण इथं सगुणावरच्या श्रद्धेच्या, विश्वासाच्या परीक्षा देत आहोत. जशा त्या आपल्याकडून दिल्या जातात, तशा त्या वरच्या पायरीवर त्यांच्याकडून घेतल्या जातात. मूर्ती असेल तर, ती भंगणं - पुरात वाहून जाणं, देहात असलेल्या संतांच्या वागण्याबद्दल बुद्धीनं भ्रम उत्पन्न होईल, असं त्यांनी वागणं, विश्वास ढासळेल असे प्रसंग-अपयशं उत्पन्न करणं -असल्या परीक्षा त्यांच्याकडून घेतल्या जातात. त्यात आपण अढळ राहिलो आणि त्या अर्थानं देहबुद्धी आड येऊ दिली नाही, तर मात्र मग भगवंताच्या कृपेचा निर्मळ प्रवाह आपला देह पडेपर्यंत, निरंतरपणे आपली सोबत करीत राहातो. आपली श्रद्धा आणि त्यामुळं या शेवटच्या पायरीवर निर्माण झालेला आपला आनंद अढळ टिकतो !

**

*११. श्रद्धा व प्रयत्नवाद यांतला संबंध कोणता ?*

नुसत्या प्रयत्नवादी माणसाची भिस्त ही त्याची ज्ञानेंद्रियं, कर्मेंद्रियं, त्याविषयातला पूर्वीचा अनुभव, भविष्यातल्या परिणामांचा अंदाज घेण्याची क्षमता - अशा काही गोष्टींवर असते. त्यामुळं त्याचे प्रयत्न तेवढ्या मर्यादेत त्याला यश देतात. बाकीचे त्याच्या आटोक्यात नसलेले घटक - उदाहरणार्थ, धंद्यातली तेजी-मंदी, इतर स्पर्धक, स्वतःची शारीरिक अनुकूलता टिकणं, नव्या तंत्रज्ञानामुळं धंद्याचं स्वरूप बदलणं - हे यश कमीजास्त करीत असतात.

उदाहरणार्थ, छपाईचा व्यवसाय घ्या. पूर्वी लेटर प्रेसमध्ये, खिळेजुळणीच्या काळामध्ये प्रयत्नवादानं अगदी पूर्ण यश गाठलेले मध्यमवयीन व्यावसायिक होते. यावेळी त्यांच्या ठिकाणी वर उल्लेखलेल्या धंद्याचं ज्ञान, व्यावहारिक कौशल्य, धंद्याचं स्वरूप - यांवरची भिस्त त्यांना हे यश देऊन गेली.

पण आपल्याला कल्पना आहेच, की संगणकाच्या आगमनानंतर यातल्या खिळेजुळणीपासून ते छपाईच्या यंत्रणेपर्यंत व्यवसायाचं पूर्ण स्वरूप बदलून गेलं. त्यामध्ये अनेक नामांकित प्रेस हे अस्तंगत झाले. मध्यमवयात त्या पिढ्यांना काम उरलं नाही, प्रयत्न करायला क्षेत्र उरलं नाही. नवं तंत्रज्ञान काही बाबतीत सोपं, स्वस्त असलं तरी, इतर अनेक यंत्रांच्या बाबतीत, ते गुंतवणुकीला अत्यंत महागडं होतं. शिवाय त्याच्याशी जमवून घेणं, ते शिकून घेणं, हे अनेकांच्या आटोक्यातलं नव्हतं. तसंच अशा वयात नवीन कुठल्या धंद्यात उतरून प्रयत्न करणं, हेही काहींना शक्य नव्हतं.

अशा ठिकाणी प्रयत्नवादाच्या मर्यादा कळतात. मग व्यवसायातल्या पीछेहाटीमुळं जीवनमान खालावणं, धंद्याचे दुसरे मार्ग नसणं, उत्पन्नाची-प्रयत्नांची संधी नसल्यानं नैराश्य येणं, त्यामुळं स्वभावात चिडचिड उत्पन्न होणं, त्याचा परिणाम घरच्या स्वास्थ्यावर होणं, त्यापोटी काहींना मनोकायिक आजार उद्‌भवणं -

अशा अनेक परिणामांना या मंडळींना सामोरं जावं लागलं.

असं तर प्रयत्न करताना कुठल्याही क्षेत्रात कुणालाही, कधीही सामोरं जावं लागू शकतं. पण हे जे पुढचे दुष्परिणाम आणि अस्वास्थ्य उद्‌भवतं, ते मुळातच कमी उद्‌भवणं आणि जे काही येईल त्याला शांतचित्तानं सामोरं जाणं - यासाठी श्रद्धेची गरज आहे. कारण नुसत्या प्रयत्नवादाचा भर मी, माझं कर्तृत्व आणि त्याला आलेलं यश - एवढ्यापुरता आहे.

तर श्रद्धावान व्यक्ती प्रयत्नवादी आहेच, पण त्याचबरोबर, त्याहीपेक्षा आज मिळालेलं यश किंवा नंतर तो व्यवसाय कमी झाल्यामुळं आलेली स्थिती-ही भगवंताच्या इच्छेनंच आलेली आहे, याची त्याला खात्री आहे. त्यामुळं त्यात यश-अपयश याच्यामागं मीपणाला स्थान नसून, माझं कर्तव्य आणि भगवंताच्या इच्छेनं माझ्या अंतिम कल्याणासाठी निर्माण होणारे परिणाम - यांना प्राधान्य आहे. त्यामुळं यशातसुद्धा भगवंताचा विसर नाही, पैशाला दानानं शुद्धी आहे. तर अपयशातही भगवंताचा विसर नाही आणि त्यामुळं शुद्ध पैसा त्या परिस्थितीला पुरतो आहे !

शिवाय चित्ताच्या शांतीमुळं नुसत्या प्रयत्नवादी माणसांच्या बाबतीत, आधी म्हटलं, तसं स्वास्थ्याचं नुकसान, आजार, खर्च या व्यक्तींच्या वाट्याला येत नाहीत. त्यातूनही समजा, अशा अपयशांऐवजी यशाची कमान चढती राहिली, तरी नुसत्या प्रयत्नवादी माणसाचा अखेर विनाशक ठरणारा अहंकार वाढत जाईल, तर सश्रद्ध प्रयत्नवादी माणसाची श्रद्धा बळकट होत जाईल. त्याच्याहातून निरपेक्षपणे समाजाची अधिक सेवा होईल आणि तो स्वतःही स्वाध्यात राहील.

म्हणून नुसता प्रयत्नवाद अपयशात अस्वास्थ्यानं, तर यशात अहंकारानं नुकसान करतो.पण हाच प्रयत्नवाद श्रद्धेशी संबंध ठेवून,तिचा हात धरून चालला, तर सदैव समाधानात राहातो !

**

## १२. कर्म विवेकानं, विचारानं, मनापासून केल्यावर पुन्हा श्रद्धेची वेगळी गरज काय ?

कर्मं अशी विवेकानं, म्हणजे बुद्धीतल्या सारासार विचाराच्या शक्तीनं निवडून आणि त्यातही त्याला शुद्ध मनाची जोड देऊन, ती केली, त्याचा पाश शिल्लक राहिला नाही, परिणामांबद्दल काळजी, चिंता, उद्‌वेग-चित्तात राहिले नाहीत, कर्तेपणाचा अहंकार राहिला नाही, तर श्रद्धेची वेगळी गरज नाही.

सर्वसामान्य माणसाला त्यात अडचणी असतात. एकतर त्याची विवेकशक्ती आवश्यक एवढी प्रगल्भ नसते. तसंच कर्मांची निवड करताना सार वा शाश्वत किंवा सत् अशी कर्मं निवडता येत नाहीत. त्याचबरोबर त्याचं मन लोभ, मोह, पुनरावृत्ती, रजतमादी गुण - यांपासून कर्मं निवडताना आणि करताना मुक्त नसतं. म्हणजे त्या अर्थानं ते आदर्श कर्मं करायला शुद्ध नसतं.

म्हणून बहुसंख्य लोकांची कर्मं ही अशा विवेकशक्तीच्या अभावी तात्कालिक, अशाश्वत, सुखाला धरून होतात. तसंच ती करण्यात मन इच्छा, द्वेष, असूया, मत्सर - अशा विकारांच्या आणि स्वार्थाच्या आधीन असल्यामुळं, ती कर्मं विपरीत व विनाशक होतात. उदाहरणार्थ, साधं बोलण्याचं कर्म घेतलं तरी, मनुष्य विवेकानं आणि शुद्ध मनानं बोलू शकतो का, याचा विचार करावा !

म्हणजे आपल्याला आयुष्यभरातल्या अशा असंख्य कर्मांची अवस्था काय असेल, याची कल्पना येईल. म्हणून अशा कर्मांचे परिणामही विपरीत असतात. चिंता, काळजी उत्पन्न करतात. त्यामुळंच कर्मांचे पाश निर्माण होतात व परिणाम भोगणं शिल्लक राहातं. मनुष्य कर्मं करून मुक्त व्हायच्याऐवजी बद्ध होतो. म्हणून हीच कर्मं सत्य आणि भगवंताला धरून - म्हणजे श्रद्धेनं केलेली असतील, तर असे दुष्परिणाम वाचतील, कर्मं बरोबर होतील. यासाठी कर्मांना श्रद्धेच्या बैठकीची गरज आहे !

**

*१३. अलीकडं शिक्षणानं माणूस साधारणतः*
*अश्रद्ध होत जाताना दिसतो, असं का होतं ?*

असं होताना दिसतं, हे खरं आहे. त्यातही अलीकडच्या दोन-तीनशे वर्षांतल्या शिक्षणानं हे प्रमाण एकदम वाढलं आहे, हे लक्षात घ्यावं. इथं ज्या अर्थानं अश्रद्ध शब्द वापरला आहे, तो नास्तिक, जडवादी, फक्त दृश्य जग आणि त्याचे अनुभव खरे मानणारा अशा अर्थाचा आहे. तो शब्द तसा प्रचलित असल्यामुळं तो वापरून आपण याचं उत्तर पाहू. हे अशासाठी लक्षात ठेवायचं की, या पूर्वीच्या उत्तरात अश्रद्धता ही व्यावहारिक आणि पारमार्थिकदृष्ट्या अशक्य आहे आणि ते का, हे आपण पाहिलं आहे.

शिक्षणानं अश्रद्ध होणं, ही तशी एका व्यक्तीपुरती प्रक्रिया नाही. अभ्यासक्रमात नेमलेलं पुस्तक जसं एका विद्यार्थ्यासाठी नसून, त्या वर्गात असलेल्या लाखो विद्यार्थ्यांना लागू होतं. इतकंच नव्हे तर, ते पुस्तक जितका काळ अभ्यासक्रमात लागू राहील, तितक्या विद्यार्थ्यांच्या पिढ्यांना ते लागू राहील. म्हणजे त्या अर्थानं त्यात जे मांडलेलं आहे, त्याचे संस्कार विद्यार्थ्यांच्या तितक्या भावी पिढ्यांवर होतील. इतकंच नव्हे, तर त्यांच्यात्यांच्या वर्तनांमुळं त्यांच्या कुटुंबांतही तसेच संस्कार होतील.

एक लक्षात घेऊ, की फक्त दृश्य खरं मानून चालणं, म्हणजे त्या अर्थानं आजच्या शब्दांत वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणं, हे आपल्याला नवीन नाही. ऋषींच्या काळापासून आपल्याकडे जडवाद प्रचलित आहे. फक्त त्याचं नातं या जन्मातल्या सुखाचा विचार करण्यापुरतं, म्हणजे मर्यादित असल्यामुळं तो मानणारे लोकही मर्यादित होते. बहुतांश शिक्षण हे कोणत्याही स्वरूपातल्या निर्गुण किंवा सगुण भगवंताला मानून, त्या अर्थानं शाश्वत, निर्गुण, अदृश्य जग प्रधान मानून दिलं जात होतं. ते बरोबर आहे, हे आता विज्ञानानं सिद्ध होत चाललेलं आहे.

पण मधल्या टप्प्यात जेव्हा जगातल्या इतर संस्कृतींशी संबंध आला, त्यावेळी त्यांच्या धारणा या व्यावसायिक, व्यावहारिक, सुखवादी, दृश्य, जडविश्व खरं मानून चालणाऱ्या आणि त्यातच संशोधन करणाऱ्या होत्या. बाह्य, दृश्य, जड हे नेहमी समोर दिसणारं आणि त्यापासून मिळणारं सुख तत्काळ मिळत असल्यामुळं, ते अधिक खरं वाटणं, हे मनुष्याच्या स्वभावाला धरून आहे. जसं तहानेला पाणी, भुकेला अन्न, थंडीवाऱ्याला निवारा, व्यवहार सुखाचे व्हायला साधनसंपत्ती - या गोष्टी माणसाला खऱ्या वाटल्या, त्यानं मनुष्य प्रभावित झाला, तर त्यात नवल नाही. समोर दिसतं, दृश्य असतं, अनुभवाला येतं, ते खरं वाटतं. यात दुमत नाही.

त्यात अशा तात्कालिक सुखात अधिकाधिक भर घालतील अशी यंत्रं, सुखसाधनं, मनोरंजनाची दृश्य उपकरणं यांनी अलीकडच्या दोन-तीनशे वर्षांत नेत्रदीपक प्रगती केली. ती करणाऱ्या संस्कृती या स्वाभाविकपणे ऐहिक सुखवादी, जडवादी, दृश्य खरं मानणाऱ्या- अशा होत्या. त्या प्रचलित असलेल्या अनेक देशांशी, विशेषतः पाश्चात्य देशांशी आपला अलीकडं ऐतिहासिक संबंध जास्त आला. त्याबरोबर हे सुखवादाचे, जडवादाचे विचार आपल्याकडं एकदम जास्त प्रमाणात आले.

त्यातही दुर्दैवानं त्यातल्या पाश्चात्य संस्कृतीवर आधारलेल्या कंपन्यांनी, पुढं कंपनी सरकारनी आणि नंतर प्रत्यक्ष पाश्चात्य देशांनी आपल्यावर राजकीय सत्ता प्रस्थापित केली. त्यांच्या बरोबर त्यांची तथाकथित वैज्ञानिक शिक्षणपद्धती, जीवनाचा सुखवादी दृष्टिकोन, तात्कालिक दृश्य सुखाला अंतिम मानणारी विचारपद्धती - यासुद्धा आपल्याकडं आल्या. त्या राज्यकर्त्यांचा भर बाह्यांगावर होता, त्याचाही प्रभाव आपल्यावर नकळत पडला. त्यात पुन्हा वरिष्ठांची वेषभूषा, त्यांचे विचार जसे अधिक बरोबर वाटत जावेत, तसे इथंतर राज्यकर्त्यांचा प्रश्न होता. त्यामुळं त्यांचे विचार, सुखवादीशिक्षण, व्यावसायिकता, पैसा अशा अनेक गोष्टी आदर्श

वाटत गेल्या. ज्यांना ते आदर्श वाटत नव्हतं, त्यांच्यावरही या गुलामगिरीच्या अवस्थेत गेलेल्या परतंत्र समाजाबरोबर असे न पटणारे विचार लादले गेले. उघड आहे की, त्यामागं प्रबळ आणि नाकारता येणार नाही, अशी परकीय राजसत्ता उभी होती.

माणूस पुढं कसं वागणार, हे बरचंसं त्याला कोणत्या प्रकारचं शिक्षण दिलं जाणार, यावर अवलंबून असतं. हे जाणणाऱ्या परकीय सत्तांनी राजसत्ता आपल्या हातात आल्यावर प्रथम हातात घेतलं ते इथलं शिक्षण. आधी पाहिलं तसे, त्या शिक्षणाचे प्रभाव पिढ्यान्‌पिढ्या टिकत असल्यामुळं, या शिक्षणातून दृश्य खरं मानणाऱ्या, यंत्रतंत्रांनाप्राधान्य देणाऱ्या विज्ञाननिष्ठ शिक्षणाचा आणि दृष्टिकोनाचा प्रभाव इथल्या शंभरदीडशे वर्षांतल्या पिढ्यांवर पडला. परिणामी तेही असे सुखवादी दिसणारं जग तेवढंच खरे मानणारे, अदृश्य-निर्गुण जग नाकारणारे होत गेले, तेच संस्कार घरोघरी कोट्यवधी लोकांच्यावर झाले. म्हणून आधी म्हटलं तसं, अलीकडं शिक्षणानं मनुष्य अश्रद्ध होत जाताना दिसण्याचं प्रमाण एकदम वाढलं.

ऐहिक सुखाची, तात्कालिक गरजांची, त्यासाठी लागणाऱ्या इहवादी-वैज्ञानिक संशोधनांची, यंत्रांची, तंत्रज्ञानाची माणसाला गरज नाही, असं आपल्याला मुळीच म्हणायचं नाही. पूर्वीही हजारो वर्षांपासून तसं म्हटलं गेलेलं नाही. फक्त दृश्य किंवा तात्कालिक सुख, गरजा यांच्या पूर्तीच्या मर्यादा - या विषयात अधिकाधिक खोल गेलेल्या व्यक्तींनी शोधल्या आहेत आणि त्याचेही निष्कर्ष प्रस्थापित करून ठेवलेले आहेत. तेही याच बरोबर शिक्षणात असायला हवे होते. त्यांच्या अभावामुळं अश्रद्धतेचं प्रमाण वाढलं.

उदाहरणानं पाहू. एखादा खाद्यपदार्थ तात्कालिक सुखाचा आहे, आवडता आहे. त्यामुळं मनाला तो अधिक आकर्षून घेईल, खरा वाटेल. पण तब्येतीचा विचार करता, दीर्घकालीन स्वास्थ्याचा विचार करता, तो खाणं जर मला इष्ट नसेल, तर आज सुखाचा

असूनही तो मी आज खात नाही. यावेळी मी एक दृश्य किंवा लगेच सुख देऊ शकणारा पदार्थ खाण्याचा सोपा, सुखाचा वाटणारा मार्ग ओलांडून, निदान तब्येतीच्या भविष्यातल्या स्वास्थ्यासाठी का होईना, तो खाणं टाळलेलं आहे. म्हणजेच मी आज न दिसणाऱ्या, पण पुढं अधिक सुखाच्या-स्वास्थ्याच्या होणाऱ्या अदृश्य जगाचा विचार करायला लागलो आहे. हा विचार करताना भले पदार्थापुरती किंवा शरीरापुरती असेल, माझी दृष्टी जेव्हा दृश्य ओलांडून पलीकडं जाते, तेव्हा ती अधिक सूक्ष्म आणि अधिक सत्य ठरणारा विचार करू शकते. तेच आपल्या अधिक हिताचं असतं. कदाचित आजच्या तात्कालिक सुखाला मी अंतरलो, तरी माझं एवढ्यापुरतं तरी अंतिम स्वास्थ्य, त्या सूक्ष्म, अदृश्य जगापुरतं माझ्या प्रत्ययाला येऊ शकतं. ही सूक्ष्म जगाच्या विचाराची प्राथमिक सुरुवात आहे.

सुरुवात अशासाठी म्हणायचं की, हे शरीर, खाद्यपदार्थ, परिणाम एवढ्या पातळीवर आहे, तोपर्यंत तरी ते आपल्याला निदान कळण्याच्या टप्प्यात आहे. अनुभवाच्या टप्प्यात आहे. त्यातही आजचं सुख मला सोडावं लागतं. मधला काळ सांगता येत नाही. ते सुख सोडल्यानं होणारे शरीरामधले परिणाम समोर दिसत नाहीत. तरीसुद्धा ते मला उद्यापरवाच नव्हे, तर असाच सूक्ष्माचा, हिताचा विचार करून जगत राहिलो, तर कितीतरी काळ अनुभवाला येऊ शकतात. याच क्षणी एखादा असंही म्हणू शकतो, की हा पदार्थ मला आवडतो, मी घेऊ शकतो, खाऊ शकतो. तर आजचं सुख मी का दवडावं, उद्याचं दुःख कुणी पाहिलं आहे. हे तसं सहज पटण्यासारखं असलं, तरी परिणामाला टिकणारं नाही. पुढं दुःख अटळ आहे.

श्रद्धा म्हणजे नुसता आजचा विचार नव्हे, तर आजच्या कर्मांच्या मागचा आणि पुढचा विचार करणं,तोही नुसता स्थूलदृश्य-जड जगाला धरून न करता, सूक्ष्म आणि परिणामानं अधिक खऱ्या ठरणाऱ्या, न दिसणाऱ्या, पण सत्य, हिताच्या असलेल्याव्यवस्थेचा विचार करून वागणं. त्यामुळं साधा पदार्थ टाळतानासुद्धा त्या

सत्याला धरून असलेल्या संयम या एका शाश्वत गुणाचा आपोआप विचार आणि आचार होतो.

श्रद्धा म्हणजे अंतिम हिताची निरपेक्ष, संयमी, त्यागी, निरहंकार, क्षमाशील, करुणामय, शाश्वत, नित्य आनंदमय, सत्याची आपल्यातली निःसंदेह धारणा होय. तिच्या प्रकाशात केलेल्या कृती या दृश्याबरोबरच, त्याला लागून आणि अधिक खऱ्या असलेल्या नियंत्रक अदृश्य जगाचा, परिणामांचा आणि अंतिम साध्य असलेल्या मुक्तीचा विचार करून केलेल्या असतात.

त्यात माणसाच्या तात्कालिक सुखाला, गरजांना, वैज्ञानिक संशोधनांना, सुखसाधनांना, तंत्रज्ञानांना स्थान नसतं, असं नाही. पण ते स्थान अंतिम नसतं. तर अदृश्य, निरंतर, निरपेक्ष, उपाधिरहित असलेल्या समाधानाला अंतिम स्थान असतं. त्याला उपयोगी ठरेल एवढ्याच प्रमाणात या इतर दृश्य जगाला स्थान असतं. यालाही कारण पुन्हा, ही श्रद्धा म्हणजेच अंतिम सत्य आणि त्याला आधारभूत असलेली विश्वातली कल्याणकारी यंत्रणा आणि त्याचा मूलाधार भगवंत शोधून काढताना केलेला कितीतरी पट सूक्ष्म आणि शाश्वतविचार आहे. त्या दृष्टीनं पाहिलं की, सतत बदलणाऱ्या आणि सुखदुःखांच्या, यशापयशांच्या, खऱ्या-खोट्या ठरणाऱ्या दृश्य जगाचं मूल्य कमी का ठरतं, हे लक्षात येईल. श्रद्धा माणसाच्या आजच्या सुखदुःखाचाच नुसता विचार करते, असं नव्हे तर त्याच्या जिवाच्या आत्ता दिसणाऱ्या जीवनाबरोबरच त्याच्या या देहातल्याच नव्हे, तर त्या पूर्वीच्या देहातल्या आणि शाश्वताला धरून न जगल्यास, पुढंही कितीक देह चालू शकणाऱ्या व्यक्तीपुरताही फार मोठ्या जीवनपटाचा विचार करते. हाच विचार ती या जगात दिसणाऱ्या सर्व मनुष्यांबरोबरच दगडांपासून इतर सर्व ठिकाणी आकाराला आलेल्या जिवांचा, जीवनाचाही करते, आणि त्या सर्वाला अंतिम कल्याणाची, मुक्ततेची दिशा देते.

आता ज्याची दृष्टी आजचं खाणंपिणं, सुखाचं होणं-न होणं

साधनसंपत्ती वापरणं- एवढ्यापुरतीच संकुचित आहे, त्यामुळं त्यात उद्याचा विचारही बसत नाही, तिथं या जन्मातल्या शेवटच्या क्षणापर्यंतचा विचार बसणंसुद्धा अवघड आहे. आधी म्हटला तसा, श्रद्धेनं केलेला, देहाच्या आधीचा आणि नाईलाज झाल्यास नंतरचा, ते टाळू शकणाऱ्या सूक्ष्म, अदृश्य विश्वव्यवस्थेचा विचार बसणं किती अवघड असेल, याची कल्पना केलेली बरी.

म्हणून मग आजच्या पुरता विचार करणं आणि उद्याचं उद्यावर ढकलणं, हा प्राणिज जीवनाच्या जवळचा अप्रगत, संकुचित विचार अश्रद्ध माणसांकडून का होतो, हे समजणं फारसं अवघड नाही. फक्त आज किंवा या जन्मातल्या सुखाचा विचार करण्यात गैर नाही, पण 'तेवढाच' विचार करणं गैर आहे. कारण या सतत बदलत्या विश्वात असं स्वतःचं सुख टिकवणं शक्य नाही. दुःखही स्वीकारावं लागेल. आज दिसणाऱ्या सुखदुःखाच्या मागच्या कारणांचा विचार करावा लागेल. आजच्या कर्मात काय बदल केले, म्हणजे पुढची सुखदुःखं वाट्याला येणार नाहीत, याचा विचार करावा लागेल. तो करण्यासाठीच माणसाच्या ठिकाणी त्याचं कल्याण करू शकणारी आणि सबंध विश्वाचं कल्याण आणि नियंत्रण साधणाऱ्या भगवंताशी निगडित अशी श्रद्धेची शक्ती ठेवली आहे. आपण ती दुर्लक्षित करू शकतो, आज अनेक व्यक्ती अश्रद्ध बनून ते करत आहेतच. पण त्यापासून होणारं नुकसान टाळणं मात्र शक्य नाही. हे त्यांनीच काय, कुणीही ओळखून असावं.

यात एक महत्त्वाचा मुद्दाही लक्षात घेण्यासारखा आहे. शिक्षणानं माणसाच्या बुद्धीला तर्काची अधिक जोड मिळते. ते चांगलं आहे. पण त्यात मनुष्य अधिक 'बुद्धिमान' होण्यापेक्षा, अधिक 'बुद्धिवादी'ही झाला आहे. त्यातच दुसऱ्या बाजूनं, अश्रद्धेला पूरक होत जाणारी एक मोठी गोष्ट घडताना आपल्याला दिसते. जी काही माणसं 'साध्या अर्थानं' श्रद्धा ठेवतात, त्यातली बरीचशी माणसं ही मुळात श्रद्धेचं खरं स्वरूप न जाणणारी असतात. त्यामुळं

त्यांची श्रद्धा म्हणजे पूजापाठ, यात्रा, प्रासंगिक कुलधर्म-कुलाचार, कुठल्या न कळणाऱ्या आणि अनावश्यक असलेल्या परंपरांचं-रूढींचं पालन- असं ते श्रद्धेचं स्वरूप मानतात. त्यात देवाशी व्यवहारासारखी देवघेव करतात. अनेकदा देवदेव करण्याचं अवडंबर माजवतात, ढोंगीपणाला, बुवाबाजींना साथ देतात, अमुक एक गोष्ट आपण काकरतो आहोत, हे त्यांना ठाऊक नसतं आणि नव्या पिढीनं विचारलंतर सांगताही येत नाही, तरी त्याचा ते हट्ट धरतात, पुढच्या पिढीवर त्यातले देवधर्म, कुलाचार लादतात.

अधिकाधिक बुद्धिवादी होत चाललेल्या पिढीला हे तर पटत नाहीच,त्यावरून संघर्ष होतात,त्यात पुन्हा अशा अर्थानं 'श्रद्धेनं'(?) असे देवदेव करणाऱ्यांच्यात कुठला साधा स्वभावाचा, चांगला फरकही दिसत नाही, हे सारं करण्यानं माझ्या स्वभावात सबुरी, शांती, समजूतदारपणा, निरपेक्षता - असे कुठले फरक पडायला हवेत, अशीही त्यांची भूमिका पुढच्या पिढीला आढळत नाही. त्यातही अशा जुन्या 'श्रद्धेनं'(?) देवदेव करणाऱ्यांना स्वतःलासुद्धा तसे फरक पडावेत, असं वाटत नाही. खऱ्या श्रद्धेची आणि देवाची ओळख नसल्यामुळं, हे घडतं. त्यातही काही वेळा हे न केलं तर काय होईल, या भीतीमुळंही अशी जुनी पिढी हे सारं देवाचं अवडंबर जपताना दिसते. हे सगळं पाहिल्यानंसुद्धा नवी पिढी अधिक अश्रद्ध होते, हेही लक्षात ठेवलं पाहिजे.

जगात जशी अश्रद्धा वाढते आहे, तसा तसा क्षोभ, अशांती, संघर्ष आणि अतिरेकीपणाही वाढतो आहे. त्याचं कारण आपल्यातच असलेल्या या सूक्ष्म, अदृश्य पण कल्याणकारी शक्तीला आपण अंतरलो, हे आहे. आधी सांगितलेल्या कारणांनी शिक्षणातून आणि त्यामुळं तशा पद्धतीनं अश्रद्ध झालेल्या माणसांच्या संस्कारातून घडत चाललेली अधिकाधिक माणसं अलीकडं जास्त का आढळतात, याचं उत्तर उघड आहे !

**

*१४. काही घरांत पतीपत्नींची किंवा दोन पिढ्यांची श्रद्धास्थानं वेगवेगळी असतात. त्यातून मग दोनही स्थानांचे-गुरूंचे फोटो लावणं, उपासना करणं - या गोष्टींवरून मतभेद होतात, याला काय करावं ?*

हा प्रश्न कुणातही असो, असं होतं हे खरं आहे. त्याचं कारण मुळात आपल्याला श्रद्धेचं स्वरूप नीट आणि पुरेसं कळलेलं नसतं, हे आहे. श्रद्धेचं स्थान, प्रतीक, फोटो या गोष्टी दृश्य जगातल्या आणि वेगवेगळ्या असल्या तरी, आपल्यातली श्रद्धेची वृत्ती आणि त्या ज्याचं प्रतीक असतात, तो भगवंत एकच असतो. याची पुरेशी जाणीव नसल्यामुळं, असे मतभेद होऊ शकतात.

ज्याच्यात्याच्या पूर्वजीवनात एखाद्या विशिष्ट गावी असणं, कुणाच्या, कुणा व्यक्तींच्या संपर्कात येणं, त्यांच्यामुळं एखाद्या सत्पुरुषाचा किंवा श्रद्धास्थानाचा परिचय होणं - या गोष्टी तशा बाह्यांगाच्या आहेत आणि त्या व्यक्तीप्रमाणं वेगवेगळ्या असणार, याचं खरं तर स्पष्ट आकलन असणं आवश्यक आहे. आपण कुटुंबात काही पूर्वकर्मांमुळं एकत्र आलेली माणसं आहोत, तर आपापल्या बरोबर अशी वेगवेगळी श्रद्धास्थानं घेऊन आपण एकत्र येणं, हे गृहीत आहे.

प्रपंचात आपलं जे तुझंमाझं आहे, त्यात पुन्हा श्रेष्ठकनिष्ठ आहे, तेच मी खरं तर एक असलेल्या गुरूंना, देवाला त्या प्रपंचात ओढून लावू पाहातो आहे, याबद्दल सावध झालेलं बरं. गुरूंच्या देहातल्या आकृती, स्थानं वेगवेगळी असतील किंवा ती तशी वेगवेगळी आपल्याला वाटत असतील, तरी ती ज्याचं प्रतिनिधित्व करतात, ते गुरुपद एकच असतं. देवदेवतांच्या बाह्य मूर्ती, आकार वेगवेगळे असले, तरी त्यामागं उभा असलेला अव्यक्त निर्गुण देव एकच असतो, हे सत्य म्हणजे श्रद्धेच्या प्रवासातला समजूतदारपणा आहे.

त्यात असंही अनेकदा असतं की, आपल्या मनाच्या ठेवणी जशा वेगवेगळ्या असतात, संस्कारांत जसं वेगळेपण असतं, तसं ज्यालात्याला भावणारं, आवडणारं दैवतही वेगवेगळं असतं. तीच गोष्ट वेगवेगळ्या दिसणाऱ्या संतांच्या, गुरूंच्या बाबतीत असते. तेसुद्धा देहात असल्यानंतर, प्रकृतीच्या ठेवणीप्रमाणं वेगवेगळ्या पद्धतीचे असतात. आपल्याही मनाच्या ठेवणी वेगवेगळ्या असल्यामुळं त्याला अनुकूल असे संत आणि त्यांची शिकवण ही आपल्याला अधिक जवळची वाटते. मला माझ्या श्रद्धास्थानाचं जेवढं माहात्म्य आहे, श्रद्धा बळकट होण्यासाठी जशी उपासना करावीशी वाटते, तशीच ती घरातल्या दुसऱ्या व्यक्तीला त्याच्या ठेवणीला अनुकूल असलेल्या दैवताची, संतांची, गुरूंची करावीशी वाटते, हे समजून घेणं म्हणजे परमार्थातली भक्तपद्धती आहे. तिच्यावरून मतभेद होणं, हे अपरिपक्वपणाचं आहेच, पण त्या श्रद्धास्थानांवरही अन्याय करण्यासारखं आहे. यात कुठं कट्टरपणा किंवा दुसऱ्याच्या श्रद्धास्थानाची अवहेलना होत असेल, तर ते श्रद्धेच्याही विरोधात आहे आणि त्यात्या संतांच्या शिकवणुकीच्याही विरोधात आहे, हे लक्षात ठेवावं.

हे जर पटलं असेल आणि आचरणात आणायचं असेल, तर आपल्या श्रद्धास्थानाबरोबर आपल्या बरोबरच्या दुसऱ्या व्यक्तीच्या इतर श्रद्धास्थानाच्या फोटोचीही तितक्याच श्रद्धेनं पूजा करावी, प्रार्थना करावी आणि अनुभव पाहावा. सत्याचा अनुभव सर्वत्र सारखा असतो. आपल्या खात्रीसाठी उलट आपल्याला असा अनुभव येईल की, अशा श्रद्धेनं शेजारी ठेवलेल्या दुसऱ्या प्रतीकात आपल्याला अधिक शांतीसमाधानाचा अनुभव येईल, खूण मिळेल.

देव असो, संत असोत, गुरू असोत-त्यांतलं वेगळेपण काही गरजेपुरतं, पण प्रापंचिक आहे, तर त्यांच्यातलं ऐक्य हे पारमार्थिक आहे, कारण त्याला असलेला श्रद्धेचा पाया समान आहे !

**

*१५. असलेली श्रद्धा एखाद्या प्रसंगात अश्रद्धा होते, डळमळते तेव्हा काय करावं ? असं होऊ नये असंही वाटतं, याला काय उपाय ?*

मुळात ज्याला आपण श्रद्धा आहे असं म्हणतो, ती खऱ्या अर्थानं तशी नसते, म्हणूनच तिची अश्रद्धा होते किंवा ती डळमळते. मग आपण आधी असलेली श्रद्धा, अश्रद्धा होणं, डळमळणं असं म्हणतो त्याचा अर्थ काय, तर आधी श्रद्धा उत्पन्न झाली, बसली त्यावेळी ती खऱ्या अर्थानं श्रद्धा उत्पन्न झालेली नाही, तर त्यावेळी माझ्या मनात जे काही होतं, ते त्या ठिकाणी गेल्यानं किंवा कुणाचं ऐकल्यानं घडलं, एवढाच त्याचा अर्थ.

या अर्थानं पाहिलं तर, माझी श्रद्धा खऱ्या अर्थाची श्रद्धा तर नाहीच. कुठल्या देवावर, गुरूंवरही ती नाही. ती फक्त माझी कामं यशस्वी होण्यावर आहे. अर्थातच, ती माझ्या स्वार्थावरची श्रद्धा आहे. तो पुरा झाला, म्हणून ती बसली आणि ज्यावेळी तो पुरा झाला नाही किंवा त्यापेक्षा वेगळं काही झालं, की ती उठली, एवढंच.

याला आणखीही काही कारणं आहेत. काही ठिकाणं किंवा व्यक्ती यांना त्यांच्या साधनेनं काही शक्ती वश झालेल्या असतात. त्यांच्याकडं जाऊन एखाद्याचं काम झालं, म्हणून दुसरा जातो. त्यातलेच एक आपण असतो. माणसाला त्यांची ती शक्तीही नको असते, उपासना नको असते आणि खरंतर, खरा देवही नको असतो. फक्त त्या शक्तीच्या साहाय्यानं होणारी आपली कामं हवी असतात. मग काय होतं की, असा शक्तीचा वापर माणसातली शक्ती संपवून टाकतो. मागचं काम झाल्याच्या अनुभवानं आपण पुन्हा गेलो, तर व्यक्ती तीच असली, तरी तिच्या ठायी शक्ती नसल्यामुळं आपलं काम होत नाही. आपला संबंध आपल्या कामाच्या यशाशी असल्यामुळंही आपली श्रद्धा डळमळते.

आणखी एक कारण असं की, भगवंताकडं जाण्याच्या

श्रद्धेच्या प्रवासात, मूळ भगवंताची शक्ती अमर्याद असल्यामुळं असं काही शक्तिरूप सामर्थ्य या प्रवासात येऊ शकतं. त्याची जाणीव झाली आणि उपयोग होतो आहे, असं लक्षात आलं, तर त्या व्यक्तीला, तो उपयोग करून घ्यावासा वाटतो. मग त्यामुळं गोळा होणारे लोक, वेळी अगदी त्यांची दुःखं दूर करण्याची सात्त्विक वाटणारी, पण अहंकारजन्य, रजोगुणी इच्छा, काहींना तर, भगवंताचं भान न राहून, अशा शक्तींच्या वापरातून मिळणाऱ्या मान, लौकिक,पैसा - अशा अनेक गोष्टींची भूल पडून, असे वापर होतात. पण ते भगवंताकडचा प्रवास थांबवतात आणि अशा प्रत्येक वापराबरोबर अशा व्यक्तीची साधना आणि शक्तीही घटत जाते. अनेकदा अशा व्यक्ती विक्षिप्त होऊन, आडमार्गाला लागतात. इतरांचीही अश्रद्धा होते.

तिसरं कारण म्हणजे, समजा, अशी श्रद्धा एखाद्या समाधिस्थानावर असते. समाधी अवस्थेला गेलेली व्यक्ती, संत हे हयात असताना, मुक्तही असतात आणि अव्यक्त रूपात, समाधिअवस्थेतही कल्याणाचं कामही करीत असतात. त्यांच्या अशा अव्यक्त, पण प्रेरक अस्तित्वामुळं तिथं शांती आणि समाधानाचा अनुभव, येणाऱ्या व्यक्तीला येतो. अशा तऱ्हेच्या प्रेरक अस्तित्वात तर काही फरक पडत नाही. पण ते श्रद्धास्थान, त्या संतांना अभिप्रेत असलेली साधना करून टिकवणं, हे जवळ राहाणाऱ्यांचं कर्तव्य असतं. त्यात कसूर होत गेली, तर त्याचा परिणाम तिथल्या संतांच्या पवित्र वातावरणावर होतो. ते त्या अर्थानं खाली येतं. मग येणाऱ्या व्यक्तीला पूर्वीसारखा शांतीचा, समाधानाचा अनुभव येत नाही.

त्यात्या परिस्थितीनुसार यावरचे उपाय ठरतील. व्यक्ती हयात असतील तर, त्यांच्या बाह्य वागण्यावर जाऊ नये. कारण ते ज्या जगात वावरतात, त्याची कल्पना येण्याएवढी आपली उपासना नसते. त्यामुळं त्यांच्या वागण्यावर आपली श्रद्धा अवलंबून ठेवू

नये. ती व्यक्तीवर असण्यापेक्षासुद्धा,त्यांनी सांगितलेल्या साधनावर ठेवली आणि ते केलं, तर ती डळमळणार नाही.

दुसरं म्हणजे, आपली श्रद्धा मुळात आपली कामं होण्यावर अवलंबून आहे का, हे तपासून पाहावं. तशी असेल तर, ती अश्रद्धा होणं किंवा डळमळणं कधीही शक्य आहे. कारण, आपले स्वार्थ कधी संपणार नाहीत आणि ते पुरे करणं हे त्यांचं काम नाही. मागायचं तर कुठल्याही परिस्थितीत माझं समाधान टिकू दे, हे मागणं सर्वांत योग्य आहे. त्याचा अनुभव येत असेल तर ते श्रद्धास्थानही बरोबर आहे आणि आपलं मागणंही बरोबर आहे. मग ते डळमळण्याचा प्रश्न निर्माणच होणार नाही.

जिथं कुठल्या व्यक्तीच्या अशा काही शक्तीमुळं कामं होत असतील, तर तो भक्तीचा, श्रद्धेचा शुद्ध मार्ग नाही, हे लक्षात ठेवावं. लौकिक प्रयत्नानं होणाऱ्या कामांना प्रार्थनेची जोड द्यावी, आणि अशा ठिकाणी जाणं टाळावं. म्हणजे असल्या मार्गानं श्रद्धा कमीजास्त होणं टळेल. काम होणारच असेल, कल्याणाचं असेल तर भगवंताच्या असीम कृपेनं ते बसल्या जागीसुद्धा होऊ शकतं. अशा बाबतीत तेच हिताचं !

देवळासारख्री, समाधिस्थानांसारख्री ठिकाणं ही श्रद्धा बळकट करायला पूरक असतात. पण फक्त देवळातल्या मूर्तीशी, समाधीशी आपला श्रद्धेचा संबंध आहे हे लक्षात ठेवून, तिथं जाऊन येणं हे उपयोगी पडतं. पण ते तितकं सोपं नाही. जर तिथं वर्दळ नसेल, माणसं सात्त्विक-साधनी असतील, तर त्या ठिकाणाहून प्रेरणा मिळेल आणि श्रद्धाही डळमळणार नाही. पण परिसरातल्या व्यक्ती तशा नसतील, त्यांच्यामुळं आपली श्रद्धा डळमळत असेल तर मूर्ती किंवा समाधीऐवजी त्यांच्याकडं लक्ष जातं. काही वेळा आपलं मूळ मूर्ती किंवा समाधीकडं कितपत अढळपणे लक्ष आहे, याची ती परीक्षाही असते. ती परीक्षा म्हणून देता येत नसेल, तर ती मूर्ती किंवा समाधी ज्यांची आहे, त्यांचं स्मरण करून, घरी उपासना केलेली उत्तम ! **

*१६. एखादं सामाजिक कार्य, कला, शिक्षण, क्रीडा यांसारख्या क्षेत्रांतल्या कार्यांवरची श्रद्धा आणि ईश्वर किंवा अज्ञात शक्तीवरची श्रद्धा यांत काय फरक आहे?*

एखादं सामाजिक कार्य आपण आधी उदाहरणादाखल पाहू. ते कार्य हे एखादं ध्येय किंवा हेतू साध्य करण्यासाठी, समाजातला एखादा प्रश्न सोडवण्यासाठी केलं जातं. ते कार्य केवढं आहे याप्रमाणात त्या कार्याला लागणाऱ्या व्यक्तींची संख्या आणि संघटनेची गरज अवलंबून असते. एखाद्या रोगाचं निर्मूलन करणं किंवा अशा व्यक्तींचं पुनर्वसन करणं, एखाद्या दुष्काळी भागात असलेला पाण्याचा प्रश्न सोडवणं - इथंपासून देशाला स्वातंत्र्य मिळवण्यापर्यंत कुठलंही कार्य अशा स्वरूपाच्या कार्यांत येऊ शकतं.

ते कार्य करणाऱ्या शेवटी काही व्यक्ती असतात. ते मूळ काम व्हावं आणि त्यासाठी प्रयत्न केले जावेत, त्या प्रयत्नांनी ते कार्य होईल, याची त्या सर्वांना वाटणारी खात्री, म्हणजे त्या कार्यापुरती वाटणारी श्रद्धा होय. हे मूळ ध्येय आणि श्रद्धा ही त्यापुरती बरोबर असली आणि त्यानुसार अशी अनेक सामाजिक कार्यं चालत असली, तरी त्यांतली श्रद्धा आणि ईश्वर किंवा अज्ञात शक्तीवरची श्रद्धा यांत फरक कुठं आहे, ते पाहू.

या तऱ्हेच्या सामाजिक कार्यांच्या बाबतीत त्या सोडवण्याचा प्रश्न हा केंद्रस्थानी असतो. तो सोडवण्यासाठी करायचे उपाय, त्या कार्यात भाग घेणाऱ्या व्यक्तींचे हेतू शुद्ध असणं, अर्थातच साध्या भाषेत त्यातल्या संघटनांतली पदं, मान, प्रतिष्ठा यांच्या कुठल्या अपेक्षा नसणं, प्रश्न सोडवण्याचे जे मार्ग आहेत त्यांबद्दल एकमत असणं - इथं ही कार्य अडायला सुरुवात होते. त्यातूनही हे सारं बरोबर असलं, यापद्धतीनं प्रश्न सुटेल याची खात्री असली तरी, यामधले जवळपास सगळे प्रश्न हे काही काळापुरते असतात.

उदाहरणार्थ, एखाद्या साथीच्या रोगाचं निर्मूलन. ते निर्मूलन करण्यासाठी आटोकाट प्रयत्न या श्रद्धेमुळं घडतात. त्याचा परिणाम म्हणून त्या रोगाचं निर्मूलनही होतं. असे अनेक रोग आज नाहीसे झालेले आहेत, हेही खरं. पण त्यातूनच अशी परिस्थिती निर्माण होते की, या प्रश्नासाठी एकत्र आलेल्या आणि कार्य करून त्यात यशस्वी झालेल्या व्यक्तींनी हा प्रश्न सुटल्यानंतर एकत्रित कसं राहावं आणि पुढं काय करावं, हा प्रश्न निर्माण होतो.

मग व्यक्तींची पांगापांग होते. कारण, प्रश्नानं निर्माण झालेलं कार्य प्रश्न सुटला की संपतं. मग काही व्यक्तींना पुढं काय करावं, हा प्रश्न निर्माण होतो. मग त्यातल्या काही व्यक्ती एखादा नवीन प्रश्न हातात घेऊन त्याबद्दलचं कार्य सुरू करतात. त्याची अवस्था अर्थातच पुढं अशी होणार असतेच. तर काही व्यक्ती कुठं असे प्रश्न आहेत का, या शोधात राहातात. तर काही व्यक्ती कार्य नसल्यामुळं दिशाहीन होऊन जातात. त्यात त्यासाठी संस्था, पदं, पैसा - यांचा संचय असेल तर, त्यामुळं निर्माण होणाऱ्या समस्या या नवीन गंभीर प्रश्न निर्माण करतात. ते मूळ मनाचे प्रश्न असल्यामुळं ते तसेच अधांतरी राहातात.

आपण हे पाहिलं असेल की, राजकीय स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी,आपला व्यवसाय, शिक्षण, नोकरी, कुटुंब-अशा गोष्टींचा त्याग करून, राजकीय स्वातंत्र्यासाठी करायच्या कार्यावरच्या श्रद्धेमुळं हजारो माणसांनी अपरिमित कष्ट केले. त्यांच्याबद्दल पूर्ण आदर राखूनसुद्धा आपण अनेकांनी ही वस्तुस्थिती जवळून पाहिली असेल की, असं स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते कार्य उरलं नाही. अनेक व्यक्ती मोकळ्या राहिल्या. पुढं काय करावं, यासंबंधी संभ्रमात राहिल्या. शक्य झालं त्या काही व्यक्ती सत्ता मिळवून वेगळ्या दिशेला गेल्या. काहींना तर, रोजीरोटीचा प्रश्न निर्माण होऊन, त्यासाठी नेहमीचं प्रापंचिक कष्टमय जीवन पुढं जगावं लागलं.

असं अनेक सामाजिक कार्यांच्याबद्दल घडताना आपल्याला

दिसेल. अशिक्षितांना शिक्षण देणं असो, संगीतात प्रावीण्य मिळवणं असो, क्रीडेत नैपुण्य मिळवणं असो - किंवा या साऱ्या गोष्टी इतरांसाठी करण्याचं सामाजिक कार्य असो. त्यात्या बाबतीत पुन्हा असं कुठंतरी तोच प्रश्न संपून थांबावं लागतं. ते प्रयत्न करतानासुद्धा व्यक्तींचे आग्रह, अहंकार, स्वार्थ, पैशाचे लोभ, एकमेकांतले मत्सर- असल्या गोष्टी अनुभवाला आल्या तर, अनेकदा अनेकांची त्याकार्यावरची श्रद्धाही उडून जाते.

सांगण्याचा सारांश असा की, या कुठल्याही प्रश्नाच्या किंवा कार्याच्या बाबतीत, तो सोडवण्याच्या पद्धतीनं सुटेल, असं वाटणारी खात्री ही श्रद्धेसारखीच असली तरी, मूळ प्रश्न किंवा कार्य हे शाश्वत स्वरूपाचं नसतं. ते सहा महिने-वर्षभराचं असो किंवा पाच-पन्नास वर्षं चालणारं असो, तोतो प्रश्न किंवा तेते कार्य हे काळाच्या आधीन असल्यामुळं ते कुठंतरी संपतं किंवा प्रश्न नाहीसा होतो. त्यामुळं मग श्रद्धेला त्या अर्थानं विषय उरत नाही. कार्यही उरत नाही.

इथं श्रद्धेचा जो व्यापक अर्थ आहे, जो अस्तित्व आणि ईश्वर अशा गोष्टींशी निगडित आहे, त्या शाश्वत आहेत. सामाजिक कार्यांत एखाद्या प्रश्नामुळं बुद्धीला आणि मनाला त्या त्या काळापुरतं काम मिळून, ती गुंतून राहातात, हे खरं आहे. पण त्यामुळं माणसाचे जे खरे प्रश्न आहेत, ते दुर्लक्षित राहातात आणि ते सुटले नाहीत तर, त्याला प्रत्येक टप्प्यावर अखेरपर्यंत ते अशांती, क्षोभ, अस्वस्थता आणि असमाधान देत राहातात.

विकार, स्वार्थ, अहंकार, सतत कुठल्या ना कुठल्या विषयाचं खाद्य लागणं - अशा मनाच्या आपल्याला बांधून ठेवणाऱ्या आणि अस्वस्थ ठेवणाऱ्या घटकांचा परिचय होऊन, बुद्धीची मर्यादा ओळखून, ती निर्माण करते त्या संदेहांतून, घोटाळ्यांतून मुक्त होणं आणि मनाच्या अशा सापळ्यांना ओळखून, त्यांच्यापासून सावधान राहून, मनाचा शाश्वत कामासाठी उपयोग करून घेता येणं-ही खरी कायम टिकणारी ध्येयं आहेत. ती माणसाच्या स्वास्थ्याला गरजेची

आहेत. ती करण्यासाठी लागणाऱ्या सूक्ष्म, शाश्वत अस्तित्वाची आणि ईश्वर किंवा कोणतंही नाव दिलं तरी चालणाऱ्या अज्ञात शक्तीवरची खात्री आणि त्यानुसार जीवन जगणं, ही जी शक्ती माणसाच्या ठिकाणी दिली आहे, ती म्हणजे खरी श्रद्धा होय. ती अर्थातच, माणसाच्या सबंध जीवनाला व्यापून उरणारी आहे आणि माणसाला आधी उल्लेख केलेल्या, दुःखद ठरणाऱ्या सर्व बंधनांतून मुक्त करणारी आहे.

म्हणून खऱ्या श्रद्धेचं कार्य जन्मापासून मृत्यूपर्यंत श्वासासारखं अविरत चालतं. समजा मनाच्या, बुद्धीच्या आणि तशा तऱ्हेच्या बद्ध करणाऱ्या अशांती-अस्वास्थ्य देणाऱ्या घटकांपासून माणूस मुक्त झाला तरी, इतर कार्यांबाबत व्हावं तसंत्याचं या बाबतीत होत नाही. प्रश्न संपल्यावर निर्माण होणारी पोकळी इथं नाही. कुणीही - माणूस अशा तऱ्हेनं मुक्त होऊ शकतो. त्या अर्थानं त्याच्यातलं देवपण पूर्ण जागृत होतं. तशाही स्थितीत देहाची मदत संपेपर्यंत त्याला स्वतःला स्वतःचं कुठलं काम उरलेलं नसतं. म्हणून तो फक्त ईश्वराशी एकरूप असल्यामुळं, त्याच्या इच्छेनुसार काम करतो किंवा आनंदात 'स्व'स्थ राहू शकतो. शिवाय लौकिक व्यवहारानुसार, प्रपंचाच्या ठेवणीनुसार त्याच्या वाट्याला काही कामं उरली असतील तर ती, त्यात कुठं न गुंतता कर्तव्य भावनेनं करीत राहू शकतो.

इतर कुठल्याही कार्यामध्ये नंतर निर्माण होणारी पोकळी अस्वस्थ करणारी असते, रिकामंपण दुसरं काम शोधायला प्रवृत्त करणारं असतं, त्या कार्यावरच्या श्रद्धेची ती मर्यादा आहे. पण ईश्वरावरची श्रद्धा ईश्वरासारखीच असीम, शाश्वत असल्यामुळं माणसाला कायमचं मुक्त करते, आनंदी करते. दैवी श्रद्धेच्या परिसाचा स्पर्श झालेल्या लोखंडाचं एकदा सोनं झालं की, पुन्हा त्याला लोखंड व्हावं लागत नाही, हाच तो फरक !

**

*१७. श्रद्धेचा अनुभव येतो का व कोणता ?*
*अनुभव आणि श्रद्धा यांचा संबंध कोणता ?*
*श्रद्धेनं आलेला अनुभव आणि भ्रम यांतला फरक*
*कसा ओळखावा ? श्रद्धा ठेवूनही अनुभव येत*
*नाहीत, तेव्हा काय करावं?*

श्रद्धेचा अनुभव येतो. मात्र, मूळ श्रद्धेबद्दल, तिचा अनुभव कोणता याबद्दल, त्यात होणाऱ्या भ्रमांबद्दल अनेक समज-अपसमज असल्यामुळं, खरी श्रद्धा, खरा अनुभव इत्यादी लक्षात येण्यासाठी, श्रद्धेच्या गरजेच्या असलेल्या खऱ्या अनुभवांचा आणि त्याच्या खुलाशांचा क्रमानं विचार करूया.

अनुभव - १. आपण जगात उगीच आलो नाही.

खुलासा - या जगात कुठलीच गोष्ट उगीच घडताना दिसत नाही. गुलाबाच्या झाडाला गुलाबाचं फूल येणं, फणसाच्या झाडाला फणस लागणं - असे असंख्य अनुभव येतात. उगीचच कुठंतरी, कसलं तरी फूल येत नाही किंवा फळ धरत नाही. त्यातसुद्धा फूलफळ असत नाही. फळ फूल असत नाही. त्याअर्थी मीसुद्धा जगात असा उगीच आलो नाही किंवा ज्या स्वरूपात आलो, त्या स्वरूपातही उगीच येऊ शकणार नाही.

आता आंब्याच्या झाडाला जसा आंबा येताना दिसतो आणि आंब्याच्या झाडाला आंबाच येतो, हा आपण अनुभव घेत असलो, तरीसुद्धा ते झाड ज्या कोयीपासून उत्पन्न झालं, ती लावताना आपण पाहिलेली नाही. अनेक झाडांच्या बाबतीत ते शक्यही नाही. तरीही,आंब्याच्या अस्तित्वावरून आजही, कुठंतरी पूर्वी कुणीतरी, कोय लावली असली पाहिजे, हे प्रत्यक्ष न दिसताही - अनुमानानं आपल्याला कळतं. तेच, तसंच माझ्या या जगात येण्याच्या बाबतीत आहे. त्यालाही काही कार्यकारण आहे.

एवढं लक्षात यायला तात्कालिक वस्तू, व्यक्ती यांच्यापलीकडं

जाऊन, न दिसणाऱ्या पण कारण असलेल्या, त्याचबरोबर ते कारण सुसंगत व्यवस्थेचा भाग आहे, हे कळायला - माणसाला त्यापलीकडं जाणाऱ्या एखाद्या क्षमतेची गरज आहे, हे उघड आहे. अशी क्षमता म्हणजे श्रद्धा होय. ती अस्तित्वात असतेच. फक्त मला जाणीव झाली तर, तिचं काळापलीकडं जाऊन, कार्यकारणाचं ज्ञान देण्याची क्षमता माझ्या लक्षात येते, हा त्या श्रद्धेचा अनुभव आहे.

आता एवढं सगळं समजू शकतं. पण ते समजून घेण्याची सामान्य माणसाला गरज वाटत नाही, तशी जिज्ञासाही नसते. म्हणून मग ते कळतही नाही. पण कळून घेण्याची जिज्ञासा असेल तर, समजून देण्याची व्यवस्था आहे ! ती व्यवस्था लौकिक पातळीवर दिसणाऱ्या जगापुरती, कार्यकारणाच्या भाषेत आहे. तर, दृश्य-अदृश्य दोन्हीही पातळ्यांवर श्रद्धेच्या भाषेत आहे. म्हणून 'श्रद्धावान्लभते ज्ञानम्' असं म्हटलेलं आहे !

ही जिज्ञासा नसली तर, मनुष्य त्याच्या आवडीप्रमाणं फक्त आंबा खाईल किंवा फणस खाईल. त्याची भूक भागेल. तो इतर कामांकडं वळेल. पुन्हा भूक लागली तर, काय खायचं, एवढाच त्याच्यापुढचा प्रश्न असेल. म्हणून त्याला आंब्याचं झाड, त्याच्यामागची कोय,त्यातला दिसणारा-न दिसणारा कार्यकारणभाव - असल्या गोष्टींत जाण्याची गरज वाटत नाही. त्याविषयी जिज्ञासा नसते. म्हणून मग श्रद्धेचा खरा अनुभव येत नाही. मग फक्त शारीरिक पातळीवर भूक लागणं, फळ खाल्यानं पोट भरणं - एवढंच त्याला पुरेसं ठरतं. अर्थात, हे जीवन जवळजवळ प्राणिज जीवनासारखं अप्रगत आहे, हे लक्षात येण्यासारखं आहे.

झाडावरून आलेलं फळ जमिनीवर पडतं, हे लाखो माणसांनी पाहिलेलं आहे. पण ते तसंच का पडतं, याची जिज्ञासा न्यूटनसारख्या एखाद्या माणसालाच वाटते. मग, तो ते वरून खालीच का पडतं किंवा खालून वर का जात नाही - या प्रश्नांची उत्तरं शोधून गुरुत्वाकर्षणाच्या या जगातल्या एका नियमापर्यंत

जाऊ शकतो. तशी जिज्ञासा असेल आणि तसं संशोधन करीत गेलं तर, हे ज्ञान इतर कुणालाही होऊ शकतं. पण या जिज्ञासेचा अभाव एवढंच ते इतरांना न होण्याचं कारण आहे.

यात माणूस म्हणून तरतमभाव नसला तरी, जिज्ञासा, तिचा पाठपुरावा याबाबतीत मात्र प्रगत - अप्रगत असा फरक आहे, हे आपण समजून घेऊ. आता इथंच हा विचार करावा की, हा अनुभव एक फळ पडण्याचा नाही तर, अशा कोणत्याही वस्तू वरून सुटल्या की, जमिनीवर पडतात, हे उगीच घडत नाही, हे जिज्ञासू म्हणून त्याला शोधावंसं वाटलं.

तसंच, त्यावेळी, त्याचं कारण आपल्याला शोध घेतल्यानंतर सापडू शकेल, याचीही एक सकारात्मक खात्री त्याला होती. ती म्हणजे ही माणसाच्या ठिकाणी असलेली श्रद्धा होय. ते कारण सापडणार नाही, असं वाटलं तर, पुढचा शोधही नाही, त्याचा नियमही कळणार नाही. म्हणून, हजारो वर्षांपूर्वी असे नियम समजून घेण्याची इच्छा असलेल्यांना सुरुवातीला 'श्रद्धत्स्व सौम्य' - आत्ता तुला कळत नसलं किंवा सूक्ष्म कारण अदृश्य असलं तरी, ते शोधानंतर तुला कळेल, याची सकारात्मक खात्री - म्हणजे श्रद्धा - ठेव, असं सांगितलं आहे.

आता त्या सकारात्मक खात्रीमुळं - श्रद्धेमुळं - क्रमाक्रमानं शोधत गेल्यानंतर, अनेक टप्प्यांनी या गुरुत्वाकर्षणाचा पृथ्वीपुरता उलगडा झाला. त्यातून गुरुत्वाकर्षणाचा सूक्ष्म, पण अबाधित नियम कळला. त्याची व्याप्ती इतर विश्वातसुद्धा आहे, असं सिद्ध होत गेलं आणि त्याला एका शास्त्राचं स्वरूप आलं. न्यूटन शास्त्र जाणणारा शास्त्र'ज्ञ' झाला. पण त्याचं कारण तो जिज्ञासेच्या टप्प्यावर जन्माला आलेला होता, म्हणून हे शक्य झालं.

त्याला जे कळलं ते त्याच्या पातळीवर असलेल्या अशा कोणत्याही जिज्ञासूला कळणं शक्य आहे, म्हणजेच योग्य प्रयत्न केल्यास, सकारात्मक खात्री - श्रद्धा बाळगल्यास, कुणालाही असे

अनुभव कुठल्याही क्षेत्राच्या बाबतीत येऊ शकतात. आता ते इतरांना येत नाहीत, कारण त्यांच्याजवळ ही जाणण्याची इच्छाही नाही, आणि ही सकारात्मक खात्री, म्हणजे श्रद्धाही नाही.

असंच मागं जाऊन पाहिलं तर, प्राणिवर्गात अशा तऱ्हेची जिज्ञासा आढळणार नाही. फक्त भूक आणि त्याला लागणारं खाद्य, तितपतच छोटासा कार्यकारणभाव त्याला उपजतच कळतो. सामान्य माणसाच्या ठिकाणी याच्यापेक्षा थोडी अधिक जिज्ञासा आढळते. प्रगतीच्याच भाषेत समजून घ्यायचं तर, कालचा प्राणी आजचा माणूस आहे, तर, आजचा जिज्ञासू माणूस उद्याचा शास्त्रज्ञ आहे आणि आजचा शास्त्रज्ञ, हीच श्रद्धा, अधिक परिपक्व असेल तर, उद्याचा भक्त आहे !

अनुभव - २. आपल्या येण्याला काही कार्यकारण आहे. ते कार्यकारण संपलं की, खरंतर माझं काम संपतं. पण ते संपवताना ते नीट न कळल्यामुळं, मी जी आनुषंगिक किंवा बेसावध कर्मं करतो, त्यांुळं पुन्हा कार्यकारणाची साखळी निर्माण होते.

खुलासा - जगात येण्याचं माझं विशिष्ट स्थान, ज्यांच्यात येणार ती माणसं, ते कुटुंब, त्यांच्या ठिकाणचे संस्कार - हे जसं घडतं तसंच घडतं. त्यापेक्षा वेगळं घडणं आपल्या हातात कधी असत नाही. आता त्याचं कारण असलं पाहिजे. त्या जागेचा, माणसांचा माझा काही पूर्वीचा राहिलेला ऋणानुबंध हा त्याला कारण असला पाहिजे. इथं जन्माचाच प्रश्न असल्यामुळं, त्या कार्यकारणभावाची मुळं ही माझ्या जन्माच्या आधीच्या प्रांतात - जन्मात असली पाहिजेत. आधी म्हटलं तसं, ती समजून घ्यायची असली तर, तशी प्रखर जिज्ञासा आणि त्यासाठी लागणारी शोध घेण्याची किंवा इथल्या आधीच्या जन्माच्या संदर्भात उपासनेची, तपश्चर्येची, वेळी कृपेचीसुद्धा आवश्यकता लागेल.

याची अर्थातच, फारशी गरज नाही. कारण त्यानं त्यामुळं

झालेले परिणाम हे आता सुरूच झालेले असतात. त्यात्या कर्मांच्या परिणामांप्रमाणं ते तेवढा काळ सुरू राहाणारही असतात. मग एखाद्या गोष्टीचा परिणाम संपला की, ते गाव बदलतं. आईवडील किंवा इतर माणसं काळाच्या पडद्याआड जातात. कुणी नवीन माणसं अनपेक्षितपणे आयुष्यात येतात, न ठरवता अनेक कामं आपल्याला करावी लागतात, ती टळत नसतील तर, त्यांचं कारण या पूर्वजन्मातल्या राहिलेल्या परिणामांत आहे, हे ओळखू शकतं.

इथंसुद्धा सामान्य माणसांच्या दृष्टीनं यात काही विचार करण्यासारखं वाटत नाही. तो जन्मतो आणि वातावरणाप्रमाणं जमेल तसं जगत राहातो. यात त्याला परिणामांना सामोरं जाणं चुकत नाही. पण ते समजून घेण्याची जिज्ञासा नसल्यामुळं हे सगळं करताना - सोसताना सुखदुःख होत राहातात.

तेच जिज्ञासू माणसाच्या दृष्टीनं, याला काही आपल्याकडच्याच पूर्वकर्मांची कारणं आहेत, याची जाणीव असल्यामुळं जगताना तटस्थताही असते, सुखदुःखाचे हेलकावेही नसतात आणि सावधानताही असते. त्यात्या गोष्टींची कारणं भले त्याला कळत नसतील तरी, ती असतात, याविषयी त्याला सकारात्मक विश्वास असतो. श्रद्धा असते. त्यामुळं आपल्यावर अन्याय झाला किंवा कुणावरतरी आपल्यामुळं अन्याय होतो, हे किंवा अशा तऱ्हेचे भ्रम त्याला होत नाहीत.

जग कार्यकारणभावानं निश्चितपणे बद्ध असल्यामुळं, असल्या वाट्याला येणाऱ्या गोष्टींबद्दल, अशी श्रद्धावान व्यक्ती शांत राहू शकते. अशी अटळ कर्मं करून, तो त्याच्या पूर्वीच्या कर्मांच्या पाशांतून मोकळा होतो. जगतानाची आपल्या स्वाधीन नसलेल्या गोष्टींबद्दलची ही शांती, हा श्रद्धेचा साक्षात अनुभव आहे. त्या अनुभवाचा दुसरा फायदा असा की, काही कर्मं अशी अटळ असली तरी, अनेक कर्मांच्या बाबतीत माणसाला निवडीचं स्वातंत्र्य असतं, हेही त्याला कळू शकतं.

सामान्य माणूस समोर येतील तशी कामं करीत जातो, आणि ती साखळी त्याच्याकडून सुरूच ठेवली जाते. हा जिज्ञासा व श्रद्धा नसल्याचा परिणाम आहे.

तर जिज्ञासू माणूस त्यातली अटळ कोणती, ती बाजूला करू शकतो. ज्यात स्वातंत्र्य आहे, ती ओळखू शकतो आणि सत्याला धरून, सात्त्विक असलेली, त्याला ईश्वराकडं-उद्धाराकडं नेणारी कर्मं निवडून, तेवढीच करू शकतो.

त्यामुळं सामान्य मनुष्य कर्मकचाट्यातून न सुटता, बंधनांत जन्मला तसाच बंधनात मृत्यू पावतो. ही बंधनांची साखळी जन्मोजन्मी तशीच सुरू राहाते. तर जिज्ञासू, श्रद्धावान मनुष्य अशा मुक्तिकारक कर्मांनी मुक्त होऊन जातो. एखाद्या विशिष्ट कर्मातलं यश-अपयश हे श्रद्धेचे अनुभव नव्हेत तर, त्यात्या कर्मात यश-अपयश काहीही असलं तरी, त्याचं आयुष्य निरुपाधिक आनंदात जातं - हा श्रद्धेमुळं येणारा आणखी एक खरा अनुभव आहे.

अनुभव - ३. या जन्मात मला कर्मस्वातंत्र्यही आहे. ते जाणून घेण्याची शक्तीही माझ्या ठिकाणी आहे.

खुलासा - श्रद्धा नसेल तर, असं काही कर्मस्वातंत्र्य मला आहे, याचीही कल्पना येणार नाही आणि अर्थातच त्याचा वापर करून, मला माझं ध्येयही गाठता येणार नाही. पण जिज्ञासेमुळं काही कर्मं अटळ तर, काही कर्मं टाळता येण्यासारखी, निवडता येण्यासारखी असतात, हे माणसाचा विश्वाच्या यंत्रणेवर-ईश्वरावर विश्वास आणि ती मला कळू शकतात, याची सकारात्मक खात्री, म्हणजे श्रद्धा असेल तरच कळत जातात. मग त्यानुसार आपल्या आयुष्याचा कर्मप्रवास अधिक जाणीवपूर्वक आणि यशस्वी होतो !

अनुभव - ४. पूर्वीची कर्मं संपली की, नवी कर्म करताना, हा कार्यकारणभाव सांभाळून,मला शुद्ध कर्मांकडं जाता येईल. मुक्त

राहून काम कसं करावं, याचं ज्ञान होईल. ती शक्तीही माझ्या ठिकाणी आहे.

खुलासा - सामान्य माणूस, कर्मं समोर येतील तशी करीत जातो आणि त्याचे होतील तसे परिणाम भोगत जातो. ते परिणाम या देहात न संपले तर, त्याला पुन्हा यावंही लागतं.

पण जिज्ञासा असली तर, तशी सगळीच कर्मं अटळ किंवा करण्यासारखी नसतात, हे समजू शकतं. मग आवश्यक तो शोध घेतला की, कर्मांची निवड करता येते. कर्म - परिणाम यांत कार्यकारणभाव हा मूलभूत आहे, राहाणारच आहे. असं असेल आणि मला मुक्त करणारे, भगवंताकडं नेणारे परिणाम हवे असतील तर, हाच कार्यकारणभाव समजून घेऊन, सावध राहून, मला त्याला योग्य अशी शुद्ध कर्मं निवडता येतील.

ती जितकी निरपेक्ष, निःस्वार्थी असतील तितकी ती शुद्ध राहातात. करताना साक्षीभाव टिकतो. ती करताना मुळात स्वार्थ, अहंकार, मीपणा, पोकळ वेगळेपणा - असल्या कुठल्या वृत्तींतून निर्माण होत नाहीत ना, यावर सावधपणे लक्ष ठेवता येतं. तशी असल्यास ती टाळता येतात. मग कार्यकारणभाव सांभाळूनसुद्धा माणसाला अशा सावध कर्मांमुळं, मुक्तता साधता येते. कर्म करण्यापूर्वी, करताना आणि केल्यानंतर सावध आणि त्यामुळं आनंदी राहाता आलं तर, त्यासारखा श्रद्धेचा कर्मांच्या बाबतीतला कुणालाही येऊ शकणारा, दुसरा अनुभव नाही !

अनुभव - ५. मी ज्यात जगतो ते जग हे त्यापलीकडल्या अज्ञात, ईश्वर-देव या नावानं ओळखल्या जाणाऱ्या, अनादी-अनंत शक्तीनं नियंत्रित होतं. ही अज्ञात शक्ती - ईश्वर - सर्वत्र, सदैव अस्तित्वात आहे आणि त्याला फक्त प्रत्येक जडचेतन जिवाच्या कल्याणाची निर्मळ, निरपेक्ष इच्छा आहे.

खुलासा - हा श्रद्धेचा अनुभव अशासाठी आहे की, एरवी मी

स्वतःपुरतंच जगतो.मला सुखाच्या ठरणाऱ्या गोष्टी योग्य समजतो. दुःखाच्या अयोग्य समजतो. जगातल्या इतर माणसांमध्ये सुद्धा भेदाभेद, श्रेष्ठकनिष्ठ ठरवतो. झाडपेड, नदीनाले, डोंगरदगड - अशा गोष्टी तर मी माझ्यापेक्षा कमी प्रतीच्या आणि वेळी अचेतनही समजतो. त्यामुळं माझ्याकडून होणारे व्यवहार तशा पद्धतीचे राहातात, अर्थातच ते पुन्हा सदोष होतात.

उदाहरणार्थ - माझ्या उपयोगासाठी, मी निसर्गानं वाढवलेलं झाड, विचार न करता तोडतो. सहजतेनं सागराकडं वाहून जाणाऱ्या नद्या अडवतो. अन्नाऐवजी जमिनीतून, मी तंबाखूपासून, अनेक प्रकारची माझी व्यसनं पुरवणारी पिकं घेतो. माझ्या जिभेच्या चोचल्यांपोटी, चटक लागून मी माझ्यासारख्याच जिवंत, निष्पाप प्राण्यांचे बळी घेतो. यातून होणारे कर्मांचे बाधक परिणाम उघड आहेत. पण त्याबद्दल मी सावध नसल्यामुळं, जगातला मी एक घटक आहे, जग माझ्या स्वार्थासाठी नाही, याचं मला विस्मरण होतं. म्हणून कर्मं सदोष होतात. दुष्परिणाम भोगावे लागतात.

हे सारं जगाची व्यवस्था आणि ते नियंत्रित करणाऱ्या, सर्वांचं कल्याण समानपणे साधू इच्छिणाऱ्या व्यवस्थेबद्दलच्या अज्ञानातून घडतं. थोडी जिज्ञासा बाळगली आणि शोधलं तर, हे कळू शकेल की, माझ्या अस्तित्वाची आणि कल्याणाची जेवढी काळजी या विलक्षण, व्यापक, अज्ञात शक्तीला - ईश्वराला आहे, तेवढीच प्रत्येक जीवजंतूपासून दगडापर्यंत प्रत्येकाच्या अस्तित्वाची आणि कल्याणाची काळजीही त्या शक्तीला आहे.

मी माझ्या अस्तित्वापुरतं आणि सुखापुरतं पाहिलं तर, या समानपणे नियंत्रक, कल्याणकारी, कृपाळू व्यवस्थेत अडथळे निर्माण होतात. विविध दुःखांच्या निमित्तांनी त्याचे परिणाम मला सोसावे लागतात. मला, माझ्यासह इतर जग निर्माण करणाऱ्या, नियंत्रित करणाऱ्या, समानपणे सर्वांचं कल्याण इच्छिणाऱ्या व्यवस्थेचं स्वरूप काय आहे, याची जिज्ञासा लागणं आवश्यक आहे. माणसात ती

शक्तीही आहे.

त्या जिज्ञासेचं उत्तर आपल्याला मिळणार आहे आणि त्यानुसार, माझं जीवन मी जगाशी, ईश्वराच्या कल्याणकारी इच्छेशी सुसंवादी करू शकेन, याविषयीची सकारात्मक खात्री म्हणजे श्रद्धा, मला या कामी उपयोगी पडू शकते. ती श्रद्धा, मला निर्माण झालेली अशी इच्छा - देव, संत, सत्पुरुष, सद्ग्रंथ - अशा कोणाच्याही मार्फत पुरी करू शकते.

अशा आकलनामुळं माझ्या जीवनाची प्रत आणि दिशा एकदम बदलून जातात आणि ते ईश्वराशी सुसंवादी होत जातं, व्यक्तिगत सुखदुःखांच्या पलीकडं जातं. जे बदल कोणाच्या उपदेशानं, सक्तीनं, कायद्यानं होणार नाहीत, ते बदल अशी श्रद्धेची जाणीव झाल्यामुळं घडतात. स्वतःच्या, जगाच्या कल्याणासाठी मिळणारा हा श्रद्धेचा अनुभव विलक्षण आहे !

अनुभव - ६. मी जरी देहानं स्वतंत्र दिसलो तरी, सर्व सुनियंत्रित विश्वाचा, त्यामागच्या चैतन्यमय शक्तीचा मी अंश आहे, हे लक्षात येतं. मग माझे सर्व व्यवहार हे देहबुद्धीचे, मीपणाचे आणि त्यामुळं सुखदुःखाचे न होता, त्यांच्या इच्छेचे, साक्षित्वाचे होतात, समाधान देऊ शकतात.

खुलासा - सामान्य माणूस स्वतःला स्वतंत्र, श्रेष्ठ समजतो. स्वतःचं व्यक्तित्व वेगळं राखू इच्छितो. याच्यामागं स्वार्थ आणि अहंकार अशाच प्रेरणा असतात. त्यामुळंच त्याच्या आयुष्यातला सुखदुःखाचा खेळ कधी संपत नाही आणि पुनर्जन्महीं टळत नाही.

अगदी व्यवहारानं पाहिलं तरीसुद्धा - आपला जन्म, बोलतो ती भाषा, घेतो ते शिक्षण, करतो ती नोकरी, चालवतो तो उद्योग, वापरतो ती सुखसाधनं - कशाच्याच बाबतीत आपण असे स्वतंत्र नाही. यांतलं जवळपास सगळं इतरांवर अवलंबून आणि त्यांच्याशी निगडित आहे. इतरांच्या बाजूनं पाहिलं तर,सगळ्या जगात सर्वांचंच

तसं आहे. म्हणून स्वतःला अहंकारानं वेगळं न समजता, जगाचा भाग समजलं तर, हेच दुःखाचं चित्र पालटून, ते सुखाचं होतं.

आपण पाहातो की, कुटुंबातली एखादी व्यक्ती मीपणानं, अहंकारानं, स्वतःच्या इच्छेनं वागू लागली तर, ती इतरांना आणि शेवटी स्वतःलाही दुःखात लोटते. पण असा अहंकार, वेगळेपण हे गरजेचंही नाही आणि सत्यही नाही.

असं आकलन श्रद्धेच्या परिचयाशिवाय होत नाही. जिज्ञासेनं श्रद्धेची आणि श्रद्धेनं भगवंताची जाणीव झाली तर, आपण या जगात, एक किंचित अंशमात्र पण चैतन्यमय अस्तित्व आहोत, याचं भान येतं. जसं अशा कुटुंबातल्या व्यक्तीला आपण कुटुंबाचे एक घटक आहोत, हे भान आलं तर, ते इतरांना आणि त्यालाही सुखाचं ठरतं, तसं श्रद्धेच्या जाणिवेनं आपण इतरांसारखेच भगवंताचे अंश आहोत आणि जितके शुद्ध होऊ तितके आनंदरूप भगवंत होऊन जाऊ, याची खात्री होते. मग अर्थातच, आपलं जीवन आणि आपले व्यवहार साधेपणाचे, सकारात्मक, भगवंताच्या इच्छेशी जुळणारे, असे होतात. जिवाला स्वतःशी, जगाशी आणि भगवंताशी सुसंवादी करून मुक्त करणं, हा श्रद्धेचा आगळा अनुभव आहे !

वरील सर्व अनुभवांच्या खुलाशांच्या पार्श्वभूमीवर इतर काही अनुभव खाली दिले आहेत. त्यांचा खुलासा होऊ शकेलच.

*७. दृश्य जगाचा मला अनुभव येऊ शकतो. पण ते सतत बदलत असतं, मिश्रणाचं असतं आणि भ्रम निर्माण करणारं असतं. ते कधी निर्भेळ आणि पूर्ण सत्य नसतं.*

*८. याचबरोबर या दिसणाऱ्या जगाला लागून न दिसणारं पण अधिक सामर्थ्यवान असलेलं जग असतं. ते दिसत नसलं तरी, त्याचे परिणाम मला दिसू शकतात, अनुभवाला येऊ शकतात.*

*९. व्यक्ती म्हणून माझ्यात असलेल्या शरीरशक्ती, बुद्धीची शक्ती, वाचेची शक्ती - या व्यवहार करायला उपयोगी पडत असल्या तरी त्यांना एक मर्यादा आहे. ती मर्यादा ओळखण्याचं सामर्थ्य माझ्यामध्ये आहे. ते सामर्थ्य वापरलं आणि मर्यादा ओळखून राहिलं तर, मीपणा, अहंकार, स्वार्थ - यांच्यापासून होणाऱ्या चुकीच्या कृती आणि दुःखं मला टाळता येणं शक्य आहे. हे आकलन मला श्रद्धेच्या परिचयामुळं आणि जिज्ञासेमुळं होऊ शकतं.*

*१०. न दिसणाऱ्या पण अनुभवाला येणाऱ्या माझ्या अंतरंगातल्या मनाच्या वायुरूप शक्तीमुळं मला बदलत्या, अशाश्वत जगाचा अनुभव येऊन, ते खरं असल्याचा भ्रम निर्माण होऊ शकतो, त्याची ओढ लागू शकते. तसाच याच मनाच्या शक्तीच्या शुद्धीमुळं, म्हणजेच ते मन नसताना, मला शाश्वत, अज्ञात ईश्वरी शक्तीचा अनुभव येऊ शकतो.*

वर दिलेले श्रद्धेचे अनुभव हे आपल्या नेहमीच्या सामान्य कल्पनांच्यापेक्षा वेगळे असले तरी, ते खऱ्या श्रद्धेचे अनुभव आहेत आणि आपलं अंतिम कल्याण करणारे आहेत. सामान्य माणसाच्या दृष्टीनं त्याचं एखादं काम होणं, हा त्याच्या श्रद्धेचा अनुभव आहे, असं तो समजतो. त्याचा खुलासा करू.

एखाद्या ठिकाणी श्रद्धा ठेवली आणि समजा त्याला नोकरी लागली, त्याचं लग्न ठरलं, त्याचं घर झालं - अशा स्वरूपाच्या घटना घडल्या तर, त्यांचं श्रद्धेला काही वावडं नाही. कारण श्रद्धा ही व्यावहारिक जीवनाशीही निगडित आहे. फक्त त्याच्यापुरती मर्यादित नाही. इथं हे लक्षात घेणं आवश्यक आहे की, जर श्रद्धेबद्दलची आपली कल्पना, असली कामं होण्यापुरती राहिली तर, कामं होण्यानं बसणारी श्रद्धा पुढची इतर कामं न होण्यानं, उडू शकते. शिवाय आपल्या कामांना अंत नाही. आपली अशी कामं

करण्यासाठीही भगवंत नाही.

तरीही, अशी काही कामं श्रद्धा ठेवल्यानंतर मग का होतात, असा प्रश्न उद्‌भवू शकतो. त्याचं उत्तर असं की, श्रद्धा ही व्यक्तीला त्याच्या शक्तीबाहेरच्या, कल्याणाच्या कामात मदत करते. काम लौकिक असलं तरीही, त्याच्या साहाय्यानं त्याचं अंतिम कल्याण होणार असेल तर, ती त्या कामातही मदत करील, हे उघड आहे.

उदाहरणार्थ, एखाद्याचा आपलं आयुष्य उपासनेला, नामाला, भगवत्कार्याला देण्याचा संकल्प आहे. पण त्याला कौटुंबिक कर्तव्यांमुळं किंवा स्वावलंबनाच्या ठेवणीमुळं प्रपंचात राहूनच हे करायचं आहे. ते त्याला अधिक पटलेलं आहे. मग त्याची कौटुंबिक कर्तव्यं चालवण्यासाठी त्याला नोकरी करणं प्राप्त आहे. त्या नोकरीत न अडकता, तो त्यातून लवकर मोकळा होऊन, भगवत्कार्याला लागू इच्छितो.

अशा वेळी नोकरी ऐहिक - लौकिक व्यवहारातली असली तरी, त्यात श्रद्धा त्याला पाठबळ देते, यश देते. पण असा अनुभव अपवादभूतच समजावा. एरवीची मागणी प्रापंचिक असतात, त्याला भगवत्सेवेची, उद्धाराची दिशा नसते, त्यामुळं त्यात येणारे अनुभव हे साध्या देवघेवीच्या व्यवहाराच्या पातळीवरचे असतात. म्हणून कामं होण्या-न होण्यावर, माणसांच्या श्रद्धा (?) बसतात, तशा उठतात. पुन्हा वेगवेगळ्या ठिकाणी बसतात किंवा अश्रद्धाही होतात. अशा व्यक्तींना श्रद्धेचं खरं स्वरूप कळावं, एवढंच आपण म्हणू शकतो.

आधी सांगितल्याप्रमाणं श्रद्धेचे खरे अनुभव हे नेहमी माणसाचा अहंकार, स्वार्थ, भेदबुद्धी, विपरीत श्रद्धा, विकार, ताणतणाव, संघर्ष, मत्सर, मानप्रतिष्ठेच्या इच्छा - अशा गोष्टी घालवणारे असतात. थोडक्यात, ते माणसाचं अंतरंग शुद्ध, निरपेक्ष, निःस्वार्थी आणि भगवद्‌भक्तीला अनुकूल करतात. त्यात त्यांच्याकडून समाजाचं आणि जगाचंही कल्याणच होतं.

याव्यतिरिक्त येणारे अनुभव हे खऱ्या श्रद्धेचे नसतात. ते व्यावहारिक पातळीवरचेआणि भ्रमात्मक असतात.

श्रद्धा ठेवूनसुद्धा अनुभव नाही, असं म्हणणारी माणसं सामान्यतः आपापल्या प्रापंचिक कामांच्या आणि अपेक्षांच्या बाबतीत बोलत असतात. साध्या भाषेत, देवाशी काही देवघेव करून, आपल्या स्वार्थी इच्छा पुऱ्या करण्याचाच त्यांचा विचार असतो. पैसे देऊन, एखादी गोष्ट मिळाली नाही, अगदी एखाद्याला मदत करूनही त्यानं वेळेला मदत केली नाही - तशी देवाची सेवा करूनही, त्यानं माझं कुठलं प्रापंचिक काम केलं नाही - तर ते त्याला श्रद्धा ठेवूनही अनुभव आला नाही, असं म्हणतात. हा व्यवहाराचा भाग असल्यामुळं त्यात फारसं तथ्य नाही. श्रद्धेकडून तशा अपेक्षाही करू नयेत.

श्रद्धेची खरी ओळख झालेल्या व्यक्तीच्या लक्षात येतं की, मला दिसणाऱ्या, जाणवणाऱ्या दृश्य जगापलीकडं कितीतरी प्रचंड दृश्य जग तर शिल्लक आहेच, पण त्याहीपेक्षा पलीकडं माझ्याशी आणि या जगाशी निगडित असलेलं, ते नियंत्रित करणारं कल्याणकारी, असीम आणि अनंत जग आहे. ते आहे एवढ्यापुरता मला त्याचा अनुभव येऊ शकतो. त्यावरूनच अशा विशाल, विश्वशक्तीशी तादात्म्य असलेल्या महापुरुषांना त्याचं ज्ञान आणि त्याचा अधिक अनुभव येत असतो. ते त्या पातळीवर वावरतात. ते निरिच्छ, निःस्वार्थी, ईशशक्तीशी सुसंवादी असल्यामुळं त्यांच्या सांगण्याप्रमाणं किंवा त्यांचं सांगणं लक्षात ठेवून वागणं - यासारखा माझ्या कल्याणाचा मार्ग नाही.

एवढं सारं प्रत्येकाला त्याच्यात्याच्या पातळीवर समजू शकण्याची आणि आपल्या खऱ्या स्वरूपाची ओळख व्हायला मदत करणारी, जी शुद्ध शक्ती माणसामध्ये आहे, ती म्हणजे श्रद्धा होय. आधी सांगितले हे श्रद्धेचे 'खरे' अनुभव आहेत. त्या साऱ्यांचा, सावधपणे जगल्यास प्रत्येकाला अनुभव येऊ शकतो !

**

## १८. काळजी असेल तर, श्रद्धा कमी पडते असं समजावं का ?

होय. श्रद्धा असूनही काळजी लागत असेल तर, श्रद्धा कमी पडते, हे खरं. मुळातच श्रद्धा म्हणजे भगवंताच्या अंतिम कर्तृत्वावरची, सामर्थ्यावरची आणि त्याच्या अंशरूपानं आपल्यात विद्यमान असलेल्या अस्तित्वाची खात्री होय.आपल्याला जी काळजी लागते, ती एखादी विशिष्ट गोष्ट किंवा घटना, अशाच्या संदर्भात असते. काहीच संदर्भ नसताना, माणसाला काळजी लागत नाही.

याचा अर्थ असा झाला की, एखादं काम आपण हातात घेतलं आहे किंवा आपल्या बाबतीत व्हायचं आहे, तर ते करण्याच्या बाबतीत काळजी लागणं, म्हणजे स्वतःच्या आणि त्याहीपेक्षा भगवंताच्या सामर्थ्याविषयी शंका निर्माण होणं आहे. माझ्या कर्तृत्वानं एखाद्या वेळेला एखादी गोष्ट पुरी होईल की नाही, ही शंका काळजी उत्पन्न करू शकते. पण आपल्यात असलेल्या भगवंताच्या अस्तित्वाची किंवा त्याच्या सामर्थ्याची शंका आली तर, काळजी उत्पन्न होऊ शकते. त्यातच हेही गृहीत आहे की, माझ्या मनात जे काम आहे, ते झालंच पाहिजे, असं मन नकळत म्हणत असतं. त्यामुळंच ते पुरं होईल की नाही, घडेल की नाही, याची काळजी उत्पन्न होते.

खऱ्या श्रद्धेचा संबंध एखादं काम आपल्या मनाप्रमाणं होण्याशी नाही, तर ते माझ्या कल्याणाचं असेल तर, होण्याशी आहे. त्यातही माझं कर्तृत्व मुळात अपुरं असल्यामुळं, एखादं काम तडीला जाईल की नाही, असं होऊ शकतं. काळजी लागू शकते. पण सर्वसमर्थ भगवंताच्या अस्तित्वाची खात्री - श्रद्धा असताना, ते त्याच्यावर सोपवलेलं असताना, काळजी लागणं म्हणजे श्रद्धा कमी पडणं तर आहेच, पण त्याचबरोबर हिताचं होण्यापेक्षा माझ्या मनासारखं होण्याची मला काळजी आहे, हे दाखवणारं आहे! या श्रद्धेतल्या उणिवा दूर करणं आपल्या हिताचं ठरेल, हे वेगळं सांगायला नको ! **

*१९. श्रद्धेचे अनुभव येत असूनसुद्धा त्या अनुभवांचा व्यावहारिक व पारमार्थिक प्रगतीला उपयोग होत नाही, अशा वेळी आम्ही काय करावं ?*

खऱ्या श्रद्धेच्या कितीतरी प्रकारच्या अनुभवांचा आपण आधीच्या प्रश्नात विचार केला आहे. त्याच्याशिवायसुद्धा आपल्या हितासाठी काही गोष्टी घडणं, टळणं, मनाविरुद्ध होणं, त्याचप्रमाणं आपल्याला कल्पना नसतानासुद्धा अनेक गोष्टींत आपला सांभाळ होणं, प्रसंगात आपल्याला अकल्पित मदत होणं, कर्तव्यांत आपल्या चुका होत असतील तर, आपल्या लक्षातही न येता, त्या टळल्या जाऊन, वेळेला आणि बरोबर कर्तव्य होणं - असे अनेक प्रकारचे अनुभव आपल्याला येत असतात.

असे अनुभव ज्याप्रमाणं व्यावहारिक पातळीवर येतात, तसेच ते अधिक प्रमाणात पारमार्थिक पातळीवरही येतात. सात्त्विक कर्मं अचानकपणे आपल्या वाट्याला येणं, आपल्याला शंका असलेल्या विषयाचा खुलासा असलेला नेमका ग्रंथ हातात पडून आपली पारमार्थिक शंका दूर होणं-त्यामुळं अडखळलेला परमार्थाचा प्रवास पुन्हा नीट सुरू होणं, त्यात्या टप्प्यावर आपल्या ईश्वराकडच्या प्रवासात ज्या मदतीची गरज आहे, ती मदत करणाऱ्या व्यक्ती, घटना, प्रगतीच्या त्यात्या टप्प्यावर घडणं - असे श्रद्धेचे असंख्य अनुभव येत असतात. त्यात अनेक अनुभवांना तर, वेळेचीसुद्धा अचूकता असते. ती त्या अनुभवाचं खरेपण आपल्याला दाखवून देत असते.

पदोपदी येणाऱ्या अशा अनुभवांचा आपल्याला खरंतर श्रद्धा अधिकाधिक बळकट होण्यासाठी उपयोग व्हायला पाहिजे. पण तसं होत नसेल तर त्याचं महत्त्वाचं कारण, आपल्याला त्यात्या वेळी ते कळले तरी, ते यथावकाश विसरले जातात. अनेक अनुभवांना तर, त्याक्षणी एवढी तीव्रता असते की, श्रद्धेबद्दल किंवा भगवंताबद्दल

आपण त्याक्षणी पूर्ण निःसंदेह होतो. त्यावर त्याक्षणी संबंधित माणसांच्यातही खूप मोठी चर्चा होते. अशा अज्ञात शक्तीच्या अस्तित्वाची खात्री पटते. ती सांभाळ करते आहे, याच्याही खुणांची चर्चा होते.

पण माणसाचा स्वभाव असा आहे की, तो व्यवहारात जसा अडचणीत असला की, मदत घ्यायला धावून जातो, देणारा मदतही देतो, त्याक्षणी अडचणीतल्या माणसाला त्याचे उपकार कितीतरी मोलाचे वाटतात. तो तसं कबूलही करतो. पण उद्या उजाडला की, त्या कृतज्ञतेची तीव्रता कमी होते. काही काळानं मध्ये अनेक घटनाघडून गेल्यानंतर तर, तो ती मदत, कृतज्ञताही पूर्ण विसरून जातो. तेच अशा श्रद्धेच्या अनुभवांच्या बाबतीत घडतं. म्हणून त्यांचा प्रगतीला उपयोग होत नाही.

आपल्याला जर खरंच प्रगती करायची आहे तर, कुठल्याही बारीकसारीक वाटणाऱ्या श्रद्धेच्या अनुभवांबद्दल प्रथम सावध असावं. म्हणजे ते अनुभव कळतील. आपला स्वभाव जर असा अनुभव विसरण्याचा असेल तर, एक व्यावहारिक मार्ग म्हणून असा कुठलाही अनुभव आला की, त्याचं टिपण ठेवावं. ते ठेवलं तर, अगदी वर्ष-सहा महिन्यांच्या काळातसुद्धा आपली वही भरेल एवढे अनुभव येत असतात, असं आपल्या लक्षात येईल. पण हे त्या नोंदी ठेवल्यामुळं कळतं. मग त्याचा उपयोग होतो. त्यालाच जोडून अशा श्रद्धेच्या अनुभवांच्या टिपणाची वारंवार उजळणी केली तर, त्यात्या वेळी निर्माण झालेली स्वतःतल्या, इतरांच्यातल्या आणि एकूण भगवंताची खात्री वाढत जाऊन, ती खात्री एका टप्प्यावर पूर्ण खात्री बनेल. त्यानंतर मात्र मनानं कधीही त्याच्या स्वभावाप्रमाणं, संदेह उत्पन्न केले तरी, त्यांना अजिबात दाद न देता, केलेली प्रगती टिकवणं, हेही सावधानतेचं आणि आपलंच काम आहे.

श्रद्धेचं रोपटं लहान असताना, सतत पाणी घालून, कुंपणात ठेवून ते वाढवावं लागतं. नाहीतर, साधी संशयाची, संदेहाची शेळी

येऊनसुद्धा ते खाऊन जाऊ शकते. पण ज्याची वाटचाल अशा तऱ्हेनं, टप्प्याटप्प्यानं, मागं न येता सावधानपणे सुरू आहे, त्याच्या त्या रोपाला सतत श्रद्धेच्या अनुभवांचं खतपाणी मिळत राहातं. शिवाय तो सावध असल्यामुळं असल्या संदेहाला, बुद्धिभेदाला बळी पडत नाही. त्या श्रद्धेच्या रोपाचं रक्षण होतं, वर्धन होतं.

हे ज्यांनी जाणीवपूर्वक केलं आहे, त्यांच्या रोपामधून श्रद्धेचे महावृक्ष बनतात. मग त्यांना असल्या बुद्धिभेदाच्या, संदेहाच्या, संशयाच्या शेळ्या तर काही करूच शकत नाहीत. पण उलट त्यांच्याच सावलीला असे पशुपक्षी, प्राणी, श्रद्धेची ओढ लागलेले इतर जीव येऊन बसतात. त्यांना त्या सावलीनं श्रद्धेची बुद्धी जागी होणं, संदेह दूर होणं, असलेल्या श्रद्धा अधिक बळकट होणं - अशा स्वरूपाचे अनुभव येतात.

श्रद्धेच्या अनुभवाचा कणन्‌कण साठवून, जपून त्याच्या साहाय्यानं आपल्यातल्या, इतरांच्यातल्या आणि सर्वांच्यामागं असलेल्या निर्गुण भगवंताच्या विषयी पूर्ण निःसंदेह असलेले जीवच संतपदाला जातात. मग या महावृक्षांसारखे अशा संतांचे श्रद्धेच्या अनुभवांचे संतचरित्रांतले साधेसाधे कणसुद्धा इतरांची श्रद्धा बळकट करायला उपयोगी पडतात.

हे लक्षात घेऊन, आपण आपल्यातली श्रद्धा जागी झाल्यावर, व्यावहारिक, पारमार्थिक प्रवासातले अनुभव देत असल्यावर, त्याबद्दल सावधान राहून, भगवत्स्वरूप होण्याकडचा आपला प्रवास जाणीवपूर्वक निरंतरपणे करीत असावा.

असा सावध प्रवासच श्रद्धा बळकट करून, एक दिवशी आपल्याला निरुपाधिक, आनंदमय भगवंताच्या महाद्वारातून प्रवेश करवून देईल !

**

*२०. अनेक श्रद्धास्थानांच्या ठिकाणी काही विशिष्ट*
*महत्त्वाच्या दिवशी भाविकांची प्रचंड गर्दी होते.*
*त्यात अनवस्था निर्माण होऊन, घातपात होतात,*
*गर्दीच्या गोंधळात अनेक माणसं मृत्युमुखीही पडतात.*
*अशा प्रसंगी भाविकांवर आणि त्या श्रद्धास्थानांवरही*
*अनेकदा चौफेर टीका होते. त्यानं काही प्रश्नही निर्माण*
*होतात, क्वचित अश्रद्धाही होते. अशा वेळी काय करावं?*

खरंतर अशा श्रद्धास्थानांच्या ठिकाणी अशी गर्दी व्हायची कारणंच मुळात समजून घेतली पाहिजेत. काही स्थानं फार पुरातन काळापासून प्रसिद्ध असल्यामुळं, तिथं जाण्याचा शेकडो वर्षं प्रघात असतो. परंपरा असते. ते श्रद्धास्थान तिथं कधीही गेलं तरी, भाविकांनाश्रद्धा बळकट होणारे अनुभव देत असतं. पण विशिष्ट दिवशी जाण्यानं जास्त काही पदरात पडेल, असा विचार करायचं खरं कारण नाही. पण तो केला जातो. म्हणून समूहच्या समूह लोटतात आणि गर्दी आटोक्याबाहेर जाते.

तसा तर भगवंत कुठंही अनुभव द्यायला तयार आहे. पण, आम्ही तो विशिष्टच ठिकाणी देतो आहे, द्यावा - असा आग्रह त्याच्यावर लादला आहे. त्यामुळं, त्याच्या परिणामांना तिथला साकार भगवंत जबाबदार नाही, निराकार तर मुळीचच नाही. भक्तांचे भम्र किंवा हट्ट अशा आटोक्याबाहेरच्या गर्दींना कारणीभूत होतात. त्यावेळीही क्षणभर विचार करावा की, कुठंतरी एखाद्याच्या बाबतीत गर्दीत धडपडणं, पाय घसरणं अशी छोटीशी घटना मुळात घडते. ती नीट न कळल्यामुळं उरलेली माणसं जो गोंधळ निर्माण करतात, त्यानं तो वाढत जातो. तिचं कारण या तथाकथित भक्तांना लागलेली स्वतःच्या जिवाची भीती नव्हे काय ? ही अशी भीती असला गोंधळ वाढवते आणि फुकटच कुणाचेतरी जीव जातात. वास्तविक, खरी भक्ती असली तर, भीतीचा प्रश्नच नसतो, जिवाच्याही !

काही ठिकाणी आपल्याला हेही आढळून येईल की, समजा असं काही घडलं आणि त्यात खरे भक्त असतील, तर अगदी इजा होण्यापासून, जिवावर बेतण्यापर्यंत कशाबद्दल त्यांची तक्रारही नसते. पण इतर ते पाहाणाऱ्या किंवा मुळात अशा श्रद्धा न पटणाऱ्या व्यक्तीच त्याचा मोठा प्रश्न बनवतात. तो देव - भक्त यांचं निमित्त करून, श्रद्धेवर घालतात. 'भक्ती तो कठीण, शुळावरील पोळी ।निवडे तो बळी, विरळा शूर ।।' हे म्हणणाऱ्या भक्तशिरोणी, जगद्‌गुरू तुकोबारायांच्या कसोटीवर घासून पाहिलं तर, असल्या घटनांना दिलं जाणारं, अश्रद्धा पसरवणारं महत्त्व उरणारही नाही.

अशा घटना इतर अनेक ठिकाणीही घडतात. वेगवेगळ्या संघटनांचे मेळावे, लक्षावधींच्या राजकीय सभा - अशा ठिकाणीही कसल्यातरी कारणानं गोंधळ उडून, असेच प्रसंग घडतात. त्यावेळी हा श्रद्धा-अश्रद्धेचा प्रश्न कुठं असतो ? त्यावेळी आपण फक्त गर्दीचं नियोजन व्यवस्थित नव्हतं, शासन-पोलिसयंत्रणा कमी पडली - अशा गोष्टींवर बोट ठेवून मोकळे होतो. असं घडणं हे बरोबर आहे, असं नसून, त्याकडं बघण्याचे दृष्टिकोन स्वच्छ, न्याय्य असावेत. एवढं इथं म्हटलं तरी पुरे.

त्यात आणखी एक दुसरा प्रकार आहे. आपण ज्या खऱ्या श्रद्धेचा ऊहापोह करतो आहोत, तिला तो लागू नाही. म्हणजे असं की, बहुसंख्य माणसं अशा खऱ्या श्रद्धेशी परिचित नसतात. त्यांना त्यांचे प्रापंचिक प्रश्न सोडवायचे असतात. त्या प्रश्नानं ते लोक गांजलेले असतात. ते कुठल्या न कुठल्या मार्गानं आपले प्रापंचिक, स्वार्थाचे प्रश्न सोडवण्यासाठी धडपडत असतात. अशावेळी एखादा पावणारा देव, स्थान प्रसिद्धीला येतं. तिथं गर्दी उडते. मग असे प्रसंग घडतात. त्यांचा अर्थातच इथं विचार करण्याचं कारण नाही.

शुद्ध देव, खरी श्रद्धा असल्या गोष्टी निर्माण करणारही नाही आणि करणाऱ्यांकडून विचलित होणारही नाही !

**

*२१. आपल्या श्रद्धेबद्दल काही व्यक्ती अश्रद्धा निर्माण करण्याचा प्रयत्न करतात, अशा वेळी आपली भूमिका काय असावी ? आपल्याला श्रद्धेचा अनुभव आला तर त्याचा इतरांना लाभ होण्यासाठी त्यांना सांगावं असं वाटतं, अशावेळी काय करावं ? श्रद्धा ठेवताना मनुष्य अंधश्रद्ध होईल का ?*

अशा काही व्यक्ती दोन प्रकारचे प्रयत्न करीत असतात. एक तर, आपलं जे श्रद्धास्थान आहे, त्यात काही तथ्य नाही, असं सांगायचा ते प्रयत्न करतात आणि दुसरं म्हणजे, ते मुळात श्रद्धा ठेवणं कसं चुकीचं आहे, तो भम्र आहे, आजच्या युगाच्या दृष्टीनं तर ते फारच मागासलेपणाचं लक्षण आहे - असं आपल्याला पटवण्याचा प्रयत्न करतात.मागं आपण शिक्षणाच्या प्रश्नाच्या उत्तरात पाहिलं तशा पद्धतीचं शिक्षण मिळल्यामुळं आणि त्याचा प्रभाव असल्यामुळं अशा व्यक्ती हे करतात, हे आधी आपण लक्षात घ्यावं.

त्यातही यांतल्या कुणाला श्रद्धेच्या खऱ्या स्वरूपाची कल्पना नसते. बहुतांश लोक हे आपापली कामं, ध्येय साध्य होण्यासाठी कुठंतरी यात्रा, देवदेव करणारे, त्या कामांसाठी रीतसर प्रयत्नवादी न राहणारे, काही बाबतीत आवश्यक ते प्रयत्न न करता दैववादी होणारे, आमच्या नशीबातच तसं आहे, असं म्हणणारे - अशा प्रकारचे असतात. हे काही खऱ्या अर्थानं सश्रद्ध लोक नसतातच. पण त्यांच्यामुळं श्रद्धेबद्दलच यांना मात्र शंका येते आणि तो मार्ग असला असेल तर चुकीचा आहे, असं वाटतं. तसं त्यांना अशा अनुभवावरून वाटलं तर ते स्वाभाविकच आहे. त्यामुळं त्यांनी तथाकथित श्रद्धेचा मार्ग चालणाऱ्या लोकांना असं सांगितलं, तर ते बरोबर आहे, सावध करणारं आहे, हे लक्षात घेऊ.

आता आपल्यात अशी अश्रद्धा उत्पन्न करणाऱ्या पहिल्या प्रकारच्या लोकांचा विचार करू. आपल्याला स्वतःला श्रद्धेच्या

खऱ्या स्वरूपाचा, बुद्धीचा, तर्काचा, प्रयत्नांचा असे सर्व मार्ग व्यवस्थित चालण्याची सवय आहे, त्या मार्गांच्या मर्यादाही माहिती आहेत, त्यापलीकडं असलेल्या सूक्ष्म, विशाल जगाची, अज्ञात शक्तीची कल्पना आहे - असं असल्यामुळं आपण जर खरे श्रद्धावान असू, तर आपल्याला एखाद्या श्रद्धास्थानाबद्दल अनुदार उद्‌गार काढून, आपली अश्रद्धा करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांच्या म्हणण्याला काही महत्त्व द्यायचं कारण नाही !

तीच गोष्ट दुसऱ्या वर्गातल्या लोकांची आहे. त्यांना शिक्षणाच्या प्रभावामुळं असो किंवा सावधपणे आपली बुद्धी, तर्क, पूर्वग्रह न ठेवता शेवटपर्यंत चालवण्याची शक्ती नसो, तेवढं औदार्य नसो - कशाहीमुळं त्यांना श्रद्धेच्या खऱ्या स्वरूपाची मुळात कल्पना नसते. मग ते त्या अर्थानं अश्रद्ध असणं, हे जरी बरोबर नसलं तरी त्यांच्यापुरतं रास्त असतं.

ते त्यांच्या मर्यादित अनुभवावरून श्रद्धेसारख्या तर्कापलीकडच्या विलक्षण विषयाला अज्ञानामुळं हात घालतात. आपल्यालाही अश्रद्धेच्या घोटाळ्यात टाकण्याचा प्रयत्न करतात. त्यावेळी त्यांची बालबुद्धी, अज्ञान लक्षात घेऊन त्यांच्याबद्दल सहानुभूती बाळगावी आणि त्यांचं म्हणणं सोडून द्यावं.

त्यांतल्या एखाद्याकडं सत्य समजून घेण्याची आणि त्यापर्यंत जाण्याची प्रांजळ भूमिका असेल, तर त्याला श्रद्धेचं खरं स्वरूप सांगण्याचा प्रयत्न करावा. पण जर अशा व्यक्ती पूर्वग्रहदूषित असतील, आपलं म्हणणं न सोडणाऱ्या असतील, तर त्यांना श्रद्धेबद्दल काही पटवायला जाऊन आपला वेळ वाया घालवू नये, हे उत्तम.

समजून न घेणाऱ्याला, तशी इच्छा नसलेल्याला, स्वतःला मुळातच अश्रद्धेचं प्रेम असलेल्याला सांगायला जाऊ नये, असं आपल्याला शास्त्रांनीसुद्धा सांगून ठेवलेलं आहे. ते झोपेचं सोंग घेतलेल्याला जागं करण्यासारखं अशक्य आणि निष्फळ काम आहे.

सत्याला सामोरं जाण्याची इच्छा नसलेल्याला, सत्यावर निष्ठा नसलेल्याला, अभक्ताला आणि सत्याच्या प्राप्तीसाठी आवश्यक ती तपश्चर्या करायची तयारी नसलेल्याला, गीतेसारखा शाश्वत ग्रंथसुद्धा सांगू नये, असं भगवंतानी शेवटी म्हटलं आहेच, हे लक्षात घ्यावं. शांतपणे अशा मंडळींचा निरोप घेऊन नामाला लागावं.

आपल्याला स्वतःला श्रद्धेचं खरं स्वरूप कळतं, श्रद्धेचे खरे अनुभव येतात, त्यामुळं चित्ताला शांती येते, तिचा लाभ होतो, त्यावेळी आजूबाजूच्या अश्रद्ध व्यक्तींना तो व्हावा, असं वाटलं तरी यांना सांगण्यापूर्वी आधी सांगितलेल्या गोष्टी लक्षात ठेवाव्या आणि त्यातून योग्य वाटलं, तरच सांगावं. कारण, असल्या गोष्टी बुद्धीनं पटवून देण्यात आपण कमी पडलो, तर आपलीच श्रद्धा अकारण डळमळण्याची शक्यता असते. ते नुकसान तरी टाळावं.

श्रद्धा ही आपल्या जिवंतपणाची, अस्तित्वाइतकी स्वाभाविक, सहज, अंगभूत गोष्ट आहे. श्वासाच्या बाबतीत जसं आपण श्रद्धा ठेवण्यानं किंवा न ठेवण्यानं तो सुरू-बंद होत नाही, तो सदैव सुरूच असतो, आपल्याला जिवंत ठेवून, सत्कर्मांच्या मार्गानं भगवंत गाठायची संधी उपलब्ध करून देऊन, आपलं कल्याण करीत असतो, तशा निरपेक्ष, निखळ, कल्याणकारी अस्तित्वाची खात्री म्हणजे जर श्रद्धा आहे, तर ती ठेवल्यानं आणि तिच्या प्रकाशात सत्याचा मार्ग चालल्यानं आपलंच हित होतं. त्यामुळं श्रद्धा ठेवून आपण अंधश्रद्ध होत नाही.

सत्याची शहानिशा न करता, विवेकबुद्धी न वापरता, लौकिक फायद्यासाठी कुणावरही, कशावरही विश्वास टाकणं, घोर-अघोर कृत्य करणं - असल्या कर्मांत मनुष्य मार्गाविषयी आणि त्याच्या खऱ्या कल्याणाविषयीही अंध होतो. ते श्रद्धेच्या विरोधात नसून श्रद्धेचं विपरीत स्वरूप आहे. श्रद्धेच्या विरोधात अंधश्रद्धा आहे, ही कल्पनाच भ्रामक आहे. श्रद्धा हे शाश्वत सत्य असल्यामुळं ते कधी असतं-नसतं असं होत नाही. तिच्या विरोधात काहीच असू

शकत नाही, पण विपरीत मात्र काहीही असू शकतं.

सूर्य सदैव प्रकाशितच आहे. मला तो दिसत नाहीसा होऊ शकतो, अंधाराचाही अनुभव येऊ शकतो, पण त्यावेळेला सूर्य नसतो किंवा तो प्रकाश देत नसतो, असं कधी होत नाही. आपल्याला तो न दिसण्याचं किंवा आपल्यापुरता अंधाराचा अनुभव येण्याची कारणं, अनेक असू शकतात. तसं तर ते मी डोळे मिटल्यामुळं, मी फिरणाऱ्या पृथ्वीबरोबर राहिल्यामुळं किंवा सूर्यासमोर ढग आल्यामुळं - असं कशाहीमुळं होऊ शकतं. पण यात सूर्य आणि प्रकाश दोन्हीही अबाधित असतात, शाश्वत असतात, तसं श्रद्धेचं आहे. त्यामुळं आपली श्रद्धा खरी असेल, देवाशी तसा कुठला देवघेवीचा व्यवहार करणारी नसेल, प्रापंचिक नफा-नुकसानीला महत्त्व देणारी नसेल, तर त्याअर्थानं, आपण प्रचलित असलेल्या अर्थानं अंधश्रद्ध होणार नाही. त्यामुळं केल्या जाणाऱ्या गोष्टीही करणार नाही. मग बुवाबाजी, गंडेदोरे, पशुप्राण्यांचे अकारण बळी देणं - असल्या भ्रामक मार्गाला जाणार नाही.

खऱ्या श्रद्धेची जोपासना आपण करीत राहू, तर उलट आपण अधिक निःस्वार्थी, अधिक निरहंकारी, अनाग्रही, अंतर्बाह्य सुसंवादी, करुणा, समता, प्रेम असे सद्‌गुण स्वतःत अधिक रुजवणारे, कर्तव्य व्यवस्थित करणारे, जगाला शक्य तेवढे उपयोगी पडणारे असे होऊ.

श्रद्धेच्या जोपासनेनं असं होण्यात तर आत्मकल्याणही आहे आणि जगत्कल्याणही !

**

*२२. विद्या, बुद्धी, कला, सत्ता, पैसा यांमुळं श्रद्धेची हानी होते, असं म्हणतात, या गोष्टी व्यवहारात अपरिहार्य आहेत. मग त्यांपासून होणारी श्रद्धेची हानी कशी टाळावी ?*

वर उल्लेखलेल्या गोष्टींमुळं श्रद्धेची हानी होते, हे खरं आहे. मात्र ती हानी का होते हे समजून घेऊन, ती हानी टाळायचे उपायही आहेत.

या गोष्टी व्यवहारात अपरिहार्य आहेत. त्यांतल्या कुणाच्या वाट्याला काही येत असतील तर काही येत नसतील. एखाद्याच्या वाट्याला राजसत्ता येईल, पण कला येईलच असं नाही. एखाद्याच्या वाट्याला विद्या येईल पण पैसा येईलच असं नाही. मात्र तो जगतो आहे त्याअर्थी त्याच्या वाट्याला यांतलं काही ना काही येणार, हे खरं आहे. मग हानी कोणती होते आणि ती कशी टाळता येईल याचा विचार करूया.

विद्या, बुद्धी, कला - अशा गोष्टी व्यवहाराला गरजेच्या असतात. त्यामुळं त्या मिळवाव्यात. पण हा विचार करावा की, यागोष्टी नुसत्याच येतात आणि राहतात की त्याच्याबरोबर आणखी काही येतं आणि राहतं ? वास्तविक एखाद्याला कुठली एखादी विद्या आली तर ती असावी, तिचा त्यानं उपयोग करावा, त्यापासून त्याच्या त्याच्या परिस्थितीप्रमाणं त्याला आर्थिक लाभही होईल, तोही त्यानं घ्यावा. बुद्धीला अधिकाधिक तल्लख करण्याचे प्रयत्न करावेत,तिला तर्कसुसंगत विचार करण्याचा,नवनवी शास्त्रं समजून घेण्याचा सराव - संधी द्यावी. त्यापासून होणारे लाभही घ्यावेत.

हा तर सारा सरळ व्यवहार आहे. पण प्रत्यक्षात या विद्येबरोबर ती येत असल्याचा अहंकार नकळत येतो. तिच्या साहाय्यानं जो लौकिक लाभ होणार, तो घेताना लोभ सुटतो. तो लोभ संचय वाढवतो. कदाचित, विद्येनं दुसऱ्या अधिक विद्वानाची असूया आणि कमी विद्वानाबद्दल तुच्छता-अशाही गोष्टी येतात. तिथं

आपण आपल्यातल्या भगवंतरूप श्रद्धेपासून दूर जातो. मग यश भगवंतानं दिलं ही जाणीव कमी होऊन श्रद्धेची हानी होते.

एकदा श्रद्धेच्या - भगवंताच्या अंतिम कर्तृत्वाचा विसर पडला की, माणसाचा अहंकार वाढून, त्याच्या पुढच्या कृती, लोकांचे संबंध - यांवर विघातक परिणाम होतो. अशा अहंकारी, स्वार्थी, लोभी विद्वानाची संगतसुद्धा लोकांना नकोशी होते. व्यवहारातली हानी होतेच पण, अर्थातच भगवंताकडचा प्रवास थांबून आपलं अंतिमतः पारमार्थिक नुकसानही होतं.

अशीच हानी बुद्धीच्या बाबतीतही होते. बुद्धीच्या बाबतीतली हानी तर जास्त असते. कारण बुद्धी प्रखर असेल तर तिला जे समजतं, तिच्या तर्कात जे बसतं तेवढंच जग आहे असं मानून, ती सूक्ष्म आणि तर्कापलीकडची श्रद्धा, भगवंत हे अमान्य करायला सुरुवात करते. या अमान्य करण्यानं शाश्वत श्रद्धा-भगवंतावर काहीच परिणाम होत नाही, पण आपण मात्र त्यांच्या उपयोगाला, लाभाला अंतरतो. त्यातही, अशा बुद्धीच्या मर्यादा न समजलेल्या माणसांकडून इतरांचा बुद्धिभेद होतो. त्यानं होणाऱ्या नुकसानीची जबाबदारीही असल्या बुद्धिमंतांवर येते. नुकसान होतं.

कलेतही एकमेकांना श्रेष्ठ-कनिष्ठ समजण्यानं भगवंताचा सर्वांना समान समजण्याचा गुण आपल्यातून जातो आणि त्यानंही अशा तऱ्हेच्या नुकसानीत भर पडते. सत्ता कुठल्याही प्रकारची असली तरी ती क्षणिक किंवा काही काळ टिकणारी असते. ती असताना मात्र माणसाला बेसावध करते. मग सत्तेमुळं इतरांवर अन्याय करण्यापासून अनेक चुका होतात. त्याही आपली अशीच हानी वाढवतात.

असं घडतं ते लक्षात घेणं आणि सावधान राहून भगवंताचं कर्तृत्व लक्षात ठेवणं, श्रद्धेचा कल्याणकारी धागा आणि शक्ती न विसरणं, हाच त्यावर उपाय होय !

**

*२३. मनोकायिक आजारांवर श्रद्धा हा उपाय आहे म्हणतात, ते बरोबर आहे का व कसं ?*

अनेक आजारांचं मूळ पोटात असतं म्हणतात, तसंच आता बऱ्याच आजारांचं मूळ मनात असतं, हे विज्ञानाच्याही लक्षात आलं आहे. मनाला येणारे ताणतणाव हे मन अदृश्य आणि वायुरूप असल्यामुळं अनेकदा लक्षातही येत नाही पण तेच मन त्याच्या मेंदूच्या स्थूल यंत्रणेला जोडलेलं असल्यामुळं तिथं बिघाड होतो, हृदयावर, रक्ताभिसरणावर, शरीरातल्या कफ-वात-पित्ताच्या प्रमाणावर, पचनाच्या यंत्रणांवरही होतो.

त्यामुळं, या आजारांची स्थूल कार्यकारण परंपरा सापडली, त्यांवर उपाय केले, तरीही काही वेळा आजार दूर होत नाहीत. अनेकदा तर अशा स्थूल चिकित्सेनंतरही त्याच्या कार्यकारण परंपरा सापडत नाहीत. निदानं होत नाहीत. मन, त्याचे व्यापार, त्याचं स्वास्थ्य-अस्वास्थ्य हे विषय सूक्ष्म आणि काही वेळा अतींद्रिय स्वरूपाचे असल्यामुळं बुद्धीच्या चिकित्सेत येत नाहीत. त्यांना 'मानसिक' आहेत असं समजून नेहमीचे डॉक्टर ते आजार राहणार असं सांगून सोडूनही देतात.

अशा बाबतीत श्रद्धेकडं उपाय असतात आणि ते अधिक प्रभावी असतात. त्याचे अनुभवही येतात. आधी पाहिलेलं श्रद्धेचं स्वरूप लक्षात असेल तर असं का होतं, हे सहज कळू शकेल.

मुळात, श्रद्धा ही माणसाच्या ठिकाणी असलेल्या निर्मळ, निरंतर, सकारात्मक अस्तित्वाची खात्री असल्यामुळं, शिवाय ती त्याला जगातल्या आणि ते चालवणाऱ्या भगवंताच्या अशाच शाश्वत अस्तित्वाशी जोडीत असल्यामुळं, तिच्या ठिकाणी भगवंताला आहे तसं सर्व ज्ञान आणि सामर्थ्य हीसुद्धा असतात. त्यामुळं ज्याचं निदान होऊ शकत नाही, जो मानसिक आहे - अशा आजाराचं निदान एका वेगळ्याच ज्ञानानं-श्रद्धेच्या मार्गानं होऊ शकतं. तसंच,

या ज्ञानाला धरून त्यावरचे साध्या तर्कबुद्धीत न बसणारे उपायही माणसाच्या लक्षात आणून देणं, करणं श्रद्धा करू शकते. अलीकडं नामोपॅथी,फेथक्युअर असे शब्द प्रचलित झाले आहेत, ते त्यामुळंच.

संत, सत्पुरुष हे निरपेक्ष, निस्वार्थी भगवंताशी सदैव जोडलेले असल्यामुळं, अशा तऱ्हेच्या मनोकायिक आजारांवर त्यांच्या अत्यंत साध्या, तर्कबुद्धीत न बसणाऱ्या सांगण्यानं सुद्धा उपाय झालेले आणि बरे झालेले लोक आढळतील. ही परंपराही हजारो वर्षांच्या इतिहासात खरी असलेली आपल्याला दिसून येते.

यात एकदोन गोष्टी मात्र लक्षात ठेवणं आवश्यक आहे. एकतर, श्रद्धेमुळं असंख्य गोष्टी घडत असल्या तरी, त्यांची दिशा ही नेहमी माणसाला देहबुद्धीतून सोडवणं, आत्मबुद्धी वाढवणं आणि भगवंताकडं नेणं - मुक्त करणं, शाश्वत समाधान देणं ही असते. त्यातसुद्धा एखादा आजार दूर होणं बसतं, पण श्रद्धेचं कार्य हे माणसाच्या मनाप्रमाणं घडवण्यात नसून, त्याचं कल्याण होण्यात आहे. नुसतं बरं होणं हे चांगलं वाटत असलं तरी, बरा झालेला माणूस हा त्यामुळं खऱ्या अर्थानं सश्रद्ध होऊन भगवंताच्या वाटेला जाईलच याची खात्री नाही. त्यामुळं, कल्याण होत असेल तरच असे आजार बरे होतात. यातल्या भावी कल्याणाची दिशा कळणं आपल्या बुद्धीच्या कक्षेत बसत नाही हेही इथं लक्षात ठेवावं लागेल.

मनाचा एक अंश शरीर, त्याचं स्वास्थ्य, त्याची काळजी यांच्याशी निगडित असतो. तो प्रबळ झाला की आजार होतात, प्रमाण वाढतं. श्रद्धा नक्की हे बरं कसं करते, तर मनाचा जो दुसरा अंश सूक्ष्माकडं, शाश्वताकडं, भगवंताकडं जोडलेला असल्यामुळं श्रद्धा तो धागा पूर्ण बळकट करते. कल्याणाची जाणीव जागृत करते. भगवंताची सत्ता सर्वसमर्थ आहे, याचीही खात्री प्रबळ करते. त्यामुळं या मनातला शाश्वताच्या आणि कल्याणाच्या ओढीचा भाग या काळजीवर, त्यातल्या दुर्बलतेवर आणि त्यामुळं निर्माण झालेल्या आजारांवर मात करतो. ते आजार बरे होतात.

आजारांमध्ये जो अनेक तणावांचा, भविष्यातल्या घटनांच्या भयाचा भाग असतो, तोही या श्रद्धेमुळं निरस्त होतो. उरत नाही. त्यामुळं असे मानसिक तणावामुळं, भयामुळं निर्माण होणारे आजार, बळकट श्रद्धेमुळं असे तणाव, भयं नाहीशी होऊन, त्याही कारणानं श्रद्धेनं असे मनोकायिक आजार बरे होतात.

अगदी साधं उदाहरण पाहायचं असेल, तर आपल्या समोर एखादं कार्यप्रस्थ आरंभलेलं असलं, किंवा नोकरीच्या जागी कुठली मोठी जबाबदारी येणार असली तर तिच्या कल्पनांनीच माणसाचं मन तणावग्रस्त, भयग्रस्त होतं. आपल्याला एकट्यानं या साऱ्याला तोंड द्यायचं आहे, त्यातही आपली एकट्याची शक्ती असं तोंड द्यायला समर्थ नाही, याची माणसाला आतून जाणीव असते. त्यापोटीही भीती, तणाव वाढतो. ते एका मर्यादेबाहेर गेलं की त्याक्षणी माणसाचे रक्तदाब, हृदयाचे ठोके यांत बिघाड व्हायला लागतात, आजार सुरू होतात.

पण त्याच वेळेला या साऱ्या कार्यप्रस्थाची किंवा नोकरीतल्या जबाबदारीची सवय असलेली, ते अनेकदा यशस्वीपणे पुरं केलेली कुणी साधी अनुभवी व्यक्ती नेमकी त्यावेळेला आपल्याकडं आली आणि तिनं या सगळ्याची जबाबदारी घेतो असं नुसतं म्हटलं तरी, अनेक वेळी हे आजार खाली उतरतात. प्रत्यक्ष अशा जबाबदाऱ्या पार पाडण्यात मदत केली तर असे आजार बरेही होतात, अनेकदा टळतातसुद्धा. यांत आपली शक्ती कमी पडण्याबरोबरच आपण एकाकी आहोत ही भावना अशा व्यक्तीच्या उपस्थितीमुळं नाहीशी होते. या पद्धतीनं मनोकायिक आजार टळत असेल, कमी होत असेल तर श्रद्धेनं तो बरा होतो आणि कसा बरा होतो, याची कारणं कळणं सोपं आहे.

श्रद्धा नेमकी मनाला तिच्या शक्तीची आठवण देते, सावध करते. शुद्ध जाणिवेच्या रूपानं, निरंतर अस्तित्वाच्या रूपानं भगवंत प्रत्येकात विद्यमान असतो तसा तो आपल्यातही विद्यमान आहे,याची

जाणीव झाली की, माणसाचं एकाकीपण दूर होतं. एकवेळ आधीच्या उदाहरणात म्हटलेल्या मदतीला येणाऱ्या लौकिक माणसाच्या सामर्थ्याला त्याची बुद्धी, त्याचे अनुभव, त्याची शक्ती, यांच्या मर्यादा असू शकतात. तो मदतीला म्हणून आला पण, त्याच्याच घरी काही प्रश्न निर्माण होऊन त्याला परत जावं लागलं असं घडून ती मदत थांबू शकते, पुन्हा एकाकीपण येऊ शकतं.

पण असाही विचार करावा की, अस्तित्व काय, भगवंताची सोबत काय, या श्रद्धेनं जाग्या होणाऱ्या, मिळणाऱ्या सर्व शक्ती या स्थलकालाच्या मर्यादेनं बद्ध नाहीत. जो भगवंत माझ्या सोबतीला इथं आहे, तो सदैव आहे याची खात्री देणारी श्रद्धा बळकट असेल, तर अस्तित्वाच्या- भगवंताच्या बाजूनं तो या प्रसंगात तर बरोबर असतोच, पण त्याचवेळी तो इतर कुठल्याही सश्रद्ध व्यक्तीच्या तितकाच बरोबर असतो. कारण तो सदैव अस्तित्वरूप आहे आणि सर्वत्र आहे. त्याला येणंजाणं नाहीच. त्यामुळं श्रद्धेनं मिळणारी शाश्वत सोबत खरंतर त्याचीच आहे. एकवेळ मित्र निघून जाईल, नातेवाईक सोडून जातील, उपचार करणारे डॉक्टर जवळ हजर नसतील, आजार त्यांच्या आटोक्यात नसेल पण भगवंताच्या सर्वच आटोक्यात असल्यामुळं तो सदैव आहेच आणि जे कल्याणाचं ते करण्याची सर्वसमर्थ शक्तीही त्याच्याकडं आहे. ही खात्री बळकट श्रद्धा नेहमी मनात जागृत ठेवते. त्यामुळं अशा मनोकायिक आजारांवर श्रद्धा हा उपाय आहे, हे बरोबर आहे आणि त्याचा अनुभव कुणीही श्रद्धावंत घेऊ शकतो.

माणसाचे आजार दूर करणं हे श्रद्धेचं मूळ काम नाही. तरीही माणसांच्या आटोक्यात नसलेले आणि त्यांच्या कल्याणाच्या आड येणारे असे मनोकायिक किंवा इतर आजारही दूर करणं हे श्रद्धेला शक्य असतं आणि ते ती करते, हा आपल्याला श्रद्धेचा मोठा विलक्षण लाभ आहे !

**

*२४. काही व्यक्ती जन्मतः अश्रद्ध असलेल्या आढळतात, असं का होतं ? त्यांच्या बाबतीत काही करता येतं का ? काही वेळा आधी श्रद्धा नसलेल्या व्यक्तीही आयुष्यात एखाद्या टप्प्यावर श्रद्धावान होताना दिसतात. मग अशी श्रद्धा उत्पन्न होण्याची काही वेळ येते का ?*

कुठली व्यक्ती अस्तित्वात आहे, म्हणजे जिवंतपण आहेच, चैतन्य, हालचाल आहेतच. म्हणजे श्रद्धेच्या, आपण आधी तपशीलात पाहिलेल्या व्याख्येप्रमाणं, त्यांच्याठिकाणी श्रद्धा विद्यमान आहेच. त्या व्यक्तींनाही आपल्या अस्तित्वाची जाणीव असतेच. म्हणजे मुळात त्या अर्थानं कुणी अश्रद्ध असत नाही, असणार नाही.

मग या व्यक्ती अश्रद्ध असतात म्हणजे काय आणि त्या तशा का असतात, याचा विचार करू. हे लक्षात घेऊ की, एक साधं कारण म्हणजे, आपलं शरीर, त्यातल्या अखंड चाललेल्या असंख्य यंत्रणा, या तर कुणाच्याही बाबतीत चाललेल्या असतात. त्यात लौकिक अर्थानं दयाळू-निर्दय, शांत-अस्वस्थ, उपयोगी-उपद्रवी, गरीब-श्रीमंत अशा कुठल्याही प्रकारचा माणूस असेल, तरी या साऱ्या यंत्रणा सर्वांच्यात तितक्याच प्रमाणात समानपणे कार्यरत असतात.

पण यातल्या अनेकांना साधं - डोळा बघतो, कान ऐकतात, पोटातली पचनयंत्रणा चोवीस तास काम करते - हे सारं सुरू असलं तरी त्याची जाणीव असतेच, असं नाही. पण त्यांना जाणीव नाही, म्हणून अशा यंत्रणा काम करायचं थांबवीत नाहीत आणि बंदही पडत नाहीत. खरंतर, ज्या यंत्रणांचे आपण आयुष्यभर कृतज्ञ असावं, अशा यंत्रणा असून, वापरून, त्यामुळं अशा व्यक्तीला जगायला मिळूनसुद्धा, मरेपर्यंत त्याची जाणीव-कृतज्ञता न बाळगता, एखाद्याचा सबंध जन्म जाऊ शकतो. म्हणून श्रद्धा आहे, असतेच, पण तिच्यासंबंधीची जाणीव नसू शकते. म्हणून अशा व्यक्ती आपल्याला अश्रद्ध वाटतात.

आता जन्मतःच अशी जाणीव नसलेल्या व्यक्ती किंवा अखेरपर्यंत ती जाणीव निर्माण न झालेल्या व्यक्ती - तशा असतात. त्या तशा का असतात ते समजून घेऊ. एखाद्याला जन्मतः अंधपण येतं. त्याला शारीरिकदृष्ट्यासुद्धा फारशी काही कारणं आढळत नाहीत. काहींना रातांधपण असतं, तर काहींना रंगांधपण असतं. आता जगात तर त्याक्षणी त्यांना न दिसणारा रंग असतो, तो इतरांना दिसतो, त्याचा काही उपयोग असेल तर तोही ते करून घेतात. पण अशा रंगांध व्यक्तींना रंगाच्या साऱ्या विश्वाबरोबर एखादा रंग त्यांना स्वतःला दिसत नसला, तरी त्यांच्याकडून तो वापरला जाऊ शकतो, त्याचा उपयोगही होतो.

पण या विशिष्ट उणिवेमुळं त्यांना तो कोणता, कसा, का वापरला, कसा उपयोगी आहे, याची कल्पना मात्र जन्मभरातसुद्धा येत नाही. त्या रंगाच्या जाणिवेची उणीव हा त्यांच्या या जन्मातल्या शरीरयंत्रणेचा भाग आहे. तशा काही व्यक्ती श्रद्धांध असतात. त्या अस्तित्वात आहेत, त्याचा उपयोग करतात, उपयोग करणाऱ्या जगात ते वावरतात, पण त्या श्रद्धेची जाणीव करून देणाऱ्या यंत्रणेची त्यांच्यात उणीव असते. त्यामुळं त्याबद्दल तक्रार करता येत नाही किंवा त्यांना दोषही देणं योग्य नाही. पण तितकंच त्यांना ही उणीव दूर करून सश्रद्ध करणं, हेही शक्य नाही.

एक शक्यता मात्र नेहमीच असते. काही भौतिक घटनेमुळं किंवा कारणामुळं अशा उणिवा अचानक दूर होऊन श्रद्धेची जाणीव सुद्धानिर्माण होऊ शकते. काही व्यक्ती जन्मतःच रागीट स्वभावाच्या असतात. तसं त्यांचं बरचंसं आयुष्यही रागावण्यात जातं. त्यांना स्वतःला, इतरांना त्याची कल्पना, त्रास सगळं असूनसुद्धा याला आपण किंवा ते तसं काही करू शकत नाही. पण त्यांच्याही बाबतीत काही वेळा एखादी अशी घटना घडते, की त्या रागाची जाणीव होऊन तो ते त्या क्षणी सोडून देतात.

तीच गोष्ट आधी अश्रद्ध असलेल्या, पण अचानक श्रद्धेची

जाणीव उत्पन्न होणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत असते. या व्यक्ती तशा वैचारिकदृष्ट्या, बौद्धिकदृष्ट्या सक्षम असतात. वेगवेगळ्या विषयांतल्या, शास्त्रांतल्या तज्ज्ञही असतात. पण त्या अश्रद्ध असतात. तशा तऱ्हेचं आयुष्य ते जगतही असतात.

पण, एखादा प्रसंग त्यांच्या आयुष्यात अचानकपणे असा घडतो. उदाहरणार्थ, ज्या दृश्य जगावर त्यांची भिस्त असते, ते त्यांना पूर्ण खरं वाटतं, त्यापलीकडं काही नाही, असं त्यांना वाटतं, बुद्धीनं सारे प्रश्न सुटू शकतील असं त्यांना वाटतं, त्या सगळ्याला छेद देणारा एखादा प्रसंग घडतो. मग ते एखाद्या जिवावरच्या अपघातातून वाचणं आणि त्याची कारणं न कळणं असो, जे जग-संबंध, कार्यकारणभाव सत्य मानले ते अपूर्ण आहेत, असे प्रत्यय देणाऱ्या घटना घडणं, त्या अर्थानं जगाला, आपण मानतो तसं, खरेपण नाही, किंबहुना ते अंतिम सत्य नाही, असं त्यांना प्रत्ययाला येतं. मग त्यांचा शाश्वत, अंतिम सत्याकडचा, म्हणजेच ईश्वरी सत्तेच्या निरंतर अस्तित्वाकडचा प्रवास सुरू होतो. त्या व्यक्ती तिथून पुढं त्याही क्षेत्रांतले अनुभव येऊन, त्या विश्वाची खात्री पटून 'सश्रद्ध' होतात.

आता या घटना काही कुणी लौकिक माणसांनी घडवून आणलेल्या नाहीत. त्या तशा घडायची वेळ आली, म्हणून त्या घडल्या, एवढंच आपण ओळखू शकतो. तसं सूक्ष्माचा विचार केला, तर श्रद्धा जागृत व्हायला लागणारी पुण्याई, साध्या भाषेत कारण, सध्याच्या जन्मात दिसत नसलं, तरी आधीच्या जन्मातल्या कुठल्या तरी सत्कर्मामुळं ते असतं. पण त्या सत्कर्माच्या झाडाला फळ यायला जशी काही वर्षं जावी लागतात आणि एक दिवशी ते येतं, तसंच सश्रद्ध होण्याची वेळ येण्याच्या बाबतीत घडत असतं.

तसं व्हावं, व्यक्ती सश्रद्ध व्हावी, अशी प्रार्थना आपण करू शकतो. तेवढंच आपल्या हातात आहे आणि ते पुरेसं आहे !

**

*२५. श्रद्धेचं खरं स्वरूप म्हणजे आपल्यातल्या अस्तित्वाची,*
*जगात अशाच तऱ्हेनं सर्वत्र असलेल्या अस्तित्वाची*
*आणि त्यामागच्या अज्ञात शक्तीची-भगवंताची-अंतिम*
*सत्याची जाणीव जागी असणं, हे आहे, हे कळू शकतं.*
*पण अशा सूक्ष्म आणि अज्ञातावरची श्रद्धा ठेवणं,*
*टिकवणं, हे सामान्य माणसाला अवघड वाटतं.*
*श्रद्धेचा उपयोग, ती टिकली पाहिजे, जागी असली*
*पाहिजे हेही पटतं. यासाठी काय करावं ?*

हा प्रश्न श्रद्धेच्या वाटचालीत कुणाही माणसाच्या दृष्टीनं अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. सामान्य माणसाच्या दृष्टीनं अज्ञात शक्ती किंवा आपल्यात असलेली श्रद्धा ही न दिसणारी असली, तरी ती आहे, खरी आहे, याची त्याला खात्री होते. पण त्याच्या दृष्टीनं हे थोडंसं आकाशाची खात्री असावी, तसं होतं. याचं कारण मूळ श्रद्धाविषय - मूळ भगवंत - हा आकाशासारखा व्यापक, पण लौकिकदृष्ट्या हाताला न लागणारा, अज्ञात राहातो. त्यामुळं श्रद्धेच्या कृती करताना सामान्य माणसाला मूळ, दृश्य, बळकट आधार लागतो. तो मिळत नाही. म्हणून श्रद्धेची वाटचाल करून जीवन सफल, समाधानी करण्याची इच्छा असूनही, या अज्ञात, निर्गुण स्वरूपामुळं त्याला कृती करताना अडचण निर्माण होते.

श्रद्धेच्या सगुण आविष्काराचा मार्ग दिला गेला आहे, तो त्यामुळंच. आकाश अज्ञात व खरं असलं,तरी त्याच्यापर्यंत वाटचाल करता येत नाही. पण त्याचं काही सगुण प्रतीक त्याला मिळालं, तर त्याची वाटचाल सोपी होते, टिकून राहू शकते.साध्या शब्दात,मनुष्य आकाशात जाऊ शकत नाही. पण देवळात जाऊ शकतो. पांडुरंगाला जाऊ शकतो. तसंच एखाद्या सत्पुरुषांकडंही जाऊ शकतो.

सगुणात आकाराला येणाऱ्या श्रद्धेच्या स्थानांची, संतसत्पुरुषांची गरज असते, ती आपण सगुणात असल्यामुळं ! सगुण प्रत्यक्ष पाहाता येतं, सदेह श्रद्धावन्त प्रत्यक्ष भेटू शकतात,

बोलू शकतात, शंका, प्रश्न, उपदेश यांचं आदानप्रदान होऊ शकतं. त्यामुळं श्रद्धेला मिळणारा बळकटपणा थेट असतो. सामान्य माणसाला अधिक उपयोगी असतो. म्हणून संतांनी निर्गुण देव, तो निर्गुण आहे, हे लक्षात ठेवूनसुद्धा सगुणात आणला आहे, तो आपली ही अडचण ओळखून त्यावर मार्ग काढण्यासाठीच.

ते आवश्यक आहे, सोपं आहे, शक्यही आहे. कारण, निर्गुण हे अंतिम सत्य आणि त्यामुळं पूर्ण समर्थ आहे. त्यामुळं त्याला असं कशातही व्यक्त होणं, अवघड नाही. ती देवाची मूर्ती असो, एखादा डोंगर असो, वृक्ष असो - श्रद्धेचं खरं स्वरूप लक्षात ठेवून जर आपण तितक्या निष्ठेनं त्याची शुद्ध उपासना केली, तर तिथंही हा निर्गुण भगवंत अनुभव देऊ शकतो, त्या अर्थानं प्रकट होऊ शकतो. खरं सामर्थ्य सगुण, श्रद्धा असलेल्या, तिचं महत्त्व ओळखलेल्या, ती वाढवू इच्छिणाऱ्या श्रद्धावन्तात आणि त्याला प्रतिसाद देणाऱ्या, मदत करणाऱ्या त्याला शाश्वत समाधान देणाऱ्या निर्गुण भगवंतात असतं. मूर्ती, डोंगर, झाड, पाणी, नदी, सागर - ही त्याची फक्त जोडून देणारी प्रतीकं असतात.

मनुष्याचा बराचसा व्यवहार हा असंख्य प्रतीकांच्या आणि संकेतांच्या माध्यमातून चालतो. हालचाली, खाणाखुणा, शब्द, स्वर - अशी असंख्य प्रतीकं वापरून मनुष्य त्याला अभिप्रेत असलेला अर्थ, भाव पोचवीत असतो आणि समजूनही घेत असतो. किंबहुना, आजची माणसाची सारी संस्कृती, इतिहास, विज्ञान, ज्ञान, साहित्य, कला - ही सारी त्याचं जे जीवन समृद्ध करतात, ती अशा वेगवेगळ्या संकेतांच्या, प्रतीकांच्या साहाय्यानंच. श्रद्धेलासुद्धा अशी प्रतीकं लागणं स्वाभाविक आहे. त्याअर्थानं वर म्हटली तशी, मूर्तींपासून सागरापर्यंत अनेक प्रतीकं, त्याच्या श्रद्धेचा विषय होतात, ती त्याला उपयोगी पडतात, त्याची श्रद्धेची वाटचाल सोपी करतात. निर्गुण सत्यस्वरूप भगवंताकडं जायला श्रद्धेची प्रतीकं ही माणसाची सोपी, चालण्यासारखी वाट आहे.

त्याचबरोबर, साक्षात श्रद्धेचा अनुभव घेतलेले संतसत्पुरुष, त्यांचा उपदेश, श्रद्धेनं येणारे अनुभव, करुणा, प्रेम, सहानुभूती, समाधान यांचा मार्ग दाखवणाऱ्या सद्ग्रंथांचं श्रवण, वाचन, आचरण - हेही तसे प्रत्येकाला थेट मिळू शकणारे आणि मदत करू शकणारे घटक आहेत. यामुळं निर्गुणाची वाटचाल सोपी होते.

इथं एक गोष्ट मात्र सावध राहून लक्षात घेण्यासारखी आहे. कुठलंही प्रतीक, जर आपल्यातली सात्त्विकता वाढवीत असेल, स्वार्थ, अहंकार, विघातक गोष्टी दूर करीत असेल, तर ते रास्त आहे, उपयोगी पडेल. पण त्याचबरोबर हे लक्षात ठेवावं लागेल की, तीती गोष्ट हे निर्गुणाचं प्रतीक आहे. ती मूळ निर्गुण वस्तू नव्हे. निर्गुणाचं प्रतीक असलेला देवळातला देव माझी वाटचाल सोपी होण्यासाठी गरजेचा आहे. त्या देवळापर्यंत जाण्यासाठी माझ्या घरापासून जाणारी वाटही तितकीच गरजेची आहे. असं असलं, तरी मनुष्य वाट चालून देवळात पोचल्यावर ती सोडून देतो. तसं देवळात पोचल्यावर दर्शनानं त्याचे भाव शुद्ध होऊन, त्या मूर्तीमागं उभ्या असलेल्या निर्गुण, निराकार देवाचं स्मरण त्याला व्हावं, त्या अर्थानं त्यानं, ते प्रतीकही ओलांडून जावं, हा श्रद्धेचा खरा प्रवास आहे.

प्रत्यक्ष देहातले संतसुद्धा, मला देहात पाहू नका, असं सांगतात, कारण सगुणाला सगुणाचे जसे उपयोग आहेत, तशा त्याच्या मर्यादाही आहेत.मूर्ती वेगवेगळ्या प्रकारच्या असू शकतील. देह नष्ट होतात, तशा त्या मूर्तीही काळाच्या ओघात झिजून नष्ट होतील. पण मधल्या काळात भक्त सावधानतेनं प्रतीकाचा उपयोग करीत असेल, परिपक्व झाला असेल, तर मूर्ती, देह उरणार नाहीत, पण श्रद्धा मात्र शुद्ध आणि बळकट झालेली असेल !

निर्गुण देव सर्वांना उपासनेला, श्रद्धा बळकट करण्याला सुलभ व्हावा, म्हणून कुठल्या तरी प्रतीकानं सगुणात आणताना, निर्माण होणाऱ्या धोक्यांच्या बाबतीत सावध राहाण्याचीही आपण नोंद घेऊ. समजा, प्रतीक म्हणून मूर्ती, समाधी निर्माण केली.

त्यामुळं ज्याला निर्गुण अवघड जात होतं, ते या प्रतीकामुळं सोपं झालं. दर्शन, सेवा, आचरणासाठी ग्रंथपठण, श्रवण असं करून श्रद्धा अधिक शुद्ध आणि बळकट करणं शक्य झालं.

पण त्यातून मूर्ती, समाधी प्रतिक्रिया देत नसल्यामुळं भक्ताला त्याच्या मनाप्रमाणं वागण्याची आणि त्याला भक्ती समजण्याची पळवाटही निर्माण होत असते. तिथं सावध राहावं. त्याचबरोबर शुद्ध श्रद्धेचा किंवा त्या अर्थानं भगवंतप्राप्तीचा हेतू नसलेली मंडळीही जगात असतातच. ती याच प्रतीकाचा वापर करून पैसा, व्यापार, फसवणुकी, संस्था, पदं, मान, प्रतिष्ठा- असल्या गोष्टी मिळवू शकतात. अर्थात, श्रद्धेच्या प्रतीकांचा बाजार होऊ शकतो. माणसातल्या अपप्रवृत्ती पाहाता, हे घडू शकतं आणि अनेक ठिकाणी घडतानाही आपण पाहातो. तिथं मात्र प्रतीकांच्या, संकेतांच्या, सगुणाच्या दुसऱ्या विघातक बाजू समोर येतात. काळाचा ओघ पाहाता, असं घडण्याची, वाढत राहाण्याची शक्यताच जास्त आहे.

त्यातून खऱ्या, शुद्ध भक्तिभावानं जाणाऱ्या व्यक्तींच्या श्रद्धेला, त्याच सगुणामुळं अडथळा निर्माण होऊ शकतो, अश्रद्धा निर्माण होऊ शकते. अशा वेळी तिथलं वातावरण, स्वार्थी व्यक्ती, त्यांचे हेतू या गोष्टी बदलणं शक्य नसतं. तेव्हा मात्र सगुण हे प्रतीक आहे, निर्गुण खरं सत्य आहे, शाश्वत आहे, ते कुठंही विद्यमान आहे, अनुभवाला येऊ शकतं. हे लक्षात ठेवलं, तर असल्या ठिकाणी न जाता, घरबसल्यासुद्धा खऱ्या श्रद्धेची वाटचाल करणाऱ्या माणसाला लागणारी अंतर्बाह्य मदत द्यायला भगवंत समर्थ असतो, आणि तो ती देतोही. हे लक्षात ठेवून गरज असल्यास-आपली वाटचाल, आपल्या घरातल्या एखाद्या छोट्याशा मूर्तीनं, पादुकांनी, फोटोच्या मार्गानं चालू ठेवून आपण निर्वेधपणानं आपली प्रगती साधू शकतो, साधावी !

**

## २६. श्रद्धा निर्माण व्हायला, टिकायला, वाढायला पूरक कृती कोणत्या ?

आधी पाहिल्याप्रमाणं, मनुष्य जन्मतः श्रद्धामयच आहे. त्यामुळं त्याअर्थानं श्रद्धा निर्माण करण्याचा प्रश्न येत नाही. किंबहुना, श्रद्धा तशी निर्माणही करता येत नाही. त्याची जरूरही नाही.

प्रश्न राहतो तो, श्रद्धा स्वतःत किंवा इतरांच्यात काही वेळा का दिसत नाही, याचा. तसंच अनेक माणसं अश्रद्ध दिसतात ती का, याचा. त्याचबरोबर श्रद्धा नाही पण तिचं महत्त्व कळलेलं आहे, म्हणून ती निर्माण करायला हवी, असं वाटू शकतं, याचा.

आधीच्या पार्श्वभूमीवर हे लक्षात घ्यावं की, श्रद्धा म्हणजे जर माणसाचं मूळ अस्तित्व किंवा स्वभावच आहे, तर काही नवीन निर्माण करण्याचा प्रश्न नाही. त्याबद्दल जागरूक होण्याचा प्रश्न असू शकतो. त्याचबरोबर, अशी श्रद्धा आपल्या ठिकाणी माणूस म्हणून जन्मतःच आहे, हे माहीत नसण्याचा प्रश्न असू शकतो.

आपण आपल्या जिवंतपणाबद्दल कधी विचारच केला नसल्यामुळं, आपण जिवंत आहोत किंवा आपलं अस्तित्व हे निखळ, अबाधित आणि सततचं आहे, हे लक्षात येत नाही. पण निदान विचार केल्यावर किंवा असं काही वाचल्यावर तरी, आपल्याला त्याबद्दल जाग येऊ शकते. ती एकदा आली की, आपल्यात मुळातच श्रद्धा आहे, याची जाणीव आपोआप होते.

मनुष्य झोपेतून जागा झाला की, त्याचे डोळे,हात,पाय-अशा गोष्टी त्याला आहेत आणि त्या तशाच आहेत, याची वेगळी जाणीव त्याला निर्माण करावी लागत नाही. फक्त झोपेतून जागं व्हावं लागतं. जागं होताच,तो या गोष्टींचा वेगळा विचार न करता, त्यांचा थेट उपयोग करू लागतो. तशीच काहीशी अवस्था श्रद्धेची आहे.

आता सरळच आहे की, अशा तऱ्हेची जाणीव देऊन, जाग

देणारं वाचन ही श्रद्धेला पूरक कृती होय. ही जाग वाचना बरोबरचयाची जाणीव देणाऱ्या इतर कीर्तन-पुराण-प्रवचन-भजन अशांसारख्या इतर अनेक कृतींनी येऊ शकते.

तशीच ती भाग्यवशात कुणा एखाद्या संतांची गाठ पडून, त्यांनी आपल्याला श्रद्धेच्या बाबतीतल्या झोपेतून जागं करून आपल्यातल्या अस्तित्वाची-शाश्वत भगवंताची जाणीव देण्यानंसुद्धा असं काम होतं. त्यासाठी आपल्याला अशा संतांच्या प्रतीक्षेत राहून, तशा गाठीभेटींचे प्रयत्न करणं, हीसुद्धा कृती पूरक असून, गरजेची आहे.ती करणं आपल्याच हातात आहे.ते आपण जाणीवपूर्वक करावं.

एकदा जागी झालेली ही श्रद्धा, आपल्याला पूर्वी आलेल्या पण त्यावेळेला न कळलेल्या, श्रद्धेच्या अनुभवांची, प्रसंगांचीसुद्धा आठवण करून देते. ते प्रसंग जेवढे आठवत राहतील, त्यांतल्या अनुभवांचं मोल कळत जाईल, तसतशी ही श्रद्धा टिकते,वाढू शकते.

इतर साधकांच्या श्रद्धेच्या अनुभवांचं वाचन, श्रवण हेही ही श्रद्धा सार्वत्रिक आहे, अशा तऱ्हेची जाणीव वाढवायला मदत करते. त्यासाठी योग्य सत्संग मिळावा, म्हणून प्रयत्न करणं हीदेखील पूरक कृती आहे.

यात शेवटी एक लक्षात घेण्यासारखं आहे की, श्रद्धेचा एक अनुभव जर नीट स्मरणात ठेवला, त्याची उजळणी घडत राहिली, तर त्याचा परिणाम म्हणूनही दुसरा एखादा अनुभव येऊन जातो. अशा शुद्ध, निखळ, खऱ्या स्वरूपाच्या श्रद्धेच्या अनुभवांनी श्रद्धा बळकट होऊन स्थिर होते. आपल्यात जन्मतःच असलेल्या श्रद्धेची लवकरात लवकर जाणीव होणं आणि त्यामुळं आपलं जीवन निःसंदेह, शांत व्हायला लागणारी पुण्याई आपल्या मागं आधीच आहे, याचं सतत स्मरण ठेवणं, मोल ओळखणं हीसुद्धा पूरक कृतीच आहे.

श्रद्धेमुळं माणसाला त्याच्या विशाल अस्तित्वाची कल्पना येते. एरवी अशी कल्पना नसलेला माणूस संकुचित वृत्तीचा राहातो. त्यामुळं तशा पद्धतीच्या स्वार्थाच्या, स्वतःच्या सुखापुरत्या, अहंकार

वाढवणाऱ्या कृती स्वाभाविकपणे त्याच्याकडून घडतात. तो त्याचा प्रश्न असला, तरी त्यातून आपल्याला शिकता येण्यासारखं असतं.

आपल्याला आपल्या विशालतेची, सर्वत्र असलेल्या भगवंताच्या अस्तित्वाची कल्पना आलेली असल्यामुळं त्याला साजेशा निःस्वार्थी, निरहंकार, निरपेक्ष अशा प्रपंचातल्या साध्यासाध्या कृतीसुद्धा आपण जाणीवपूर्वक करीत राहिलो, तर श्रद्धेमुळं, अशाकृतींमुळं मिळणाऱ्या दुर्लभ आनंदाची आपल्याला अधिकाधिक कल्पना येत जाते. तो आनंद एकदा कळला की, अशा कृतींची वाढ करण्यानंसुद्धा श्रद्धा अधिकाधिक बळकट होते, अशा विशालतेच्या कृती सावधानतेनं करीत जाणं, हेही श्रद्धा वाढवायला, टिकवायला मदत करीत असतं.

यात मूळ श्रद्धा जागी झाली, तिला अशा पूरक कृती घडून ती बळकट झाली, तरीसुद्धा श्रद्धेचा भगवंतापर्यंतचा प्रवास, हा तसा सूक्ष्म आणि अत्यंत सावधानतेनं करण्याचा आहे. त्यामुळं त्यात प्रगती तर होत राहावीच, पण त्याहीपेक्षा झालेली प्रगती-श्रद्धा टिकवून ठेवण्याची सावधानता राखणं, ही सर्वांत मोलाची कृती होय. अन्यथा या प्रवासात कधी मागं यायला होईल, हे सांगता येत नाही. म्हणून श्रद्धा टिकवण्याला सर्वांत मोलाची कृती म्हटलं आहे.

या पुस्तकात आधी वेळोवेळी पाहिल्याप्रमाणं, एकांगी, अपूर्ण शिक्षणामुळं असो, सुखसाधनाला भुलल्यामुळं असो, बरंचसं जग- या अदृश्य, सूक्ष्म, समर्थ, सत्य, कल्याणकारी श्रद्धेला वंचित झालेलं आहे. त्याचे अस्वास्थ्यासारखे दुष्परिणामही सहन करीत आहे. या पार्श्वभमूीवर आपल्याला शांती देणाऱ्या खऱ्या श्रद्धेचा परिचय घडला आहे, हे भाग्य ! त्यातली वाटचाल करून आपण आत्मकल्याण साधलं आणि त्या प्रमाणात जगाचं किंचित का होईना, कल्याण साधायला मदत केली, तर या भाग्याचं चीज होईल. ते तसं व्हावं, हीच सर्व जिज्ञासू, आजच्या आणि उद्या होणाऱ्या खऱ्या श्रद्धावन्तांच्यावतीनं भगवंताच्या चरणी आर्त प्रार्थना !

**

# डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची
## (आता डिजिटल स्वरूपात)

१. **ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :** श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)** : चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. **साधनप्रेरणा :** नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. **मेरी यात्रा (हिंदी) :** हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. **बोधपाठ :** आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. **एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) :** आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. **सृष्टिसंदेश : (विवरणासह) :** जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. **गुरुतत्त्वतरंगिणी :** गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत**

४२. **नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation**

४३ ते ५४. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :** डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. **शिदोरी :** व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. **विचारविसावा :** विसावा देणारी विचारांची विद्या

५७. **सारविस्तार भाग २ :** चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. **महाराजांची शाळा :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. **साधनपदावली भाग २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. **आरतीपुष्पमाला :** डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. **विनवणीची वाणी :** चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. **श्रद्धेची पहाट :** खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. **उपासनामाला :** येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. **पावनपथ :** श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. **अनुभवपुष्पे - भाग १ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. **कृतज्ञतामार्ग :** कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. **ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात :** आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. **श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)**
श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. **संतबोध : भाग ४ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. **श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार :** मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. **उत्तरायण -भाग ३ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. **अनुभवपुष्पे - भाग २ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. **श्रद्धा :** श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. **अनुभवपुष्पे - भाग ३ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. **अर्घ्य :** ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. **जीवनचिंतन :** दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. **स्वास्थ्यसंवाद :** मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. **वचनांजली भाग १ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. **अक्षरायण :** आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. **वचनांजली भाग २ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. **भावगीता :** श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

***

श्रद्धा
श्रद्धा
श्रद्धा
श्रद्धा
श्रद्धा
श्रद्धा
श्रद्धा
श्रद्धा
श्रद्धा
श्रद्धा
श्रद्धा
श्रद्धा
श्रद्धा
श्रद्धा
श्रद्धा
श्रद्धा

'श्रद्धा' हा शब्द परिचित असला तरी, त्याच्या अर्थाविषयी अनेकदा निश्चित कल्पना नसतात, अनेकदा विपरीत कल्पना असतात. अनेक बाजूंनी विचार मांडले जातात. त्यानं सामान्यच काय, असामान्य माणसंसुद्धा गोंधळून जातात. कशाला तरी श्रद्धा म्हणतात, कशावर तरी श्रद्धा ठेवून मोकळी होतात किंवा अश्रद्धही बनून जातात.

पण खरी श्रद्धा, तिचा मूळ अर्थ, तिचे खरे अनुभव, संबंधित भ्रम, शंका यांचा उलगडा झाला आणि माणसाच्या अंतर्बाह्य विधायक परिवर्तनाला असलेला तिचा उपयोग कळला, आचरण घडलं तर, कुणीही मनुष्य खरी श्रद्धा बाळगून निःसंदेह, निश्चिंत आणि शांत जीवन जगू शकेल.

श्रद्धा ही सर्व माणसांमधली अंगभूत शक्ती असल्यानं, सर्वांना हा सात्त्विक लाभ घेता येऊ शकेल. त्यासाठीचा हा नम्र प्रयास
'श्रद्धा'!

–